
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का०वा०
दा. क्र. 3830



IRBK-0103430
IRBK-0103430

# राष्ट्रपिता महात्मा गांधी

६१०९,७०
3830

३५९८२
आवा-
र-प्रकाश
४००३

अनुक्रम १५६१४८
विभाग आत्मकथा
क्रमांक ३९०३
नों. दि.

# राष्ट्रपिता म. गांधी

अनुक्रम ३५९७८
विभाग बालवाङ्मय
क्रमांक ३१०७३
नों. दि. २२/७/६७

लेखक

दा. न. शिखरे एम्. ए.

तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषक

३८३०
IRBK-0103430
IRBK-0103430

किंमत ए ....

चि[illegible]ाळा प्रकाशन, पुणें

मुद्रक व प्रकाशक :
दा. त्र्यं. जोशी, बी. ए. (टिळक)
चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ, पुणें २

☆

प्रथमावृत्ति
१९५०

☆

सर्व हक्क प्रकाशकाधीन

# सत्याची ज्योत

गेल्या फेब्रुवारींत मी दिल्लीस गेलों होतों. जुन्या नव्या साम्राज्याचे रिकामे पिंजरे मीं तेथें पाहिले. शेवटच्या साम्राज्याचा शेवट करणारा महात्मा ! त्याची समाधि राजघाटावर—तेथें गेलों तेंव्हां रात्र पडूं लागली होती—अंधार दाटत होता.

पण नाहीं. पं. जवाहरलालांनीं म्हटल्याप्रमाणें, अंधार क्षणिक आहे परंतु प्रकाश मात्र हजारों हजार वर्षे पसरणारा आहे ! त्या दिव्य प्रकाशाची ज्योत अमर आहे—राजघाटाच्या पणतींत सत्याची ज्योत सतत तेवत आहे.

समाधीचा चौथरा प्रशस्त आहे. त्यावर फुलांची मांडणी खुबीदारपणें केलेली होती. भोंवतालची बाग विस्तीर्ण आहे. सर्वत्र सामसूम होतें. एकाहि पायरव ऐकूं येत नव्हता. माझें मस्तक लवलें आणि क्षणांत—

माझ्या डोळ्यापुढून आफ्रिकेंतील जोहान्सबर्ग गेलें, चंपारण्यांतील भीतिहरवा सरकलें, गुजराथेंतील बार्डोली उभी राहिली, नौखालींतील श्रीरामपूर खडें झालें—आणि मनांत नाना भावना उसळल्या. किती थोड्या काळांत किती महान् नि उदात्त चित्रपट मनापुढें येऊन गेला.

आळंदीला मी जेव्हां जेव्हां गेलों आणि त्या ज्ञानेशाच्या समाधीपुढें एकाग्रतेनें बसलों, त्या त्या वेळीं माझें मन गहिंवरून

आणि महाराष्ट्रांतील सारे संत मला भेटले असेंच वाटलें. महाराष्ट्रीय पुण्याईचा पुंज म्हणजे ज्ञानेश्वरांची समाधि. तशीच भारतीय संस्कृतीचें गौरीशंकर म्हणजे राजघाटावरील समाधि. जें जें म्हणून आमच्या संस्कृतींत शुभ आहे, मंगल आहे, पावन आहे, त्या सर्वांचें प्रतीक म्हणजे गांधीजी ! अशीच माझी भावना तेथें झाली.

आमच्या देशाला बाहेरचें जग कशामुळें ओळखतें ? उंचच उंच अशा हिमालय–पर्वतावरून ? होय, निसर्गाची ती एक अद्‌भुत करणी आहे. आणखी कशावरून ओळखतें ? आग्रयाच्या ताज-महालावरून ? होय. मानवी कलेची ती परम सीमा आहे. पण निसर्गाची व मानवाची–उभयतांची गुणसंपदा जेथें कळसास पोचली, असें स्थळ म्हणजे गांधीजींचें चरित्रच. पुढें अनंत काळ-पर्यंत मानवतेला तें मार्गदर्शक होणारें आहे.

म्हणूनच देशोदेशींचे थोरथोर लोक राजघाटावर जाऊन तेथें आपला माथा टेंगणा करतात. युनोचे प्रतिनिधि असोत कीं पाकचे पंतप्रधान असोत, दिल्लीस गेल्यावर राजघाटावर ते आपलीं वंदनें ढाळून येतात. अमेरिकेचा वकील असो कीं रशियाचा राजदूत असो, आपली श्रद्धांजलि वाहण्यास ते राजघाटावर जाऊन आल्या-विना रहात नाहींत. पारतंत्र्यामुळें भुईसपाट झालेले जपान–जर्मनी यांसारखे देश तर गांधीजींच्या सत्य-अहिंसेच्या निर्भय व अजिंक्य तत्त्वज्ञानाकडे वळत आहेत. मग त्यांचा औरस असा भारतपुत्र तर काय ? पं. जवाहरापासून जयप्रकाशापर्यंत सर्वजण या ‘ राष्ट्र-पित्याच्या ’ स्मृतीचे प्रकाशांतच आपल्या कृतींचीं पावलें टाकीत आहेत.

भारताचेंच नव्हे तर, अखिल जगताचें आशा–स्थान म्हणजे गांधीजींचें तत्त्वज्ञान. त्यांचें चरित्र वाचणें म्हणजे कन्याकुमारीचें दर्शन घेणें होय. भारताचें टोंकच समुद्रांत शिरलें आहे–आणि तें एका समुद्रांत का ? छेः ! तीन सागरांना भारतवर्ष तेथें स्पर्श करीत आहे. पूर्व समुद्र, पश्चिम समुद्र आणि दक्षिण महासागर या तिन्ही सागरांना तेथें भारत 'पादाक्रान्त' करीत आहे. तेथील सूर्य एका समुद्रांत उदय पावतो व दुसऱ्या समुद्रांत अस्तंगत होतो. ही सारी भव्यता गांधी–चरित्रांत सांठवलेली आहे. भारताचें भूत–वर्तमान–भविष्य हे तिन्ही काळ त्या चरित्रांत सामावलेले आहेत. प्राचीन संस्कृतीचा योग्य अभिमान धरून ज्यांनीं वर्तमानकाळ घडविला आणि भविष्याचा पाया रचून ठेवला, त्या गांधीजींचें चरित्र येथें थोडक्यांत समजावून घेऊं या.

टिळक पुण्यतिथि
१ ऑगस्ट १९५०
महात्मा कार्यालय, पुणें २

—दा. न. शिखरे

## श्री. दा. न. शिखरे यांचें
## इतर चरित्र–वाङ्मय

| | | | रु. आ. |
|---|---|---|---|
| १ | म. गांधींचें चरित्र | : | ८–० |
| २ | राष्ट्रजनक टिळक | : | २–० |
| ३ | सुधारकाचार्य आगरकर | | १–८ |
| ४ | डॉ. राधाकृष्णन् : | : | ०–८ |
| ५ | राष्ट्रमाता कस्तुरबा | : | ०–२ |

# राष्ट्रपिता म. गांधी

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा

# अनुक्रमणिका

१ बालपणचे संस्कार - - - - १
२ गोऱ्यांचीं कृष्णकृत्यें - - - - ७
३ वीस वर्षांचा लढा - - - - १७
४ किसान-कामगारांची सेवा - - - २४
५ असहकारितेचा संग्राम - - - २९
६ आरोपी कोण ? - - - - - ३५
७ कायदा तोड दिया ! - - - - ४४
८ इंग्लंडांतील शिष्टाई - - - - ४९
९ राज्यकारभाराचे सूत्रधार - - - ५७
१० 'चलेजाव'चा झंझावात - - - ६३
११ स्मशानाचें नंदनवन - - - - ७१

☆

अनुक्रम ३५९४८
विभाग बालवाङ्मय
क्रमांक ७००३
नों. दि. २२/११/६२
वाचनालय शाखा

## : १ : बालपणचे संस्कार

' बाबा !

" माझ्या हातून मोठा गुन्हा घडला. एक नव्हे अनेक, त्यांची प्रांजळ कबुली मी आपणांजवळ देत आहे. ती वाचून आपण स्वतःला त्रास करून घेऊं नये. पुन्हां असे गुन्हे न करण्याची मी प्रतिज्ञा केली आहे. तरी आपण घडलेल्या गुन्ह्यांची माफी कराल काय ? "

मुलाचें हें पत्र वाचतांच वडिलांच्या डोळ्यांतून अश्रु गळाले. पत्र भिजलें. क्षणमात्र वडिलांनीं आपलें डोळे मिटून घेतले. नंतर त्यांनीं तें पत्र फाडून टाकलें. पत्र वाचण्यासाठीं ते बसले होते, ते परत आडवे झाले. कारण आजारीपणामुळें ते अंथरुणाला खिळलेले होते.

वडिलांचें हे अबोल दुःख मोहनदासला बरोबर कळलें. वडील रागीट होते. ते संतापतील, टाकून बोलतील, कदाचित् डोकें आपटूनही घेतील अशी भीति मोहनदासला वाटत होती. कारण, वडिलांचा दर्जा मोठा होता. ते राजकोट संस्थानचे दिवाण होते. त्यांचा बाणेदारपणा प्रसिद्ध होता. संस्थानिकांपुढेंही तें कधीं वाकले नाहींत. लोकांत आणि राजेलोकांत त्यांना मोठा मान मिळे. त्यांच्या प्रतिष्ठेला, त्यांच्या लौकिकाला बट्टा लाव-

णारें वर्तन आपल्या हातून घडलें म्हणून मोहनदासला फारच फार वाईट वाटलें. तो रडला—खूप रडला. वडिलांच्या शांतपणामुळेंच त्याला फार मोठी शिक्षा झाली असें वाटलें.

शाळेंतील चैनी व उनाड सोबत्यांच्या संगतीमुळें मोहनदासाचें पाऊल घसरत होतें. चौदा वर्षांचें वय. देशाला स्वतंत्र करण्याची ऊर्मी. त्यासाठीं आपण बलवान् व्हावें ही इच्छा. शक्ति मिळविण्याचा मार्ग म्हणून एका मित्रानें मांस खाण्यास सांगितलें. नुसतें सांगितलें नव्हे, नदीकांठीं निवान्त जागीं त्याला मांस खावयास लावलें. मोहनला ओकारी येऊं लागली. त्यानें खाणें अर्धेंच सोडलें. घरीं गेल्यावर चोरासारखें वागावें लागलें. रात्रीं झोंप येईना. थोडी आली तर स्वप्नांत दिसूं लागलें, आपल्या शरिरांत जिवंत बकरें आहे आणि तें ओरडतें आहे !

मांसाहार महाग. त्यासाठीं पंचवीस रुपये कर्ज मोहनला झालें. बंधूच्या हातांतील सोन्याचें कडें कापलें. कर्ज फिटलें. पण मन खाऊं लागलें. इतकें कीं, आत्महत्या करण्यास तें तयार झालें. धोतऱ्याच्या दोनतीन बियाही खाल्ल्या. पण-मग मृत्यूची भीति वाटूं लागली.

मांसाशन चोरून चाललेलें. घरीं कळवावयाचें नाहीं. वर्तनांत असत्य शिरलें. एका पापांतून दुसरें पाप. एका व्यसनांतून दुसरें व्यसन. चोरी केली. धूम्रपानही सुरूं केलें. त्यासाठीं नोकरांच्या चारदोन दिडक्या चोरण्याचा मोह मोहनला झाला. मनावर व्यसनांचें ओझें वाढूं लागलें. तें त्याला झेपेना. म्हणून त्यानें वडिलांना पत्र लिहिलें आणि आपल्या पापांचें सारें ओझें त्यांच्या चरणीं वाहिलें.

अशा वाममार्गाकडे नेण्यास शाळेंतील मित्रच काय, पण शिक्षकहि तयार होते. हायस्कुलांतील पहिल्याच वर्षी परीक्षेच्या प्रसंगीं घडलेली एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. शाळाखात्याचे इन्स्पेक्टर जाइल्स शाळा तपासण्यास आले होते. त्यांनीं पहिल्या इयत्तेच्या मुलांना पांच शब्द लिहा-

वयास घातले. त्यांत एक शब्द केटल (kettle) होता. त्याची वर्णरचना मोहननें चुकीची लिहिली. मास्तरांनीं त्याला आपल्या बुटाचे टोंक मारून इशारा दिला. परन्तु मोहनच्या कोठून तें लक्षांत येणार ? मास्तर आपल्यासमोरच्या विद्यार्थ्यांचे पाटीकडे पाहून शुद्धलेखन सुधारण्यास सांगत असतील अशी त्याची कल्पनाहि होऊं शकली नाहीं. त्याची समजूत कीं, विद्यार्थ्यांनीं एकमेकांचें चोरून पाहूं नये, एवढ्याचसाठीं मास्तर नजर ठेवीत आहेत. सर्व विद्यार्थ्यांचे पांची शब्द बरोबर आले, पण मोहनदास काय तो ढ ठरला ! त्याचा 'मूर्खपणा' मास्तरांनी मागाहून त्याला दाखवून दिला. परन्तु त्याच्या मनावर त्या सांगण्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं. त्याला दुसऱ्या विद्यार्थ्यांची चोरून नक्कल कधींच करतां आली नाहीं.

याच्या उलट, मोहनदासाच्या मनावर चांगले संस्कारही झालेले होते. त्याचे आजोबा पोरबंदरचे दिवाण होते. दिवाणगिरीचा निम्मा पगार साधुसंतांना दानधर्म करण्यांत ते खर्च करीत. ते नांवाप्रमाणेंच 'उत्तमचंद' होते. करारीपणा हा त्यांचा विशेष गुण. तो त्यांच्या मुलांतही उतरला. करमचंद पोरबंदरचे दिवाण झाले ते अवघ्या पंचविसाव्या वर्षी. त्यांचाही स्वाभिमान विलक्षण. सातशें रुपये पगाराची ती दिवाणी त्यांनीं ताड्दिशीं सोडून दिली. त्यांना सारी गीता तोंडपाठ असे. ते रामभक्त होते. रामायणाची गोडी मोहनदासाला तेराव्या वर्षांपासून लागली. कृष्णलीलांत तर तो रंगून जाई. 'श्रावण–पितृ–भक्ति' नांवाचें नाटक मोहनदासानें वाचलें आणि त्याचें मन म्हणालें, "मला पण श्रावणासारखें व्हावयाचें आहे.' यानंतर पाहिलें हरिश्चंद्राचें नाटक. त्याची सत्यनिष्ठा केवढी दांडगी ! राज्याचा, पत्नीचा, पुत्राचा–सर्वस्वाचा त्याग. मोहनदासाचें हृदयच हरिश्चंद्रानें जिंकलें. त्याच्या स्वप्नातही हरिश्चंद्र येऊं लागला.

मोहनदासाची आई पुतळीबाई. मोठी साध्वी आणि भाविक ! ती देवळांत जाई. व्रतवैकल्यें करी. एकदां तिनें सात दिवसांचें कडकडीत

उपोषण केलें होतें. रोज पंचवीसतीस भिकाऱ्यांना ती धान्य वांटे, ताक वांटे, देवालयांत तर तीं नित्य जाई. तिनें मोहनदासाच्या मनावर चांगले संस्कार केले. फार काय ? रंभा नावाची दासी त्यांच्या घरीं होती. जशी नामदेवाघरीं जनी. तिनें मोहनदासाला रामनामाचा मंत्र दिला.

मोहनदासाच्या मनांत असें समुद्रमंथन चाललें होतें. कांहीं मित्र, शिक्षक, त्याला वाममार्गाकडे नेत होते, तर घरांतील वळण आणि ग्रंथाचें वाचन त्याची उन्नति करीत होतें. या झटापटींत सुविचारांनीं कुविचारांवर मात केली. मोहनदासाचा स्वभाव सरळ, निर्मळ व बाणेदार असा बनला.

मोहनदासाचा जन्म पोरबंदर येथें भाद्रपद वद्य द्वादशी; संवत् १९२५ (ता. २ आक्टोबर, १८६९) रोजीं झाला. वयाच्या अठराव्या वर्षी, १८८७ मध्यें, अहमदाबाद येथें तो मॅट्रिकच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाला. नंतर भावनगरच्या शामळदास कॉलेजांत त्यानें प्रवेश केला.

'हां, मी तुला परवानगी देतें. पण एका अटीवर.' आईनें गंभीर स्वरांत सांगितलें.

'अट ? कोणती तुझी अट ! मी ती खचित पुरी करीन.' मोहनदासानें निश्चयी स्वरांत उत्तर दिलें. त्या स्वरांत आनंद ओतप्रोत भरलेला होता; कारण, त्याच्या इच्छेप्रमाणें त्याला इंग्लंडला जावयास मिळत होतें ना ? 'कॉलेजांत जाऊन काय होणार ? चार पांच वर्षे येथें अभ्यास करून साधा वकील होण्यापेक्षां विलायतेला जाऊन बॅरिस्टर व्हावें, म्हणजे आजोबांप्रमाणें, वडिलांप्रमाणें दिवाण होतां येईल.' अशी मोहनदासाची महत्त्वाकांक्षा. पैशाची अडचण. पण तीही दूर झाली. बायकोचे दागिने विकले आणि तीन हजार रुपये उभे केले. भावानें सात हजाराचें कर्ज काढलें व मोहनदासला दिलें. पैशाच्या अडचणीचा खंदक त्यांनीं ओलांडला. पण त्याहीपेक्षां अवघड खंदक म्हणजे आईच्या विरोधाचा. धर्मशास्त्रांत समुद्र-

गमन पातक मानलेलें विलायतेहून आलेलें हिंदी तरुण चंगीभंगी झालेले तिनें पाहिलेले. म्हणून ती कांहीं केल्या कबूल होईना. पण शेवटीं तिनें एका अटीवर मोहनदासला इंग्लंडला जाण्यास मुभा दिली. ती अट म्हणजे, "मांसाहार, मदिरापान व स्त्रीसंग यांपासून अलिप्त रहाणें." मोहनदासानें मातेसमक्ष प्रतिज्ञा केली. आईनें परवानगी दिली. हायस्कुलांत निरोपसमारंभ झाला. उलट, त्याच्या जातीनें सभा भरवून त्याच्यावर बहिष्कार घातला. पण मोहनदासाचा निश्चय अभंग! ता. ४ सप्टेंबर १८८८ रोजीं त्यानें मुंबईचा किनारा सोडला.

विशीच्या आंतील या तरुणाच्या पायांत लग्नाची बेडी पडलेली होती. त्या वेळीं बालविवाह सर्रास चालू होते—गुजरातेंत तर तें फारच. मोहनदास बाराव्या वर्षींच बोहल्यावर चढला. वधूचें—म्हणजे कस्तुरबाचें—वय त्याच्याइतकेंच. दोघांचाही जन्म एकाच वर्षीं, एकाच गांवीं झालेला. कस्तुरबा मोहनदासापेक्षां तीन महिन्यांनीं लहान. त्या निरक्षर होत्या. पण स्वभावानें सरळ, मेहनती व मितभाषी होत्या. त्यांचा निरोप घेऊन मोहनदास विलायतेस जाण्यासाठीं निघाला, तेव्हां त्यांना एक अपत्य झालेलें होतें.

जसें राजकोटच्या शाळेंत तसेंच, किंबहुना त्याहून अधिक मोहाचे प्रसंग, मोहनदासाला इंग्लंडच्या वाटेवर आले, खुद्द इंग्लंडांतहि आले. पण त्याच्या अंगावर प्रतिज्ञेचें कवच त्याच्या आईनें घातलें होतें ना? त्यामुळें निर्व्यसनी राहून व परीक्षेंत यश मिळवून मोहनदासानें बॅरिस्टरची पदवी मिळविली. लंडनची मॅट्रिक परीक्षाहि त्यानें बगलेंत मारली आणि ता. १२ जून १८९१ रोजीं बॅ. गांधी मायदेशीं येण्यास निघाले.

ते मुंबईंत उतरले तेव्हां त्यांना कळलें कीं, आपली संरक्षक देवता आपल्याला सोडून गेलेली आहे. आईच्या भेटीची उत्कंठा त्यांच्या मनांतल्या मनांतच जिरली.

गांधींनीं बॅरिस्टरीचा धंदा मुंबई येथें सहा महिने केला. सुदैवानें एक खटला आला. स्मॉलकॉज कोर्टांत तो चालावयाचा. वकील–फीतील कांहीं पैसे दलालाला कमिशन म्हणून द्यावे लागतील, असें गांधींना सांगण्यांत आलें. गांधींनीं तें नाकारलें. पहिलेंवहिलें काम हातचें गेलें तरी बेहेत्तर, पण आडमार्गानें जाणें नको, या निर्धारापासून ते अणुमात्र ढळले नाहींत. पण दावा मिळाला. तीस रुपये फी ठरली.

स्मॉलकॉज कोर्टांत गांधींनीं पाऊल टाकलें. प्रतिवादीतर्फे ते होते. त्यामुळें त्यांना उलट तपासणी करायची होती. ते सांगतात, "मी उभा राहिलों खरा, पण पाय कांपूं लागले. डोकें फिरूं लागलें. मला वाटे, कोर्टच फिरत आहे. प्रश्न विचारण्याचे सुचेना. न्यायाधीश हसले असतील. वकिलांना तर गंमत वाटलीच असणार. पण माझ्या दृष्टीला कुठें काय दिसत होतें!

मी बसलों. दलालाला सांगितलें, "हें काम माझ्यानें नाहीं चालवणार. पटेलला नेमा. मला दिलेली फी परत द्या." पटेलला त्याच दिवसाचे एकावन्न रुपये मिळाले. त्यांना तो खेळ होता. वक्तृत्वाचा, धीटपणाचा अभाव गांधींना पुरा जाणवला, मनाला शरम वाटली.

नंतर गांधी राजकोटला गेले. तेथील पोलिटिकल एजंटानें त्यांचा अपमान केला–पट्टेवाल्याकडून ढकलून बाहेर घालविलें. साहेबाच्या मग्रुरीचे डोंगरामागून डोंगर गांधीजींना पुढें ओलांडावयाचे होते, त्याची ही सुरुवातच होती काय!

गांधीजींनीं मुंबईंत माशा मारीत सहा महिने काढले. घरापासून कोर्टा-पर्यंत ते पायींच जात. कोर्टांत सारें रिकामपण. त्यामुळें तेथें डुलक्या घेत दिवस काढीत. एके दिवशीं त्यांना कोणी विचारिलें, " चाळीस हजार पौंडांचा दावा हातांत घेतां का ? " गांधींनीं उत्तर दिलें, " हो. "

हा दावा आफ्रिकेंत चालू होता. तेथील वकिलाला कुळाची बाजू सम-जावून देणें एवढेंच गांधीजींचें काम. फर्स्ट क्लासचा प्रवास, राहण्या-जेवण्याचा खर्च, शिवाय दरमहा एकशें पांच पौंड पगार, मुदत एक वर्ष, असा व्यवहार ठरला. १८९३ च्या एप्रिलमध्यें गांधी आफ्रिकेला निघाले. आफ्रिकेंत डरबानहून प्रिटोरियाला गांधी निघाले, रेल्वेचें तिकीट पहिल्या वर्गाचें काढलें होतें. रात्रीं नऊ वाजतां नाताळची राजधानी मॉरीत्सबर्ग येथें गाडी पोंचली. तेथें एक उतारू आला. ' बाहेर या, तुम्ही शेवटच्या डब्यांतून जावयाचें आहे ' त्यानें गांधींना समजावलें. पण गांधींनीं खालीं उतरण्याचें नाकारिलें. गोऱ्यानें शिपायाला बोलावलें. शिपाई आला. त्यानें हात पकडला आणि धक्का मारून गांधींना खालीं काढलें. त्यांचें सामान उतरून घेतलें. त्यांनीं दुसऱ्या डब्यांत जाण्याचें नाकारिलें. गाडी निघून गेली. ते वेटिंगरूममध्यें शिरले. त्यांच्या हातांतलें पाकीट तेवढें बरोबर होतें. बाकीच्या सामानाला त्यांनीं हात लावला नाहीं. रेल्वेच्या नोकरांनीं तें सामान कोठें तरी ठेवलें.

ते हिंवाळ्याचे दिवस होते. दक्षिण आफ्रिकेचा हिंवाळा उंचावरील भागा-मध्यें कडाक्याचा असतो. मॉरीत्सबर्ग उंच भागामध्यें आहे. त्यामुळें थंडी खूप लागली. त्यांचा ओव्हरकोट सामानांत होता. थंडीनें ते कुडकुडले. खोलींत दिवा नव्हता. त्यांना हाल सोसावे लागले. हें वरवरचें दुःख होतें. खरा रोग म्हणजे वर्णद्वेष. हा दृढमूल रोग नेस्तनाबूत करण्यासाठीं शक्ति

असेल तर तिचा उपयोग केला पाहिजे—तो करतांना स्वतःवर पडतील तीं दुःखें सहन करण्याचा निर्धार त्यांच्या मनानें केला.

दुसरे दिवशीं दुसरी हालअपेष्टा. सकाळीं आगगाडीनें गांधी चार्लस-टाऊनला गेले. तेथून जोहान्सबर्गला जाण्यास तेव्हां रेल्वे नव्हती. घोड्याच्या शिग्राममधून गांधी निघाले. आंतील बाजूस सारे गोरे बसलेले. गांधींना बाहेर शिग्रामवाल्याच्या शेजारीं बसविलें. शिग्राम—कंपनीचा गोरा एजंट आंत बसला. त्याला कांहीं वेळानें विडी ओढण्याची लहर आली. त्याला बाहेर शिग्रामवाल्याजवळ बसावयाचें होतें. म्हणून त्यानें एक मळकेंसें गोणपाट पडलें होतें, तें त्या हाकणारापासून घेतलें आणि तें पाय ठेवण्याच्या फळी-वर पसरून गांधींना म्हटलें, " स्वामी, तूं इथें बैस. मला हाकणारापाशीं बसावयाचें आहे. "

हा अपमान सहन करणें त्यांच्या शक्तिबाहेरचें होतें. म्हणून त्यांनीं स्पष्टपणें त्याला सांगितलें, " तुम्ही मला येथें बसविलेंत ते एक मी सहन केलें. माझी जागा तर आंत बसण्याची, पण तुम्ही आंत बसून मला येथें बसविलेंत. आतां तुम्हांला बाहेर बसण्याची इच्छा झाली आहे आणि विडी ओढावयाची आहे, म्हणून तुम्ही मला पायांशीं बसवूं पाहतां. मी आंत जायला तयार आहे, पण तुमच्या पायाजवळ बसायला कबूल नाहीं.''

इतकें गांधी बोलतात तोंच त्यांच्यावर तडाक्यांचा वर्षाव झाला. तो मनुष्य गांधींचा दंड धरून त्यांना खालीं ओढूं लागला. बैठकीपाशीं पितळेचा दांडा होता, तो गांधींनीं घट्ट पकडून ठेवला. मनगट तुटलें तरी दांडा सोडावयाचा नाहीं, असा निर्धार गांधींनीं केला. त्यांच्यावर गुदर-लेला प्रसंग ते उतारू पहातच होते. तो गोरा गांधींना शिव्या देत होता, ओढीत होता आणि मारीतही होता. पण गांधी गप्प ! तो धटिंगण आणि गांधी दुर्बळ. उतारूंपैकीं कांहींना दया आली व ते म्हणाले, '' अरे ए, त्या बिचाऱ्याला तेथें बसूं देना. त्याला विनाकारण मारूं नकोस. त्यांचे

म्हणणें रास्त आहे. तिथें नाहीं तर आंत त्याला आमच्याजवळ बसूं दे."

तो उसळून म्हणाला, "तें कालत्रयीं होणार नाहीं." पण किंचित् नरम पडला खरा.

गांधींना मारायचें त्यानें बंद केलें. त्यांचा दंड सोडला. चार दोन शिव्या आणखी हांसडल्या, पण हॉटेलांतील एक नोकर पलीकडे होता, त्याला स्वतःच्या पायांजवळ बसवला आणि आपण बाहेर बसला. उतारू आंत बसले. शिटी वाजली. शिग्राम सुरू झाली. गांधींची छाती धडधडत होती. आपण मुक्कामाला पोंचतों कीं नाहीं याबद्दल त्यांना शंका होती. तो गोरा त्यांच्याकडे डोळे वटारून पहातच होता. बोट दाखवून तो पुटपुटे, "याद राख, स्टँडरटन तर येऊं दे, मग तुला सांगतों काय तें." गांधी गप्पच. स्वतःच्या रक्षणासाठीं ते प्रभूचा धांवा करीत होते!

स्टँडरटन येथें तिसरी आपदा आ वासून उभी होती. तेथील 'ग्रँड नॅशनल हॉटेल' मध्यें गांधी गेले. "जागा नाहीं" असें म्हणून मॅनेजरनें त्यांना प्रवेश-बंदी केली. नंतर शेटजींच्या लोकांनीं त्यांचें स्वागत केलें, पण बजावलें, "ट्रान्सवालमध्यें नाताळपेक्षांहि अधिक दुःख. हिंदी लोकांना पहिल्या किंवा दुसऱ्या वर्गाचें तिकीटच देत नाहींत." तेव्हां स्टेशनमास्तरला आधीं चिठ्ठी पाठवून, कोट–नेकटॉय वगैरे चढवून व रेल्वेचे कायदे वाचून गांधींनीं पहिल्या वर्गाचें तिकीट मिळविलें, पण एका शर्तीवर–वाटेंत गार्डानें त्यांना डब्याबाहेर काढलें तरी त्यांनीं रेल्वेवर दावा करूं नये.

गांधीजी पहिल्या वर्गाच्या डब्यांत बसले तर खरे. गाडी चालू झाली. जर्मिस्टन स्टेशन आलें. तेथें गार्ड तिकिटें तपासायला निघाला. गांधींना पाहतांच तो संतापला. बोटानें खूण करून तो म्हणाला, "चल, जा तिसऱ्या वर्गांत" गांधींनीं आपलें पहिल्या वर्गाचें तिकीट दाखविलें. तो म्हणाला, "ते कांहीं नाहीं, तिसऱ्या वर्गांत जा."

त्या डब्यांत एक इंग्रज उतारू होता. त्यानें त्या गार्डाला तंबी दिली,

"या गृहस्थांना निष्कारण कां सतावतो आहेस ? त्यांच्याजवळ पहिल्या वर्गाचें तिकीट आहे तें दिसत नाहीं ? मला तों येथें राहिल्यानें मुळींसुद्धां अडचण होत नाहीं." असें म्हणून त्यानें गांधीकडे पाहिलें आणि म्हटलें, "तुम्ही खुशाल बसून रहा हो." गार्ड पुटपुटला, "तुम्हांला कुलीबरोबरच बसायचें असेल तर माझें काय जातें ?"

गांधी प्रिटोरियाला एकदांचे पोहोंचले. तेथेंही मोठ्या मिनतवारीनें रात्रभर राहण्याची परवानगी एका "फॅमिली हॉटेल" च्या मॅनेजरनें दिली; पण 'भोजनगृहांत' तुम्हांला जेवूं घातलें तर माझे आश्रयदाते मला सोडून जातील, अशी भीति व्यक्त केली. मात्र आश्रयदाते उदार निघाले. त्यांनीं हरकत घेतली नाहीं. गांधींना 'भोजनगृहांत' जेवण मिळालें. दुसरे दिवशीं एका रोटीवाल्याच्या बायकोकडे आठवड्याला ३५ शिलिंग या दरानें गांधींच्या शाकाहारी जेवणाची सोय करण्यांत आली.

खुद्द प्रिटोरियांत बॅरिस्टर म्हणून महशूर झाले असतांनाहि, गांधींना वर्णद्वेषाचा आणखी एक विषाचा प्याला घ्यावा लागला. प्रेसिडेंट क्रूगरचे घरासमोरून गांधी चालले होते. शिपायानें सूचना दिल्याशिवाय, फूटपाथवरून उतरून जाण्यास न सांगतां, गांधींना धक्का दिला, लाथ मारली आणि खालीं पाडलें. गांधी त्याला जाब विचारणार, त्यापूर्वींच कोट्स घोड्यावर बसून जवळून जात होते. त्यांनीं हाक मारून म्हटलें, "गांधी, मी सर्व पाहिलें आहे, तुम्हांला खटला करायचा असेल तर मी साक्ष देईन. तुमच्यावर अशा तऱ्हेनें हल्ला व्हावा, याबद्दल मला वाईट वाटतें." "त्यांत वाईट वाटून घेण्याचे कारण नाहीं. शिपायाला बिचाऱ्याला काय कळतें ? त्याच्या समजुतीनें काळे तेवढे सगळे एकच. हबशी लोकांना तो पायवाटेवरून असाच उतरवीत असेल, म्हणून त्यानें मला धक्का मारला. मीं नियमच केला आहे कीं, मला व्यक्तिशः सहन कराव्या लागणाऱ्या क्लेशासाठीं कोर्टांत जायचें नाहीं, अर्थात् मला फिर्याद करायची

नाहीं." गांधींनीं उत्तर दिलें. पण कोट्स यांनीं शिपायाला समजावलें व त्यानें गांधींची माफी मागितली.

हिंदी मनुष्यांनीं फूटपाथवरून चालूं नये व रात्रीं नवाच्या पुढें घरांतून बाहेर पडूं नये असा निर्बंध कांहीं वसाहतींत होता. चांगल्या जागा घेण्याला किंवा चांगले धंदे करण्याला त्यांना मनाई असे. एका बॅरिस्टरच्या कपाळीं हा वनवास. मग इतर हिंदी मजुरांचे वांट्याला किती नरक-यातना येत असतील! "हिंदी माणूस म्हणजे हमाल-केवळ गुलाम-नव्हे पशु" अशा दृष्टीनें आफ्रिकेंतील गोरे लोक वागत होते. त्यांतच हिंदी लोकांचा मताधिकार काढून घेण्याचें एक नवें बिल तेथील सरकारनें विधिमंडळापुढें आणिलें. तें गांधीजींच्या नजरेस केव्हां पडलें?

गांधीजींनीं दाव्यांत तडजोड घडवून आणिली. ते हिंदुस्थानला परत निघाले होते. त्यांना निरोप देण्याचा समारंभ चालू होता. हिंदी व्यापाऱ्यांनीं त्यांना मेजवानी दिली. मेजवानीनंतर गांधीजी वर्तमानपत्र चाळीत होते. त्यांत त्यांना विंचवाना दंश व्हावा किंवा विजेचा झटका बसावा, तसा त्या बिलाचा मजकूर अकस्मात् दृष्टीला पडला. व्यापाऱ्यांनीं गांधीजींना गळ घातली आणि आफ्रिकेंत ठेवून घेतलें.

लगेच गांधीजींच्या चळवळीचीं चक्रें फिरूं लागलीं. बिलाला विरोध करण्यासाठीं रीतसर सभा भरली. सभेनें विधिमंडळाच्या गोऱ्या अध्यक्षाला तार केली कीं, बिलाचा विचार तहकूब ठेवा. त्याप्रमाणें बिलाची चर्चा तहकूब झाली. गांधीजींनीं एका रात्रींत अर्ज तयार केला, पंधरा दिवसांत दहा हजार सह्या मिळाल्या. अर्ज ब्रिटिश सरकारकडे पाठविण्यांत आला. चळवळ कायम चालविण्यासाठीं ता. २२ मे १८९४ रोजीं 'नाताळ इंडियन कॉंग्रेस' गांधीजींनीं स्थापन केली. पण तेथील गोऱ्या सोटेशाहीनें बिल १८९६ सालीं मंजूर करून घेतलेंच.

आफ्रिकेंतील ५७,००० हिंदी लोक जागे झाले—खवळले. प्रत्येक

हिंदी माणसावर दरसाल तीन पौंड कर असे. केवढा हा अपमान! तो धुऊन काढण्यासाठीं गांधीजींनीं कंबर कसली. १८९६ सालच्या मध्यास ते हिंदुस्थानांत आले. मायदेशचा पाठिंबा दूरच्या लेकरांना मिळवून द्यावा असा त्यांचा हेतु. गांवोगांव हिंडून त्यांनीं आफ्रिकेंतील काळा-गोरा-भेद हिंदी पुढाऱ्यांचे कानावर घातला. या प्रचाराचें विकृत वर्णन करणारीं तार आफ्रिकेंत गेली. त्या तीन ओळींच्या तारेनें तेथें केवढा डोंब उठविला!

गांधीजी ता. २८ नोव्हेंबर १८९६ रोजीं आफ्रिकेकडे परत निघाले. बरोबर पत्नी, दोन मुलगे आणि एक भाचा होता. त्यांची आगबोट ता. १८ डिसेंबर रोजीं दरबान बंदराला जाऊन थडकली. पण त्या बोटींतून त्यांना खालीं उतरणेंच कठिण गेलें. तेवीस दिवस बोट बंदरांत अडकून पडली. कारण आफ्रिकेंतील गोरे लोक गांधींना आफ्रिकेंत उतरूंच देईनात. तीनचार हजार लाल झालेले गोरे बंदरांत जमले होते. कस्तुरबा व मुलें गाडींतून सुरक्षित गेली. गांधीजी आगबोटींतून उतरले आणि मग काय? तुंबळ युद्धच माजलें.

"गांधी! गांधी!" असा ओरडा सुरू झाला. ते पुढें चाललें. घोळकाहि वाढत चालला. चांगली गर्दी झाली. त्यांच्यावर धोंड्यांचा व कुजक्या अंड्यांचा वर्षाव सुरू झाला. एकानें त्यांची पगडी उडवून दिली. लाथा सुरू झाल्या.

त्यांना घेरी आली. त्यांनीं घराची जाळी धरून दम खाल्ला. तिथें उभे राहतां येण्याजोगें नव्हतेंच.

तडाखे बसूं लागले. इतक्यांत पोलीस सुपरिंटेंडेंटची बायको रस्त्यानें चालली होती. तिनें छत्री उघडून त्यांच्या डोक्यावर धरली. पोलीसची तुकडीहि संरक्षणार्थ आली. सुपरिंटेंडेंटनीं पोलीस ठाण्यांत आश्रय घेण्यास सुचविलें, पण त्यांनीं तें नाकारलें. तुकडीबरोबर चालून त्यांनीं पारशी

रुस्तुमजींचें घर गांठलें. त्यांच्या पाठीवर गुद्दे असले होते. रक्तहि एका ठिकाणीं आलें होतें. गोऱ्या लोकांनीं घराला वेढा दिला.

शेवटीं वेषांतर करून गांधीजींना त्या दंगेखोरांच्या घोळक्यांतून पसार व्हावें लागलें. या वेळीं त्यांचे वय अवघें सत्तावीस वर्षांचें होतें.

गांधीजींची चळवळ निर्भयपणें चालूंच राहिली. त्यांची वकिली सत्याला धरून चाललेली होती. तरी ती भरभराटींत होती. दरमहा तीन हजार पौंड त्यांना मिळत. इंग्रज व बोअर यांचें युद्ध तेथें सुरू झालें. तेव्हां गांधीजींनीं शुश्रूषा–पथकांत काम केलें. तापलेल्या धुळींत, बंदुकींच्या गोळयांत, रोज वीस वीस मैल चालून, इंग्रज सैनिकांना ( त्यांच्या सेनापतीच्या मुलालाहि ) वाहून नेण्याचें व त्यांना उपचार करण्याचें कार्य गांधीजींनीं व त्यांच्या अनुयायांनीं मोठ्या शर्थीनें दीड महिना केलें. सरकारनें गांधींना ‘ कैसर–इ–हिंद ’ हें पदक बक्षीस दिलें. पदक सोन्याचें होतें. खूप जाड होतें. मानव–सेवेसाठीं ते दिलेलें होतें. (पुढें चंपारण्यांत जाण्यास गांधीजींना जेव्हां मनाई करण्यांत आली तेव्हां गांधीजींनीं तें पदक सरकारकडे परत पाठवून दिलें. ) आफ्रिकेंतल्या त्यांच्या अनुयायांनाहि सरकारनें पदकें बहाल केलीं. जोहान्सबर्ग येथें संगमरवरी स्मारक–स्तंभ सरकारनें उभारला. आणि गांधीजी हिंदुस्थानाकडे परत यावयास निघाले.

सोन्याचांदीच्या व हिरेमाणकाच्या अलंकारांचा ढीग पडला. सोन्याचीं घड्याळें किती ! शेडें किती ! आणि हिऱ्याच्या अंगठ्या तरी किती ! तशींच तीं प्रशंसेनें ओथंबलेलीं मानपत्रें ! आणि ग्रंथ तरी किती ! एखाद्या राजालाच जणूं कांहीं नजराणे दिले जात होते. पण संन्याशाला त्याचें काय !

“ हिंदुस्थानांतून इंग्रज लोक कमावलेला सारा पैसा इंग्लंडला नेतात. त्याला आपण लूट म्हणतों—अन्याय म्हणतों. मग आफ्रिकेंत कमावलेला हा पैसा मी हिंदुस्थानांत कसा नेऊं ? ” हा विचार गांधीजींच्या मनांत

उत्पन्न झाला. त्यांच्या जनसेवेचें चीज करण्यासाठीं तेथील व्यापाऱ्यांनीं हे सारे नजराणे त्यांना अर्पण केले होते. त्या सर्वांचा ट्रस्ट करण्याचें गांधीजींनीं ठरविलें. तेथला पैसा तेथल्या लोकांसाठींच खर्च व्हावा, हें त्यांचें धोरण. तें संसारी कस्तुरबांच्या गळीं कसें उतरणार? त्यांनीं हरकत घेतली. त्या म्हणाल्या, " दागिन्यांची जरूरी तुम्हांला एक नसेल, मुलांनाहि नसेल, पण माझ्या सुनांचें काय ? "

गांधीजींनीं युक्तिवाद केला, " मुलगे लग्न करतील तेव्हांची गोष्ट. तेव्हां ते करतील दागिने. आणि आपल्या सुना दागिन्यांची हौस बाळगणाऱ्या थोड्याच असणार आहेत ! इतक्याउपर कांहीं दागिने लागलेच तर मी कोठें गेलों नाहीं ना ? "

" तुमचे पराक्रम कळले ! माझे दागिनेहि काढून घेतले तेच तुम्हीं कीं नाहीं ! मला घड घालूं दिले नाहींत, ते तुम्ही सुनांसाठीं काय घेणार ! मुलांना तर आतांपासूनच वैरागी बनवतां आहां ! मला तें कांहीं माहीत नाहीं. हे दागिने परत नाहीं करायचे. त्यांतून माझ्या हारावर तुमचा काय हक्क ? "

" पण तो हार तरी तुझ्या कामगिरीबद्दल मिळाला आहे, कीं माझ्या कामगिरीबद्दल ? " गांधींनीं विचारलें.

अशाच युक्तिवादानें गांधीजींनीं कस्तुरबांना सामान्यांतून असामान्य बनाविलें—संसारी स्त्रींतून 'राष्ट्रमाता' घडविलें.

पुढें १९०३ सालीं तिसऱ्यांदा गांधीजी आफ्रिकेंत गेले, तेव्हां तर सरकारची दडपशाही आणि गांधीजींची चळवळ—या दोघांनाहि महापूर आला. सत्याग्रहांत स्त्रियाहि भाग घेत होत्या. त्यांच्याशीं गांधीजींचे चाललेलें संभाषण कस्तुरबांनीं आडून ऐकलें. कस्तुरबांवर सत्याग्रहाची सक्ती करण्याची गांधीजींची इच्छा नव्हती. पण त्याच पुढें आल्या आणि म्हणाल्या,

" तुम्ही मला कांहींच सांगत नाहीं, असें कां ? माझ्यांत कोणता दोष आहे ? लढ्यांत सामील होण्याची लायकीच मजजवळ नाहीं काय ? मला लढ्यांत भाग घ्यावयाचा आहे. "

" तूं तुरुंगांत गेलीस तर मला आनंदच वाटेल. पण माझ्या आग्रहानें, वजनानें तसें घडावयास नको. तुला पूर्ण मतस्वातंत्र्य आहे. तुरुंगांतील हालाला तूं भ्यालीस तर मी जगाला तोंड कसें दाखवूं ? "

" तसें झालें तर तुम्हीं माझ्याशीं संबंधच ठेवूं नका म्हणजे झालें. पण मला हें कळत नाहीं, कीं जे हाल तुम्ही सोसतां, आपलीं मुलें सोसत आहेत, ते मला कसे सहन होणार नाहींत ? मीं सत्याग्रहाच्या संग्रामांत प्रवेश करणार हें निश्चित. "

" मग मी तुझा प्रवेश करून घेणार हेंहि निश्चित. "

कस्तुरबांच्या हृदयांतील सुप्त शक्ति गांधीजींनीं कशी जागृत केली तें पाहण्यासारखें आहे. १९१३ च्या मार्चमध्यें तेथील सुप्रीम कोर्टानें असा निकाल दिला कीं, खिस्ती पद्धतीनें झालेले आणि रजिस्ट्रारनें नोंदविलेले तेवढेच विवाह कायदेशीर आहेत. याचा उघड अर्थ हा कीं तेथील हजारों हिंदुमुसलमानांच्या धर्मपत्नी रखेली ठरल्या आणि त्यांची औरस संतति बेवारस अवलाद ठरली. अशा प्रसंगीं–

स्वैंपाकघरांत कस्तुरबा पीठ मळून भाकरी थापटून देत होत्या. गांधीजी वरकड काम करीत होते. त्यांनीं बांना एकदम विचारलें,

" तुला कळलें का ! "

" काय ! " जिज्ञासेनें कस्तुरबांनीं विचारलें.

गांधीजींनीं हसत हसत उत्तर दिलें. " आजपर्यंत तूं माझी धर्मपत्नी होतीस, पण आतां तूं माझी विवाहबद्ध स्त्री राहिली नाहींस. "

कस्तुरबांनीं आपल्या भुंवया चढवून विचारलें, " असें म्हणतो तरी

कोण ? तुम्ही तरी रोज नवीन नवीनच कांहीतरी भानगडी शोधून काढतां."

गांधीजींनी हसतमुखानें म्हटलें, "मी कधीं शोधून काढतों? तो जनरल स्मट्स म्हणतो. ख्रिस्ती विवाहपद्धतीप्रमाणें आपलीं लग्नें कोर्टामध्यें नोंदविलीं नाहींत, म्हणून तीं गैरकायदेशीर समजलीं जावयाचीं आणि म्हणूनच तूं माझी धर्मपत्नी नसून एक रखेली समजली जावयाची !"

कस्तुरबांनीं मोठ्या क्रोधानें म्हटलें, "काय याचें हें डोकें? या रिकामटेकड्याला असलें हें सुचतें तरी कोठून ?"

गांधीजींनीं थोडेसें टोचून म्हटलें,

"पण आतां तुम्ही स्त्रिया काय करणार ?"

"आम्ही बायका काय करूं शकणार ?" कस्तुरबांनीं विचारलें.

"आम्ही लढतों त्याप्रमाणें तुम्ही स्त्रियाहि लढा. खरी विवाहबद्ध पत्नी रहावयाचें असेल, आणि रखेली ठरावयाचें नसेल, त्याचप्रमाणें तुमची अब्रू तुम्हांला प्रिय असेल, तर तुम्ही स्त्रियाहि आमच्याप्रमाणें सरकारविरुद्ध लढा."

"तुम्ही पुरुष तर तुरुंगांत जातां !"

"तूंही आपल्या अब्रूसाठीं तुरुंगांत जावयास तयार हो." गांधीजींचें हे वाक्य ऐकून कस्तुरबा आश्चर्यचकित होऊन म्हणाल्या, "हं ऽऽ तुरुंगांत जाते ! स्त्रियांकडून कधीं तुरुंगांत जाणं होऊं शकेल ?"

"होय. तुरुंगांत जावें. स्त्रियांकडून तुरुंगांत जाणें कां होणार नाहीं ? पुरुष जीं सुखदुःखें भोगतो तीं स्त्रियांकडून कां भोगलीं जाऊं नयेत ? रामाच्या पाठोपाठ सीता गेली. हरिश्चंद्राच्या पावलावर पाऊल टाकून तारामती गेली. नळाच्या मागून दमयंती गेली. आणि या सर्व स्त्रियांनीं जंगलांत अतोनात दुःखें सहन केलीं."

"म्हणजे तुमच्या मनांत मला तुरुंगांत पाठवावयाचें आहे; खरें ना ?

आतां तेवढेंच शिल्लक उरलें आहे. ठीक आहे. पण तुरुंगांतील आहार मला मानवेल ! ”

“ मी तुला म्हणत नाहीं कीं तूं तुरुंगांत जा. तुला स्वतःच्या अब्रूसाठीं तुरुंगांत जावयाची हौस असेल तर जा. आणि तुरुंगांतील आहार मानवला नाहीं तर फलाहार कर. ”

“ तुरुंगांत सरकार फलाहार देईल ! ”

फलाहार मिळविण्याचा उपाय दाखवून गांधीजी म्हणाले—

“ फलाहार मिळेपर्यंत उपास कर. ”

कस्तुरबा हसून म्हणाल्या, “ ठीक; हा तर तुम्ही मला मरावयाचा रस्ता दाखवितां. आणि मला वाटतें कीं मी तुरुंगांत जाईन तर खात्रीनें मरूनच जाईन. ”

“ हो तर, माझीहि तीच इच्छा आहे. तूं तुरुंगांत मरून जाशील तर जगदंबेप्रमाणें मी तुझी पूजा करीन. ”

“ ठीक तर, मी तुरुंगांत जाण्यास तयार आहे. ” कस्तुरबांनीं दृढतापूर्वक आपला निश्चय व्यक्त केला.

## : ३ : वीस वर्षांचा लढा

“ कसें काय आहे ? ” गांधींनीं सलाम करून विचारलें.

“ ठीक आहे. ” धिप्पाड पठाणानें उत्तर दिलें. त्याचे डोळे रागानें लाल झाले होते. त्या पठाणाचें नांव मीर आलम. तो गांधीजींचा मोठा चाहता होता. पण आतां तो त्यांच्यावर क्रुद्ध झाला होता. नोंदणी-ऑफिसजवळ गांधीजी येतांच मीर आलमनें त्यांना हटकलें, “ कोठें चाललांत ! ”

"परवाना आणायला. पाहिजे तर तुझा परवाना आधीं घेऊन देतों. तूं फक्त अंगठ्याचा ठसा दिलास तरी चालेले. मी मात्र दाही बोटांचे— एका जबरदस्त लाठीचा प्रहार गांधींच्या डोक्यावर पाठीमागून करण्यांत आला.

"हे राम !"

एवढाच उद्गार काढून गांधींची ती कृश मूर्ति जमिनीवर पडली. त्यांची शुद्धि पार उडाली. हातांनीं बुक्क्या आणि पायांनीं लाथा मारण्याचें काम ते पठाण चालवीत होते. गांधींचे सहकारी मध्यें आले तर त्यांनाहि तसाच मार बसला. रस्त्यानें जाणारे युरोपियन तेथें आले, तेव्हां पठाण पळूं लागले. पण युरोपियनांनीं त्यांना पकडलें. पोलीस आले व त्यांनीं त्यांना ठाण्यावर नेलें. गांधींना याची दाद कुठली ? त्यांना गिब्सनच्या कचेरींत नेण्यांत आलें होतें. त्यांनीं डोळे उघडले. तेव्हां मि. डोक हे सज्जन मिशनरी मित्र वांकून विचारीत होते, "कसं काय वाटतंय् आतां ?"

"बरें वाटतें. फक्त दांतांत आणि बरगड्यांत तेवढ्या वेदना होत आहेत. मीर आलम कोठें आहे. ?"

"त्याला पकडलें आहे"

"त्याला मुक्त करा. मला कोणावरच खटला भरावयाचा नाहीं. पठाणांना योग्य वाटलें ते त्यांनीं केलें."

तथापि युरोपियनांनीं त्या पठाणाला तुरुंगांत गुदरलेंच. पुढें गांधीजींची तत्त्वनिष्ठा व क्षमा पाहून तो पहाडहि विरघळला. १९०८ मधें जोहान्सबर्ग येथील सभेंत त्या पठाणानें जाहीर केलें. "मी गांधींना पूर्वी मारलें ही माझी चूक झाली." गांधींनीं त्याचा हात आपल्या हातांत घेतला आणि आनंदानें दाबला. "तुझ्याविरुद्ध माझ्या मनांत अणुमात्र राग नाहीं." असें गांधीजींनीं प्रेमानें त्याला सांगितलें.

आफ्रिकेंत हिंदी लोकांनीं येऊंच नये म्हणून तेथील सरकारनें हिंदी लोकांची नोंदणी करण्याचें ठरविलें. ब्रिटिशांची राजवट ट्रान्सवालमध्यें (आफ्रिकेंतील एका भागामध्यें) सुरू झाल्यावर हिंदी लोकांना राहण्यासाठीं परवाने सक्तीनें घ्यावे लागले. त्या परवान्यावर हिंदी इसमानें आपली सही करावयाची असे. निरक्षर असल्यास अंगठा उठवून द्यावयाचा असे. नंतर फोटो जोडण्याचीहि सक्ती करण्यांत आली. ता. २२ ऑगस्ट १९०६ रोजीं 'काळा कायदा' प्रसिद्ध झाला. त्यामुळें आठ वर्षांपुढील प्रत्येक हिंदी माणसानें नोंदणी करून घेणें आणि दाही बोटांचें ठसे उठवून देणें अवश्य झालें. याचा उघड अर्थ सरकारच्या दृष्टीनें हिंदी माणसें म्हणजे बदमाष !

गांधीजी एका टेकडीवर बसले होते. वेळ संध्याकाळची होती. वातावरण शांत होतें. वारे गार वहात होते. पण गांधीजींच्या अंगाची लाही लाही झाली. त्यांच्या हातांत गॅझेट होतें. त्यांत तो काळा कायदा होता. तो वाचतांच त्यांचें सर्व शरीर संतापानें कांपूं लागलें. ता. ११ सप्टेंबर १९०६ रोजीं प्रचंड सभा भरली. तीन हजार हिंदी लोक हजर होते. 'काळा कायदा' मोडण्याचें ठरलें. तशा शपथा लोकांनीं घेतल्या. त्या वेळीं गांधीजींनीं घोषणा केली. "मला एकच मार्ग मोकळा आहे, आणि तो म्हणजे कायदा न मानणें व त्यासाठीं प्राणत्यागही करणें. मग त्या कामीं मी एकटा असलों तरी बेहत्तर. मूठभर लोकांनीं जरी प्रतिज्ञेचें पालन तंतोतंत केलें तरी आपली फत्ते होईल हें निश्चित."

वरपर्यंत दाद मागण्यासाठीं गांधीजी ता. ३ ऑक्टोबर १९०६ रोजीं इंग्लंडला गेले. चाळीस दिवस तेथें राहिले—बड्या बड्या मुत्सद्यांना भेटले. वसाहतमंत्र्यानें आश्वासन दिलें, "या काळ्या कायद्याला बादशहांची संमति दिली जाणार नाहीं." पण सरकारनें वचनभंग केला. 'काळा कायदा' ता. २१ मार्च १९०७ रोजीं मंजूर झाला. तो मोडण्यासाठीं

हिंदी लोकांनीं सत्याग्रह करण्याच्या शपथा घेतल्या. हाताचे ठसे देऊन कोणीही परवाना काढावयाचा नाहीं असें ठरलें. सरकारी कचेऱ्यावर सत्याग्रह्यांनीं निरोधन सुरू केलें. जोहान्सबर्गमधील तेरा हजारांपैकीं फक्त पांचशें हिंदी लोकांनीं परवाने घेतले. बाकी सर्वांचा निर्धार अभंग राहिला.

आफ्रिकन सरकारला हें पहिलेंच आव्हान होतें. ते संतापले. ता. १० जानेवारी १९०८ रोजीं त्यांनीं गांधीवर खटला भरला. दोन महिन्यांची शिक्षा झाली. तुरुंगांतच सरकारनें समेट केला. "हिंदी लोकांनीं आपखुषीनें नोंदणी करावी म्हणजे आम्ही काळा कायदा रद्द करूं" असें जनरल स्मट्स यांनीं गांधींना सुचविलें—समक्षही सांगितलें. गांधीजींनीं आपखुषीनें नोंदणी करण्याचें ठरविलें. बोटांचे ठसे देण्याची बॅरिस्टरवर सक्ति नव्हती, तरी लोकांना उदाहरण घालून देण्यासाठीं गांधीजींनीं आपल्या दाही बोटांचे ठसे देऊन परवाना मिळविण्याचें ठरविलें. म्हणून ता. १० फेब्रुआरी १९०८ रोजीं ते नोंदणी कचेरीकडे चालले होते. तेथेंच मीर आलम्ची लाठी त्यांच्या डोक्यावर पडली.

नोंदणीचें काम गांधींनीं जीव गहाण टाकून पार पाडलें. पण स्मट्सनीं काळा कायदा तसाच ठेवला आणि करार पायाखालीं तुडविला. निर्वाणीचा त्राता सत्याग्रह ही गांधीजींची श्रद्धा! त्यांनीं ता. १६ ऑगस्ट १९०८ रोजीं जोहान्सबर्ग येथें निषेधाची सभा भरवली. दोन हजार परवान्यांची व्यासपीठावर होळी करण्यांत आली. नाताळमधून सत्याग्रह्यांचे जथेच्या जथे ट्रान्सवालमध्यें येऊं लागले—आणि तुरुंगांत जाऊं लागले. गांधींना तुरुंगांत खणण्याचें काम दिलें होतें. खणतां खणतां गांधींच्या हाताला मोठमोठे फोड आले व त्यांतून पाणी वाहूं लागलें. कुदळ उचलण्याची ताकदही त्यांच्या हातांत राहिली नाहीं. नंतर गांधींना एकांतवासाच्या कोठडींत डांबून ठेवण्यांत आलें. चौदा चौदा वर्षांचीं कोंवळीं मुलेंही तुरुंगांत आलीं होतीं. त्यांना खडी फोडण्याचें, शौचकूप साफ करण्याचें अशीं कठीण व

गलिच्छ कामें देण्यांत आलीं. अठरा वर्षांचा स्वामी नागप्पा तुरुंगांतील यातनांमुळें मृत्यु पावला. वल्ली अम्मा ही तर सोळा वर्षांची पोर! तुरुंगांतून बाहेर आली, ती चिपाड होऊन! तरी पुन्हां तुरुंगांत जाण्याची तिची तयारी. तीही तुरुंगवासामुळें निधन पावली. पण सत्याग्रह्यांचा निर्धार व चिकाटी अढळ होती.

या सत्याग्रहाचे पडसाद आफ्रिकेंत, इंग्लंडांत व हिंदुस्थानांत—त्रिखंडांत उमटले. गांधींजी व सरकार या दोघांवरही ज्यांची विशेष छाप, असे ना. गोखले ता. २२–१०–१९१२ रोजीं आफ्रिकेंत गेले. त्यांनीं आपल्या अलौकिक वक्तृत्वानें तेथील गोऱ्या लोकांना व अधिकाऱ्यांना उपदेशाचे शब्द सांगितले. 'काळा कायदा' व 'तीन पौंडांचा कर' रद्द करण्याचें स्मट्सनीं वचन दिलें. यशाचें गांठोडें पाठीशीं बांधून, ना. गोखले ता. १७–११–१९१२ रोजीं आफ्रिकेंतून परत गेले.

गोखल्यांची पाठ फिरली आणि त्याबरोबर स्मट्सची बुद्धिहि फिरली. त्यांनीं पूर्वीसारखाच वचनभंग केला. सरकारचें शस्त्र जसें वचनभंग, तसें गांधीजींचें शस्त्र कायदेभंग. गांधीजींच्या एका हांकेसरशीं पांच हजार हिंदी मजूर संसार टाकून, नोकरी सोडून, सत्याग्रहासाठीं आले. अशा सत्याग्रह्यांचा पहिला मोर्चा ता. २८–१०–१९१३ रोजीं न्यू कॅसलहून निघाला. या शांतिसेनेंत २०३७ पुरुष, १२७ स्त्रिया व ५७ मुलें होतीं. त्यांना सरकारनें तुरुंगांत टाकलें. गांधीजींना नऊ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. तुरुंगाच्या कोठडींतील डांबरी जमीन व दरवाजाचे लोखंडी कठडे घासून चकचकीत करण्याचें काम त्यांना देण्यांत आलें. सरकारचें डांबरी धोरण व मळेवाल्यांचें लोखंडी हृदय सत्याग्रहानें स्वच्छ करण्यापेक्षां तें काम सोपें होतें!

हजारों मजूर तुरुंगांत गेले. त्यांचे सगेसोयरे खाणींत काम करीत होते. त्यांनीं संप पुकारले. अधिकाऱ्यांनीं फटके लगावले. सहा हजार

मजुरांनीं सहानुभूतीनें संप पुकारला. त्यांच्यावर सरकारनें गोळीबार केला. पण सरकारला मनांतून जनतेच्या क्रोधाचें भय वाटूं लागलें. त्यांनीं एक चौकशी कामिशन नेमलें. त्याचे सारे सभासद गोरे! हिंदी लोकांनीं त्यावर बहिष्कार घातला. कमिशनच्या सूचनेवरून सरकारनें गांधींना ता. १८ डिसेंबर १९१३ रोजीं बंधमुक्त केलें. ता. २१ जानेवारी १९१४ रोजीं गांधी व स्मट्स यांच्यामध्यें तडजोड झाली. सर्व सत्याग्रही बंधमुक्त झाले. कमिशननें आपलें निवेदन सादर केलें. त्यावर आधारलेलें 'इंडियन्स रिलीफ बिल' प्रसिद्ध झालें. सत्याग्रहाच्या चळवळीस आठ वर्षांनंतर यश आलें. नाताळांत मुदतबंद (गिरिमिटें—म्हणजे ॲग्रिमेंटनें आणलेलें. मजूर पाठविण्याचें हिंदुस्थान सरकारनें बंद केलें. रेल्वेवरील काळागोरा भेद नष्ट झाला. तीन पौंडांचा कर रद्द झाला. सामान्यतः आफ्रिकेंतील प्रत्येक हिंदी माणसाचें वार्षिक उत्पन्न फक्त नऊ पौंड असे. परवाना घेण्याची गरज राहिली नाहीं. कायद्यामध्यें वर्णविषमतेला स्थान राहिलें नाहीं. इंग्लंडांतील 'मॅग्नाचार्टा' इतका महत्त्वाचा हा करार आफ्रिकेच्या इतिहासांत ठरला.

सत्याग्रहाच्या यशाचें हें पीक वीस वर्षांनंतर पदरांत पाडून घेऊन गांधीजी आफ्रिकेंतून हिंदुस्थानला यावयाला निघाले. इंग्लंडमध्यें ते उतरले तेव्हां त्यांच्या कार्याचा मोठा गौरव झाला. ता. ९ जानेवारी १९१५ रोजीं गांधीजी मुंबईस आले. सर फेरोजशहा मेहता यांच्या अध्यक्षतेखालीं त्यांच्या सत्काराची सभा भरली. मद्रास म्हणजे मुदतबंद मजुरांचें मोहोळ. त्या मजुरांना माणूसकी मिळवून देणाऱ्या गांधीजींचा गौरव तेथें टोलेजंग प्रमाणांत झाला. सारा हिंदुस्थान या यशस्वी सेनानीचें स्वागत करूं लागला. आफ्रिकेंतील वीस वर्षांच्या कार्याबद्दल खुद्द गांधीजींना काय वाटलें? या प्रश्नाचें उत्तर तेच देतात कीं, "आफ्रिकेंत माझ्या जीवनाचा व्यवसाय मला सांपडला.'

हा व्यवसाय कोणता? बॅरिस्टरी खास नव्हे. तो त्यांनीं टाकूनच दिला होता.

**सत्य व अहिंसा या मार्गांनीं जनसेवा करणें आणि जनसेवा करतां करतां आत्मसाक्षात्काराचा अनुभव घेणें हा गांधीजींच्या जीवनाचा व्यवसाय.**

ट्रान्सवालमधून नाताळला जातांना गांधींनीं आगगाडींत रास्किनचे ' अन् टु धिस लास्ट ' हें पुस्तक वाचलें आणि त्यांच्या विचारांत क्रांति झाली. पुढें त्यांनीं त्याचें भाषांतरहि केलें. तें सर्वोदय या नांवानें छापलेलें आहे. ' सर्वोदयाचे मुख्य सिद्धांत असे.—

( १ ) सर्वांच्या कल्याणांत आपलें कल्याण आहे.

( २ ) वकील काय किंवा हजाम काय, दोघांच्याहि कामाची किंमत सारखीच असली पाहिजे. कारण पोटापाण्याचा हक्क दोघांनाहि सारखाच आहे.

( ३ ) साधें, अंगमेहनतीचें, शेतकऱ्याचें जीवन हेंच खरें जीवन होय.

याचा साधा अर्थ, अर्थशास्त्र हें नीतीवर, अध्यात्मावर आधारलेलें असलें पाहिजे.—स्पर्धेवर अवलंबून असतां कामा नये. त्याचप्रमाणें टॉलस्टॉयचा ' किंग्डम ऑफ गॉड ' हा ग्रंथ वाचून राजकीय व सामाजिक व्यवहारांना अध्यात्माचा पाया असण्याची आवश्यकता गांधींना पटली.

आणि जें बुद्धीला पटलें ते वर्तनांत वठलें पाहिजे हें तर गांधींचे व्रत. त्यांनीं दरबानजवळ शंभर एकराची शेती खरेदी केली, आणि ' फिनिक्स आश्रम ' स्थापन केला. ' इंडियन ओपिनियन ' हें त्यांचें साप्ताहिकहि तेथेंच छापलें जाऊं लागलें. सर्व आश्रमवासीयांना शारीरिक श्रम करावे लागत. गांधी स्वतः शेतींत घाम गाळीत—छापखान्याचें यंत्रहि आपल्या हातानें फिरवीत. या आश्रमाचा विस्तार १९१० सालीं झाला. जोहान्सबर्गजवळ अकराशें एकर जागेंत त्यांनीं ' टॉलस्टॉय फार्म ' वसविला. साठ पुरुष व दहा बायका यांची सोय त्यांत होती. १९१३ सालच्या सत्याग्रह-चळवळींत हा ' टॉलस्टॉय फार्म ' म्हणजे एक छावणीच

होती. आफ्रिकेंत असतांना गांधीजींचे विविध विषयांवर विचार काय होते हें त्यांच्या 'हिंद-स्वराज्य' या पुस्तकावरून दिसून येतें. १९०८ सालीं लंडनहून दक्षिण आफ्रिकेस परत जात असतांना गांधींनीं हें पुस्तक आगबोटीवर लिहिलें. पुढील आयुष्यांतील अनेक विचारांचीं बीजें या पुस्तकांत पाहावयास मिळतात. सुमारें शंभर पानांचें हें पुस्तक असून वाचक व संपादक यांच्या प्रश्नोत्तराच्या रूपानें गांधीजींनीं आपले विचार मांडले आहेत. सत्याग्रहाचा संजीवनीमंत्र पुनःपुनः सिद्ध करून व यशाला नेऊन गांधीजी वीस वर्षांनंतर आफ्रिकेंतून हिंदुस्थानला आले.

## : ४ : किसान–कामगारांची सेवा

राजे–महाराजे जडजवाहीर घालून झोकानोकांत बसले होते.

सरकारी अंमलदार–दरकदार आपापल्या इतमामाप्रमाणें स्थानापन्न झाले होते.

अखिल हिंदुस्थानांतील विद्वन्माणि तेथें उपस्थित होते–संपदा, सत्ता व विद्वत्ता यांचें जणुं प्रदर्शनच त्या सभेंत मांडलें होतें.

दरभंग्याचे महाराज अध्यक्षपदीं विराजमान झाले होते.

पहिले दिवशीं व्हाईसरॉय लॉर्ड हॉर्डिंजहि आपल्या मानकऱ्यासह हजर होते.

दुसरे दिवशीं एकेका नरेशाची दरबारी भाषणें चालू झालीं. एकमेक एकमेकांना माना डोलावूं लागले. डॉ. बेझंट यांचे मंत्रमुग्ध करणारें भाषण झालें.

आणि नंतर उभी राहिली एक कृश व लहानशी मूर्ति. डोक्यावर

काठेवाडी फेटा, अंगांत सदरा आणि धोतर अशा साध्यासुध्या वेषांत गांधीजींना पाहतांच तेथले लक्ष्मीपुत्र व राज्यपति दचकलेच. आणि त्याहून ते दचकले—

जेव्हां गांधीजींनीं आपल्या भाषणांत असा उपदेश केला कीं, "बात्रांनो, तुमच्या अंगावरील हें जडजवाहीर खालीं उतरवून ठेवा. इंग्लिश लोक हिंदुस्थान सोडून गेल्याशिवाय या देशाचा उद्धार कधींही व्हावयाचा नाहीं,—त्यांना घालवून दिलेंच पाहिजे, अशी जर माझी खात्री झाली तर 'तुम्ही चालते व्हा' असें त्यांना उघडपणें सांगण्यास मीं कधींही मागें पुढें पहाणार नाहीं." 'चले जाव' ची ही गंगोत्री बनारस येथें प्रगट झाली. तेथील हिंदु युनिव्हर्सिटीच्या स्थापनेच्या वेळीं, ता. ४ फेब्रुवारी १९१६ रोजीं, जो प्रचंड समारंभ झाला त्यांत गांधीजींनीं हें भाषण केलें.

वास्तविक आपले गुरु ना.गोखले यांच्या आज्ञेप्रमाणें गांधीजींनीं आफ्रिकेंतून आल्यावर एक वर्षभर कान-डोळे उघडे पण तोंड बंद ठेवून सर्व हिंदुस्थानचा प्रवास आरंभिलेला होता.त्यांना चळवळ करण्याची इच्छा नव्हती.पण 'अंतरींचे धावें, स्वभावें बाहेरी' या न्यायानें गांधींनीं बनारस हिंदु विद्यापीठांत खडखडीत भाषण केलें. ते ऐकतांच अध्यक्ष उठून गेले. इतर संस्थानिक निघून गेले. सभा मोडली. गांधींचें भाषण अर्धवट राहिलें. पण जनतेला कळून आलें कीं, हें पाणी कांहीं निराळेंच आहे. पं. जवाहरलालनीं गांधींजींच्या भारतांतील आगमनाचें वर्णन यथार्थपणें केलें आहे. ते आत्मचरित्रांत म्हणतात, "एक लहानसा माणूस हिंदुस्थानांत अवतरला. त्यानें शेतकऱ्याच्या दृष्टीला दृष्टि भिडवून त्यांच्या खचलेल्या हृदयाचा ठाव घेतला आणि त्यांचीं दुःखें जाणलीं. त्या माणसाच्या दृष्टींत जादू होती, कनवाळू प्रेम होतें व मृत्यूलाहि कवटाळण्यास न भिणारी निष्ठा त्याचे अंगीं होती. कामकरी व सारे दलित लोक यांनीं त्याला पाहिलें व ऐकिलें. तेव्हां त्यांचीं मृतप्राय अंतःकरणें नवचैतन्यानें थरारलीं. त्यांना अपूर्व आशा वाटूं लागली आणि आनंदानें त्यांनीं जयघोष केला. 'महात्मा

गांधी कीं जय ' आणि दुःखाच्या दरींतून बाहेर पडण्याचा त्यांनीं निर्धार केला. ''

आणि अशा दुःखाच्या दरींमागून दरी साऱ्या हिंदुस्थानभर ब्रिटिश सरकारनें व त्यांच्या गोऱ्या भाईबंदांनीं खोल खोल निर्माण केलेल्या होत्या. चंपारण्य ही तशीच एक दरी. त्यांतील शेतकरीवर्ग दीर्घकाल किंचाळत होता. पण त्यांची किंकाळी ऐकली फक्त गांधींनींच. ता. १० एप्रिल १९१७ रोजीं गांधीजी पाटणा येथें जाऊन थडकले. चंपारण्यांतील शेतकऱ्यांच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठीं ते निघाले. आपला त्राता आला असें मानून मुझफरपूर येथील लोकांनी त्यांना पंचारतींनीं ओवाळलें, त्यांची गाडी स्वतः ओढली.

सरकारला गांधीजींचें हें स्वागत शल्यासारखें बोचूं लागलें. उसांचे व निळीचे मळे युरोपिअन लोकांच्या ताब्यांत होते. ते मळेवाले हिंदी शेतकऱ्यांना छळीत–लुबाडीत–मारीत. सुमारें पंचावन्न कर मळेवाल्यांनीं शेतकऱ्यांवर बसविले होते. त्या सर्वांची चौकशी करण्यासाठीं गांधीजी जसौलीपट्टी या खेड्याकडे जावयास निघाले.हत्ती हेंच वाहन. वैशाखाचें कडक ऊन. धूळ व वाळू अंगावर घेत घेत, तीन तासांत नऊ मैलांचा प्रवास गांधीजींनी केला. तेथें सरकारनें त्यांना चंपारण्यांत जाण्यास मनाई करणारा हुकूम बजावला. आफ्रिकेंतील जुलमाचे हालाहल पचविणाऱ्या गांधीजींना ही सरकारी बंदी कशी अडविणार ! त्यांनीं तो हुकूम मोडण्याचें ठरविलें. शेंकडों शेतकऱ्यांच्या कहाण्या ते लिहून घेऊं लागले. गांधीजींवर खटला भरला. तेव्हां त्यांनीं न्यायमंदिरांत स्पष्ट सांगितलें ' मी गुन्हेगार आहे. मी चंपारण्य सोडून जाऊं शकत नाहीं. तेथें जनसेवा करणें हें माझें कर्तव्य आहे.'' सरकारनें गांधीजींवरील खटला काढून घेतला. गांधीजींचें कार्य पुढें चालूं राहिलें. ८५० खेड्यांतील आठ हजार शेतकऱ्यांच्या तक्रारी त्यांचेजवळ लिहून तयार झाल्या. शेतकरी धीट बनले. मळेवाल्यांचे धाबे दणाणलें. त्यांनीं गांधींना ठार मारण्याचा बेत केला.

हें ऐकतांच एक दिवस गांधीजी एकटेच त्याच्या बंगल्यावर गेले आणि म्हणाले: ' मी ऐकतों कीं आपण मला ठार मारण्यासाठीं मारेकरी ठेवले आहेत. म्हणून कोणाला सांगितल्याशिवाय एकटाच आलों आहें. मला मारा. ' बिचारा गोरा गार झाला !

ता. १३ जून १९१७ रोजीं सरकारनें चौकशी–समिती नेमली. तिच्यांत गांधीजींनाही घेतले. दहा दहा हजार शेतकरी समितीच्या कार्यालया-जवळ जमत. समितीच्या शिफारशीप्रमाणें सरकारनें ता. १८ आक्टोबर रोजीं असें जाहीर केलें कीं, " शंभर वर्षें चालत आलेला तीन कठियांचा कायदा रद्द होईल. खंडवाढहि कमी होईल. वेठबिगारहि रद्द होईल. " गांधीजींच्या सत्याग्रहाचा स्वदेशांत हा पहिला प्रचंड विजय होय.

चंपारण्यांतील सहा महिन्यांच्या सत्याग्रहाला पूर्ण यश मिळाल्यामुळें गांधीजींचें नांव हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यापर्यंत जाऊन पोंचलें. अहमदा-बादच्या मजुरांनीं त्यांचा धांवा केला. मजुरांचे पगार तुटपुंजे होते. त्यांतच १९१८ सालची युद्धजन्य महागाई शिगेस पोहोंचली. तरीसुद्धां गिरणी-वाल्यांनीं त्यांच्या प्राप्तींत कपात केली ! प्लेगाच्या निमित्तानें मजुरांना १९१७ च्या ऑगस्टपासून शें. ७० टक्के बोनस मिळे. तों रद्द करण्याचा घाट गिरणीवाल्यांनी घातला. पन्नास हजार मजूर खवळले. संपाचे बेत त्यांच्या डोक्यांत घोळूं लागले. हिंसेचे विचार त्यांच्या चित्तांत खेळूं लागले. गिरणीमालकांनीं २० टक्के महागाईभत्ता देण्याचें जाहीर केलें. पण त्यानें कोण संतुष्ट होणार ? कलेक्टरला लवाद नेमण्यांत आलें.

पण मालकवर्गानें लवादांतून आपलें अंग काढून घेतलें. तथापि गांधीजींनीं आपली स्वतंत्र चौकशी चालविली. श्री. वल्लभभाई पटेल व श्री. शंकर-लाल बँकर यांचें साहाय्य त्यांनीं घेतलें. चौकशीअंती गांधीजींना आढळलें कीं, शेंकडा ३५ टक्के पगारवाढ करणें उभयपक्षीं योग्य आहे. मालकवर्ग वीस टक्क्यांच्या पुढें पाऊल टाकीना. मजुरांनीं सत्याग्रह करण्याचें ठरविलें.

शांततेनें वागणें व स्वावलंबनानें जगणें या दोन अटी गांधीजींनीं त्यांना घातल्या. दहा दहा हजार मजूर नदीकांठावर सभा भरवूं लागले.—अहमदाबाद शहरांतून मिरवणुकी काढूं लागले. असे एक, दोन...पांच, दहा... पंधरा, वीस—दिवसांमागून दिवस चालले. मजुरांचे प्राण कंठाशीं आले. मालकांची वीस टक्के पगारवाढ घेण्याचें त्यांनीं नाइलाजानें ठरविलें. कांहीं तापट डोक्यांचे मजूर भडकले!

संपाचा बाविसावा दिवस होता. सकाळचा प्रहर होता. मजुरांची सभा नित्याप्रमाणें भरली होती. फक्त हजार दोनहजार मजूर जमले होते आणि तेही टेकीस आलेले, निराश झालेले, शरण जाणारे. त्यांना उद्देशून भाषण करतां करतां गांधीजी एकदम बोलून गेले, "मजूर जर संप टिकवणार नाहींत तर मी उपवास करीन."

"तुम्ही नका, आम्ही उपवास करतों, आम्ही प्रतिज्ञा पाळतों—संप टिकवतो." मजूर म्हणाले. त्यांच्या डोळ्यांतून अश्रु गळाले.

पण गांधीजींचें उपोषण सुरूं झालें. मजुरांचें ढासळणारें धैर्य खडें राहिलें. सत्याग्रहाश्रमामध्यें रेती टाकण्याचें काम गांधीजींनीं मजुरांना दिलें. त्यामुळें मजुरांची उपासमार टळली. तीन दिवसांत गांधीजींच्या उपोषणाला यश आलें. मालकांनीं ३५ टक्के पगारवाढ मान्य केली, एवढेंच नव्हें तर मजुरांना मिठाई वांटली. पुन्हां असे तंटे होऊं नयेत म्हणून 'मजूर-महाजन' नांवाची संस्था स्थापन करण्यांत आली. साऱ्या जगांत ती अलौकिक आहे.

गुजरातमधील कामगारांची अशी सेवा करून गांधीजी मोकळे होतात न होतात तोंच तेथील शेतकऱ्यांची हांक त्यांच्या कानीं आली. खेडा जिल्हा. त्यांत सहाशें खेडीं. पिकें बुडालीं. दुष्काळ पसरला. तरी सरकारनें सारावसूली चालूच ठेवली. चार लाख रुपये सारा वसूल करण्यासाठीं तीन कोटी रुपयांची शेतकऱ्यांची जमीन जप्त करण्याचा सरकारी अधिका-

ऱ्यांनीं निर्धार केला. पांचशें खेड्यांत पीक चार आण्यांखालीं असतां सारा सक्तीनें वसूल करण्यांत येऊं लागला. शेतकऱ्यांनीं दागिने विकले, गुरेंढोरें विकलीं, ते हवालदील झाले. ता. २२ मार्च १९१८ रोजीं नडियाद येथें गांधीजींनीं शेतकऱ्यांची सभा भरविली. सत्याग्रहाचा संजीवनी मंत्र दिला. दोनशें शेतकऱ्यांनीं सारा न देण्याची प्रतिज्ञा केली. अधिकाऱ्यांनीं खूप दमदाटी दिली. पण सत्याग्रहाला पराभव माहीत नसतो. सहा महिन्यांनंतर सरकारनें जाहीर केलें कीं, गरीब शेतकऱ्यांकडून सारा घेतला जाणार नाहीं.

गांधीजींच्या सत्याग्रहाचा स्वदेशांतील हा दुसरा विजय होय.

## : ५ : असहकारितेचा संग्राम

तोच खेडा जिल्हा. तेच गुजराती शेतकरी आणि तेच गांधीजी ! पण पूर्वी शेतकरी गांधीजींना आपल्या गाड्या मोफत देत. आतां भाडें दिलें तरी गांधीजींना गाड्या मिळेनात. सत्याग्रहाच्या वेळीं गांधीजींना एका स्वयंसेवकाची जरूरी असेल तर तीन मिळत, पण आतां ऐन उन्हाळ्यांत रोज वीसवीस मैल, पायीं मजल मारली तरी त्यांना स्वयंसेवक मिळणें कठीण गेलें. स्वयंसेवकांना लोकांकडून जेवण मिळणेंही कठीण गेलें. हा जमीन–अस्मानाचा फरक कां पडला ?

पूर्वी गांधीजी गेले होते ते शेतकऱ्यांचा सारा माफ करून देण्यासाठीं. आतां ते गेले होते ते युद्धासाठीं रिक्रूटभरती करण्याला. लोकांना वाटे हें महायुद्ध आहे इंग्रजांचें–आपल्याला छळणाऱ्या, पिळणाऱ्या इंग्रजांचें ! त्यांना आपण मदत करणें पाप. उलट गांधीजींना वाटे, इंग्लंड म्हणजे

उदारमतवादित्वाचे आगर—लोकशाहीचें माहेर. त्याचा नाश महायुद्धांत होणें ही जगाची हानी आहे. ती टाळून व इंग्लंडला सुरक्षित ठेवून नंतरच त्यांच्याकडून आपण आपलें स्वराज्य मिळविणें हें न्यायाचें. हिंदुस्थानांतील कांही ब्रिटिश अधिकारी अन्यायी व जुलमी असले, तरी खुद्द इंग्लंडांतील सरकार जगांत अत्यंत उदार व लोकशाहीचें आहे, असा गांधीजींचा विश्वास होता. म्हणून ते रिक्रूट—भरती करूं लागले.

दिल्ली येथें व्हाईसरॉयांनीं युद्धपरिषद भरविली. तिला गांधीजी हजर राहिले. रिक्रूट—भरतीच्या ठरावाला त्यांनी दुजोरा दिला पण तो हिंदुस्थानी भाषेंत—इंग्रजींत नव्हे. गुजरातमध्येंही युद्धपरिषद भरली तिलाही गांधीजी गेले होते. हत्याराचा कायदा सरकारनें रद्द करावा असें मत त्यांनीं मांडलें. गांधीजी सहकार्यासाठीं प्राण टाकीत होते. युद्धाच्या खिंडींत अडकलेल्या इंग्रज सरकारनें त्यांच्या सहकार्याचा बिंदुन्‌बिंदु पिळून घेतला. पण युद्ध संपलें, इंग्लंड विजयी झाले आणि मग त्यांनीं हिंदुस्थानला लाथेनें ठोकरलें.

हिंदी लोकांना काय स्वराज्य पाहिजे ? द्विदल राज्य—पद्धतीचा मॉटफर्ड रिपोर्ट सरकारनें त्यांच्या तोंडावर फेंकला. मुसलमानांना आपला खलिफा स्वतंत्र रहावा असें वाटतें ? ब्रिटिश सरकारनें खलिफाच्या छत्राखालील मुलखाचे तुकडे करून वाटून टाकले. हिंदुस्थानला युद्धसहकार्याबद्दल आणखी कांही बक्षिसी हवी ? ब्रिटिश सरकारनें रौलट रिपोर्ट बहाल केला. १९१८ च्या जूनमध्यें मॉटफर्ड रिपोर्ट व जुलैमध्यें रौलट रिपोर्ट—अमावास्येच्या पोटचीं जुळीं भावंडेंच ! पहिल्या रिपोर्टानें स्वराज्य दुरावलें, तर दुसऱ्या रिपोर्टानें नागरिक स्वातंत्र्याची राखरांगोळी झाली.

या जुळ्या भावंडांचा निषेध सर्वांनीं केला. पण विजयानें बेहोष झालेलें सरकार निषेधाच्या शब्दानें जागें थोडेंच होणार ! सरकारला प्रतिकार करण्याची लोकांची मर्यादा निषेध करण्यापर्यंतच होती. पुढें रस्ता बंद ! तो खोलण्याची शक्ति एकट्या गांधीजींच्या अंगींच होती. पण ते त्या वेळीं

अतिशय आजारी होते. त्यांच्या समाचाराला वल्लभभाई अहमदाबादेस गेले. रौलट रिपोर्टचा प्रश्न सहजच निघाला. गांधीजींचा मंत्र एकच. ते म्हणाले, "आपण सत्याग्रह हातीं घेतला पाहिजे. अंथरुणाला खिळलेला नसतों तर मी एकटाहि झुंजलों असतों. इतर मागून येऊन मिळतील अशी आशा केली असती."

सेवा हेंच गांधीजींना खरें औषध. ते लौकरच बरे झाले. सत्याग्रह-समितीची स्थापना त्यांनीं केली. पंधरा दिवसाचे आंत मुंबई इलाख्यांतून सहाशें स्त्री-पुरुष सत्याग्रह करण्यास पुढें आले. त्यांना सत्याग्रहाची दीक्षा देतांना गांधीजींनीं सांगितलें," "**हिंसा वर्ज्य माना. 'जशास तसें' हें तत्त्व टाकून द्या. द्वेषाला द्वेष, हिंसेला हिंसा, दुष्टपणाला दुष्टपणा हें धोरण सोडा. क्रोधाला प्रेमानें, अत्याचाराला अहिंसेनें व अपकाराला उपकारानें जिंकण्यास शिका. त्यायोगें आपला हृदयपालट झाला पाहिजे म्हणजे सरकारचाहि हृदयपालट होईल. राजकारणांत धर्माचा प्रवेश करण्याचा हा प्रयोग आहे.**"

या सहा ओळींत गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचें सार, जीवनाचें ध्येय, सामावलेलें आहे. ता. ६ एप्रिल रोजीं सर्व हिंदुस्थानांत "सत्याग्रह–दिन" पाळला गेला. लाखों लोकांनीं उपवास केला. हजारों गांवांनीं हरताळ पाळला. शेंकडों ठिकाणीं सभा भरल्या. हिंदुमुसलमानांचें ऐक्य दिसूं लागलें. दिल्लींतील जुम्मा मशिदीमध्यें स्वामी श्रद्धानंदांचें भाषण झालें. मुंबई येथील मशिदींत गांधीजींचे भाषण झालें. सरकारचें धाबे दणाणलें. पोलिसांनीं गोळीबार केला. पांच ठार व पंचवीस जखमी झाले. मिठाचा कायदा तोडण्याची सूचना गांधींनीं दिली. 'हिंद-स्वराज्य' व 'सर्वोदय' हीं त्यांचीं पुस्तकें सरकारनें जप्त केलीं. तरी तीं विकून गांधीजींनीं, सरोजिनीबाईंनीं, आणि इतर अनेकांनीं कायदेभंग केला. चार आण्यांच्या पुस्तकाला पन्नास रुपये किंमत आली आणि वर कायदेभंगाचें पुण्य! परक्या सरकारचे जुलमी कायदे तोडणें म्हणजे पारतंत्र्याचीं एक शृंखलाच

तोडण्यासारखे होते. सरकारनें गांधीजींना अटक केली. ते पंजाबकडे निघाले होते. त्यांना सरकारनें मालगाडींतून मुंबईस आणलें व सोडून दिलें.

गांधीजींना पंजाबांत जाण्यास मनाई झाली हें कळतांच लोक खवळले. त्यांनीं तारा तोडल्या. अहमदाबादेस मजुरांनीं दंगा केला. एका शिपायाला ठार केलें. नडियाद शहरीं रेल्वेचे रूळही उखडण्याचा प्रयत्न झाला. लोकांनीं सरकारी इमारती जाळल्या; शस्त्रें हिसकावून घेतलीं. दुकानें लुटलीं.

" माझ्या शरिरांत कोणी कट्यार खुपसल्याइतकें दुःख मला होत आहे. " असें म्हणून गांधीजींनीं लोकांच्या अत्याचाराचा निषेध केला.—बहात्तर तासांचा उपवासही केला.—अहिंसक नसलेल्या लोकांचे हातीं सत्याग्रहाचें शस्त्र देण्यांत आपली ' हिमालयाएवढी चूक ' झाली असेंहि गांधीजींनीं बिनदिक्कतपणें जगजाहीर केलें. अहिंसा नाहीं तर सत्याग्रह नाहीं आणि जनतेंत सहकारिता नाहीं तर सरकारशीं असहकारिता सफल होणार नाहीं हा गांधीजींचा अभेद्य सिद्धांत.

हिंदी जनतेनें जो नारसिंह अवतार प्रगट केला तो पाहून इंग्रज आधिकारी गांगरून गेले. पंजाबच्या अधिकाऱ्यांचें तर डोकेंच फिरलें. शेंकडा ८० टक्के सैनिक पंजाबमधून जात असत. त्या प्रांतांतील राजनिष्ठा ढासळली तर आपलें साम्राज्यच बुडेल अशी भीति त्यांना वाटली. त्या भीतींतून एक अमानुष अत्याचार जन्मास आला.

अमृतसर हें पंजाबमधील एक शहर. तेथें जालियनवाला बाग नांवाची सभा भरण्याची जागा. ता. १३ एप्रिल रोजीं पाडवा होता. त्यानिमित्त जत्रा भरली होती. खेड्यापाड्यांतून हजारों लोक जमले होते. संध्याकाळीं जालियनवाला बागेंत सभा भरली. वीस हजार स्त्रीपुरुष जमले होतें. सभागृहाला एकच दार होतें. त्या दारापाशीं लष्करी गाडें घेऊन जनरल डायर उभा राहिला. आणि त्यानें एकदम हुकूम दिला, "गोळ्या झाडा."

सोळाशें गोळ्या निःशस्त्र नागरिकांवर उडाल्या. भिंतीवरून उड्या मारून जाणाऱ्या खेडुतावरहि गोळीबार झाला. एकूण चारशें इसम ठार झाले. व बाराशें जखमी झाले ! हे आंकडे सरकारचे ! ! खरे किती. देव जाणे !!! याहीपेक्षां पुढें लोकांना फटके मारणें, भुईवरून सरपटत जावयास लावणें, झाडावर टांगणें, इत्यादि नाना प्रकारांनीं हिंदी लोकांना ‘ दे माय धरणी ठाय ’ करण्यांत आलें.

हिंदुस्थानचें विश्वस्त म्हणजे इंग्लंड. तेथील पार्लमेंटला या ‘ नादिरशाहीची’ वर्दी मिळाली चार महिन्यांनंतर, आणि वर्दी मिळाल्यावर तरी दाद काय घेतली, तर लॉर्डांच्या सभेनें डायरला निर्दोषी ठरविलें आणि इंग्लिश जनतेनें त्याला एक थैली अर्पण केली ! पंजाबचे गव्हर्नर ओडवायर यांनाहि लष्करभरती–कमिशनच्या अध्यक्षांची जागा देऊन त्यांचा सन्मान केला. अमेरिकेला जालियनवाला बागेंतील कत्तल कळण्यास आठ महिने लागले ! सरकारनें चौकशीसाठीं हंटरकमिटी नेमली. तिनें ओडवायरची पाठच थोपटली.

राष्ट्रसभेनें पं. मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखालीं एक चौकशी-समिति नेमली. बॅ. दास, बॅ. जयकर, गांधी व आब्बास तय्यबजी हे चौघेजण सभासद होते. त्यांनीं तीन महिने हिंडून १७०० लोकांच्या साक्षी घेतल्या व ६५० लोकांच्या जबान्या प्रसिद्ध केल्या. त्या वेळीं गांधीजींनीं घेतलेल्या परिश्रमाचें वर्णन काकासाहेब कालेलकर पुढीलप्रमाणें करतातः—

“ ही सगळी सामुग्री घेऊन बापू आश्रमांत आले आणि रिपोर्ट लिहूं लागले. अत्याचारांच्या निवेदनांनीं ते सारखे धुमसत होते. रिपोर्ट लिहिण्याचें काम रात्रंदिवस चाललें. अक्षरशः दिवस आणि रात्र चोवीसहि तास ते लिहीत होते. रात्रीं दोन अडीच तास काय ते झोपत असतील तेवढे. दुपारीं कधीं कधीं लिहितां लिहितां ते इतके थकून जात कीं, शरीर काम करण्याचें नाकारी. एक दिवस डाव्या हातांत कागद, उजव्या हातांत लेखणी, असें

तक्क्याला टेकून झोपले आहेत, तोंड उघडें आहे, असें मी त्यांना पाहिलें. थोडेच क्षण गेले असतील. एकदम चपापून उठले. जणूं एखादा गुन्हा करितांना पकडले गेले असावेत! उठले आणि पुन्हां लिहूं लागले."

या चौकशीचें फल काय? तर सरकारच्या सहकार्यासाठीं प्राण पाखडणारे गांधीजी पूर्णपणें असहकारितावादी झाले. अपुऱ्या, असमाधानकारक व निराशाजनक अशा मॉंटफर्ड सुधारणा, जालियनवाला बागेतील राक्षसी कत्तल आणि खलिफाचें सत्ताहरण. या तीन अन्यायांमुळें गांधीजी क्षुब्ध झाले आणि त्याबरोबर सारें राष्ट्र संतापानें वेडें झालें. अमृतसरच्या राष्ट्र-सभेनें या तिन्ही आपत्तींचा विचार केला. त्या सभेंत लो. टिळक व म. गांधी या दोघांनींहि भाग घेतला होता. त्या वेळेपर्यंत गांधीजींचा ब्रिटिश सरकारावर थोडाफार विश्वास उरलेला होता—सहकार्याची बुद्धि थोडीफार शिल्लक होती. पण १९२० च्या सप्टेंबरमध्यें कलकत्ता येथें राष्ट्रसभा भरली. तेव्हां सरकारनें गांधीजींच्या या साऱ्या विश्वासाचा व सहकार्यबुद्धीचा चेंदा-मेंदा करून टाकलेला होता.

ता. १ ऑगस्ट १९२० रोजीं लो. टिळक अस्तंगत झाले. त्याच दिवशीं गांधीजींची असहकारितेची चळवळ उदयास आली. कोर्ट—कॉलेज—कौन्सिल यांवर बहिष्कार घालण्याचा आदेश कलकत्ता कॉंग्रेसनें राष्ट्राला दिला. गांधीजींनीं आश्वासन दिलें, "असहकारितेचा कार्यक्रम तुम्ही नेटानें अंमलांत आणाल तर एक वर्षांत स्वराज्य मिळेल."

'एक वर्षांत स्वराज्य!' या आशादायक मंत्रानें सारें राष्ट्र स्फुरण पावलें. शाळा ओस पडल्या, कोर्टें रिकामीं राहिलीं. कौन्सिलांतून राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं पाय बाहेर टाकले. नागपूरच्या राष्ट्रसभेंत सर्व राष्ट्रानें गांधीजींना पाठिंबा दिला. "राष्ट्रसभेचें उद्दिष्ट भारतीय प्रजेनें सर्व न्याय्य व शांतता-पूर्ण साधनांनीं स्वराज्य मिळवावें असें आहे." असा ठराव गांधीजींनीं मांडला व तो मंजूर झाला. गांधीजींनीं बेझवाडा येथें अशी प्रतिज्ञा केली

कीं, " तीन महिन्यांत एक कोट रुपये टिळक स्वराज्य फंड जमवायचा, कॉंग्रेसचे एक कोटी सभासद करायचे. " आणि वीस लाख चरखे चालू करायचे. जनतेनें त्यांच्या हांकेस 'ओ' दिली. आणि हे तिन्ही कार्यक्रम बहुशः सिद्धीस नेले.

दीडशें वर्षे जित व शांत राहिलेला हिंदुस्थान आतां आपले डोळे चोळीत आहे, हात पाय हालवीत आहे, किंबहुना दांतओठ खाऊन हात उगारीत आहे हें पाहून इंग्लंडच्या बादशहाचे चुलते हिंदुस्थानांत आले व गोड बोलून गेले. नंतर आले युवराज. त्यांना दिसले सारे ओसाड रस्ते, परदेशी कपड्यांच्या पेटलेल्या होळया. मुंबईस दंगल झाली. त्रेपन्न माणसें ठार झालीं, त्याचें प्रायश्चित्त म्हणून गांधींनीं चार दिवस उपोषण केलें. दंगल शमली. दंग्यांत एके ठिकाणीं दोन पोलीस जखमी होऊन पडले होते, त्यांना गांधींनीं पाणी पाजलें व दवाखान्यांत पाठविलें. सत्याग्रह्याची प्रतिपक्षाशीं वागणूक अशी असते !

## : ६ : आरोपी कोण ?

जसा खेडा तसाच सुरत हा गुजरातेंतील एक जिल्हा. त्यांतील बार्डोली हा एक तालुका. त्याची लोकवस्ती ८७ हजार. तेथले शेतकरी म्हणजे वल्लभभाईंचे करोल सैनिक. गांधीजींचा शब्द झेलण्यास ते तयार. त्यांची संघटना पोलादासारखी भक्कम. अशा बार्डोली तालुक्यांत कायदेभंग करण्याचें गांधीजींनीं ठरविलें.

" सभा-बंदी, स्वयंसेवक-बंदी व मुद्रण-नियंत्रण हे नवे निर्बंध सात दिवसांच्या आंत काढून टाका, नाहींतर मी बार्डोलींत कायदेभंग सुरू

करीन" असा निर्वाणीचा खलिता गांधींनीं ता. १ फेब्रुवारी १९२२ रोजीं व्हाईसरॉय लॉर्ड रीडिंग यांना पाठविला.

"गांधींची मागणी विचार करण्याच्या लायकीचीहि नाहीं" असें व्हाईसरॉयनें जाहीर केलें आणि बजावलें, 'कायदेभंग सुरू झाला तर आम्ही कडक उपायांनीं हाणून पाडूं.' पण गांधींनीं आपला कायदेभंगाचा निर्धार कायम असल्याचें जाहीर केलें. त्याप्रमाणें जय्यत तयारी झाली. साऱ्या देशांतील जनतेचे डोळे आशेनें व अधिकाऱ्यांचे डोळे भीतीनें बार्डोलीच्या अभूतपूर्व लढ्याकडे लागले.

पण ता. ५ फेब्रुवारी रोजीं, संयुक्त प्रांतांतील, गोरखपूर जिल्ह्यांतील, चौरीचुरा गांवीं, राष्ट्रसभेची मिरवणूक निघाली असतां, कांहीं गुंडांनीं पोलीस-चौकीवर हल्ला केला व ती जाळून टाकली. एक सब्-इन्स्पेक्टर व वीस पोलीस जळून खाक झाले. सातशें मैलांवरील ह्या हिंसेमुळें गांधींनीं बार्डोलींतील कायदेभंग रद्द ठेवला. कारण अहिंसा हा सत्याग्रहाचा प्राण आहे. अहिंसेचें बंधन गांधीजींनीं आपल्या चळवळीवर इतक्या कडकपणें घातलें नसतें आणि त्यांच्या अनुयायांनीं हिंसा-अत्याचार केले असते, तर सामर्थ्यशाली ब्रिटिश सरकारनें गांधीजींना एकहि राष्ट्रव्यापी चळवळ करूं दिली नसती.

बार्डोलीचा बार बारगळला, त्यामुळें गांधींचें राष्ट्रांतील वजन ओसरलें असें सरकारला वाटलें. म्हणून त्यांनीं त्यांना तुरुंगांत टाकण्याचें ठरविलें. 'यंग इंडिया' या त्यांच्या पत्रांतील लेख म्हणजे बायबलमधील भक्तिगीता-सारखें सोपें, प्रांजल व सत्यपूर्ण. पण त्यांतीलच कोणते तरी तीन लेख सरकारनें उचलले, आणि त्या लेखांवरून त्यांच्यावर खटला भरला.

ता. १० मार्चचा दिवस. साबरमतीच्या सत्याग्रहाश्रमांत गांधीजींनीं संध्याकाळची प्रार्थना केली. रात्रीचे दहा वाजले. पोलीस सुपरिंटेंडेंट आले. सारे आश्रमवासीजन गांधीजींभोंवतीं गोळा झाले. त्यांपैकीं प्रत्ये-

काशीं गांधीजी दोन-दोन, चार-चार शब्द बोलले. मुलांबरोबर हंसत त्यांनीं विनोदहि केला. "आतां नरसी मेहताचें गीत म्हणा पाहूं" गांधीजींनीं सांगितलें. लगेच "वैष्णव जन जो तेने कहिये जो पीडपराई जाने रे" या गीताचे शांत निनाद सर्वत्र पसरले.

गीत संपलें. गांधीजींनीं सर्वांना आशीर्वाद दिले. आणि त्या प्रशांत व पवित्र वातावरणांत ते आश्रमांतून निघून सरकारी मोटारींत जाऊन बसले. साबरमतीच्या तुरुंगांत त्यांना पोहोंचविण्यांत आलें.

दुसरे दिवशीं गांधीजी व शंकरलाल बँकर या दोघांवर खटला सुरू झाला. आरोप राजद्रोहाचा होता.

कोर्टांत गांधीजींना आणण्यांत आलें, तेव्हां सर्व अधिकारीवर्ग उठून उभा राहिला. सरकारी वकील आले. त्यांनीं मान लववून गांधीजींना अभिवादन केलें. आरोपपत्र वाचण्यांत आलें.

"धंदा काय ?"

"शेतकरी व विणकरी."

"गुन्हा कबूल आहे काय ?"

"होय."

"शिक्षा सांगण्यापूर्वी कांहीं बोलावयाचें आहे काय ?"

"होय." गांधीजींनीं धीरगंभीर स्वरांत उत्तर दिलें. आणि मग त्या अपूर्व खटल्यांतील गांधीजींची अभूतपूर्व जबानी सुरू झाली. सत्य, शांति, न्याय व दया या देवता कान टवकारून ती जबानी ऐकत होत्या. गांधीजी म्हणाले, "प्रचालित राजसत्तेविरुद्ध अप्रीति फैलावण्याचें मला वेडच लागलें आहे. मुंबई, मद्रास, चौरीचुरा इत्यादि ठिकाणच्या घटनांची सर्व जबाबदारी मी माझ्या शिरावर घेतों. त्या सर्व आततायी अत्याचारांचें चिंतन करण्यांत, आणि चिंतन करतां करतां अश्रु ढाळण्यांत, माझ्या रात्रीच्या रात्री गेल्या आहेत. त्यांची जबाबदारी मी टाळूं शकत नाहीं. मी

विस्तवाशीं खेळ खेळत आहे, याची मला जाणीव होती. तरी मीं ती जोखीम पत्करली. आणि मला मोकळें सोडलें तर पुन्हां मी ती जोखीम पत्करीनच. अत्याचार मला नको आहेत. अहिंसा हें माझें आद्य ब्रीद आहे— अंतिम ध्येय आहे. पण मला कोणता तरी एक मार्ग पत्करणें भाग होतें. माझ्या देशाची अपार हानि करणाऱ्या राज्यपद्धतीला मी मान वाकवूं का त्या हानीचें सत्यस्वरूप माझ्या मुखानें कळतांच जनसमुदाय खवळून अत्याचार करूं लागेल तो मी सहन करूं ? असा प्रश्न मजपुढें होता. मी पूर्वीं कट्टा राजनिष्ठ व सहकारितावादी होतो. आतां सरकारविरुद्ध अप्रीति पसरविणारा निःशेष असहकारितावादी बनलों आहे.

"तुम्हीं उघड्या डोळयांनीं खेड्यांत हिंडाल तर तुम्हांला खेडवळ जनतेचें नुसते हाडांचे सांगाडे दिसतील ! या भीषण दारिद्र्याचें चित्र, आंकड्यांच्या जादुगारीनें किंवा भाषेच्या युक्तिवादानें, पुसून टाकणें पूर्णपणें अशक्य आहे. स्वर्गांत जर देव असेल तर त्याच्यापुढें, इतिहासांत तोड नाहीं अशा या अमानुष गुन्ह्याबद्दल, हिंदुस्थानांतील शहरवासियांना आणि इंग्लंड देशाला जाब द्यावा लागेल यांत मला मुळींच शंका वाटत नाहीं. सर्वांत दुःखाची गोष्ट ही आहे कीं, येथील हिंदी व इंग्रज सरकारी अधिकाऱ्यांना आपल्या हातून हा गुन्हा घडत आहे याची जाणीवसुद्धां नाहीं.

"अशा या दुःस्थितींतून बाहेर पडण्यासाठीं इंग्लंड व हिंदुस्थान या दोघांना असहकारितेचा मार्ग दाखवून मीं सेवाच केली आहे."

न्या. ब्रूमफील्ड चकित झाले. सत्याची ही तेजस्वी ज्योत पाहून त्यांचे डोळे दिपून गेले. सॉक्रेटीस, येशू ख्रिस्त इत्यादि विभूतींचा धीरोदात्तपणा गांधीजींच्या शब्दाशब्दांतून ओथंबलेला आहे हें ओळखण्याइतकें त्यांचें मन मोठें होतें. खटल्याचा निकाल सांगण्यापूर्वी ते म्हणाले, "मी यापूर्वी ज्यांचे खटले चालविले असतील, किंवा यापुढें ज्यांचे खटले मीं चालविण्याचा संभव आहे, त्या माणसापेक्षां तुम्ही निराळ्या कोटींतील आहांत.

तुम्ही आपल्या कोट्यवधि देशबांधवांच्या दृष्टीनें थोर देशभक्त व महान् नेते आहांत ही वस्तुस्थिति विसरणें केवळ अशक्य आहे. जे लोक राजकारणांत आपल्याशीं सहमत नाहींत तेदेखील आपल्याकडे उच्च ध्येयाचा आणि उदात्त जीवनाचा आदर्श याच दृष्टीनें पहातात. मला मात्र आपल्याकडे एकाच दृष्टीनें पहावयाचें आहे. आणि ती दृष्टि म्हणजे कायदेभंग करून सरकारचा भयंकर गुन्हा केलेला एक माणूस. ''

लो. टिळकांच्या शिक्षेचें स्मरण देऊन न्यायमूर्तींनीं गांधीजींना सहा वर्षें साधी कैद अशी शिक्षा सांगितली. ती सांगतांना तें असें म्हणण्यास विसरले नाहींत कीं, " हिंदुस्थानांतील वातावरण बदलून तुमच्या शिक्षेची मुदत कमी करणें आणि तुम्हांला मुदतीपूर्वी मुक्त करणें सरकारला शक्य झालें तर माझ्याइतका आनंद दुसऱ्या कोणासच होणार नाहीं. ''

शिक्षा ऐकतांच गांधीजी उठून उभे राहिले आणि न्यायमूर्तींचे आभार मानून म्हणाले, " लोकमान्य टिळकांच्या नांवाशीं माझें नांव जोडलें जाणें हा माझा बहुमान आहे. '' योगायोग असा कीं, या समान शिक्षा समान अपराधासाठीं (!) मिळाल्या. तेव्हां टिळक-गांधीजींचें वयहि समान म्हणजे ५३ च होतें.

असा खटला, असा न्यायमूर्ति आणि असा आरोपी हिंदुस्थानांत पूर्वी कधीं दिसलाच नाहीं. हें अपूर्व दृश्य पाहण्यास पंडित जवाहरलाल योगायोगानें हजर होते. सरकारनें स्वयंसेवक-संघांना बंदी केली होती. त्याच्या निषेधार्थ मोतीलाल नेहरूंनीं स्वयंसेवक म्हणून आपलें नांव दाखल केलें होतें. त्यांना शिक्षा झाली होती. जवाहरलालांनीं हरताळ पाडण्याचीं हस्तपत्रकें वांटलीं, म्हणून त्यांना सहा महिन्यांची शिक्षा झाली. तीन महिने तुरुंगांत काढल्यानंतर सरकारनें जवाहरलालना सोडलें आणि कळविलें कीं, हस्तपत्रकें वाटणें हा गुन्हा होत नाहीं. तुरुंगांतून सुटतांच जवाहरलाल साबरमतीला गेले. कोर्टांत हजर राहिले. त्यांनीं तें लोकोत्तर दृश्य पाहिलें. आत्मचरि-

त्रांत ते लिहितात, " ती एक संस्मरणीय घटना होती. ज्यांनीं ती पाहिली त्याच्या स्मृतींतून ती कधींही नाहींशी होणार नाहीं. गांधीजींचा जबाब ऐकून आमच्या भावना हेलावल्या."

सौ. सरोजिनीबाई नायडू यांना येशू ख्रिस्ताच्या खटल्याची आठवण झाली. " कंगालाच्या वृत्तीनें कंगालाच्या दाराशीं जाणारा महात्मा. " असें वर्णन त्यांनीं गांधीजींचें केलें.

जवाहरलाल काय, किंवा सरोजिनीबाई काय, गांधीजींच्या शिष्यासारखे-किंबहुना मानसपुत्र व मानसकन्या शोभणारे. पण अमेरिकेंतील ' न्यूयॉर्क कॉल ' या पत्रानें या खटल्यासंबंधीं काय म्हटलें हें ऐकण्यासारखें आहे. तें म्हणतें, " गांधींचें निर्भय पण निरहंकारी भाषण वाचलें म्हणजे असें वाटतें कीं, ब्रिटिश साम्राज्यच पिंजऱ्यांत उभें आहे—गांधी नाहींत. तिरस्करणीय अशा राज्यकारभारालाच गांधी शिक्षा सुनावीत आहेत असा भास होत होता. "

वयाच्या त्रेपन्नाव्या वर्षीं, सहा वर्षांच्या शिक्षेचा भार शिरावर घेऊन, शांत मनानें व हसतमुखानें, गांधीजींनीं येरवड्याच्या तुरुंगांत १९२२च्या मार्च महिन्यांत, प्रथम प्रवेश केला.

तेथें संबंध तुरुंगाच्या अधिकाऱ्यांशीं. ते थोडेच न्यायमूर्तींसारखे गुणग्राहक असणार ! त्यांनीं गांधीजींना चरखा दिला नाहीं, मोकळ्या जागेंत निजण्याची परवानगी दिली नाहीं कीं पाव कापण्यासाठीं चाकू दिला नाहीं. इतर पुढाऱ्यांशीं बोलण्याची मोकळीकहि त्यांना दिलेली नव्हती. गांधीजींनीं अन्नसत्याग्रह केला तेव्हां त्यांना चरखा मिळाला. अशा विपरीत परिस्थितींतहि गांधीजी " अगदीं आनंदी होते—फुलपांखराप्रमाणें स्वच्छंदी होते. " गीता, कुराण, रामायण वगैरे धर्मग्रंथांचें त्यांचें वाचन चालू होतें.

गांधीजींचा मुलगा देवदास व राजगोपालाचार्य त्यांना भेटण्यास तुरुंगांत

आले. त्या दोघांनाहि तुरुंगाधिकाऱ्यांनीं खुर्च्या दिल्या नाहींत. ते दोघे उभे. आणि गांधी तर काय ? बोलून चालून कैदीच ! ते उभेच. देवदासाच्या डोळयांतून अश्रु वाहूं लागले.

गांधीजींच्या दिमतीला आफ्रिकेंतील एक सिद्दी कैदी दिलेला होता. हिंदु किंवा मुसलमान कैदी दिला तर तो गांधीजींची सेवा भक्तिभावानें करील ही सरकारला भीति. पण सिद्दी झाला तरी माणूसच. त्याला एकदां विंचू चावला. तो रडूं लागला. गांधीजींनीं चटकन् दंशाची जागा स्वतः चोखून टाकली. त्याच्या वेदना कमी झाल्या. तो गांधीजींचा दास बनला—सूत कांतूं लागला—कापूस पिंजूं लागला.—पेळू बनवूं लागला. "जें जें भेटे भूत । तें तें मानिजे भगवंत." अशी वृत्ति बाणलेल्या महात्म्याला आपला कोण नि परका कोण !

अशा प्रकारें तुरुंगांतील जीवनांत रस घेत गांधीजी दिवस कंठीत होते. पण ता. १२ जानेवारी १९२४ रोजीं ते आजारी पडले. आंतड्याचा विकार ( अपेंडिसायटिस् ) झाला. शस्त्रक्रिया हाच एक त्यावर उपाय. म्हणून सरकारनें गांधीजींना पुण्यांतील ससून हॉस्पिटलमध्यें नेलें. तेथील सर्जन कर्नल मॅडॉक यांनीं शस्त्रक्रिया केली. ना. शास्त्रीप्रभृति मित्रांशीं गांधीजी शांतपणें बोलत होते. अखेरची निरवानिरव म्हणून त्यांनीं तेथील नोकरांना व नर्सना कपडे वगैरे वांटून टाकले. कारण, शस्त्रक्रिया जोखमीची होती. गांधीजींना क्लोरोफॉर्म देण्यांत आला. आणि आतां कर्नल मॅडॉक शस्त्रक्रिया करणार तोंच—

विजेचे सर्व दिवे एकाएकीं गेले ! सर्वांची धांवपळ झाली. दहापंधरा मेणबत्त्या लावल्या. त्यांच्या क्षीण प्रकाशांतच डॉक्टरांनीं शस्त्रक्रिया यशस्वीपणें पार पाडली.

शस्त्रक्रिया झाली. गांधीजींना अशक्तता आली. ता. ५ फेब्रुवारी रोजीं सरकारनें त्यांना बिनशर्त सोडलें. न्यायमूर्तींची वाणी फळाला आली.

सहा वर्षांऐवजीं दोन वर्षांतच गांधीजी सुटले. नंतर ते मुंबईजवळ जुहू येथें समुद्रकांठीं रहावयास गेले. त्यांच्याशेजारीं एक बंगला भाड्यानें घेऊन मोतीलाल नेहरू राहिले.

मोतीलालांचें मत असें कीं, कायदेमंडळ हीहि स्वातंत्र्ययुद्धाची एक आघाडी आहे, म्हणून आपण त्यांत शिरावें. त्यांनीं दासबाबूंच्या सहकार्यानें 'स्वराज्य पक्ष' स्थापन केला. गांधीजींचें मत याच्या अगदीं विरुद्ध—दोन ध्रुवांइतकें अंतर. पण दोघांची स्नेहबुद्धि दृढ असल्यानें हे मतभेद व मार्गभेद अगदीं शांतपणें आंखले गेले. या शांततेची व गोडव्याची कल्पना संत—वाङ्मयाचे अभ्यासक श्री. आजगांवकर यांनीं दिलेली आहे.

एके दिवशीं सकाळीं ते गांधीजींना भेटावयास गेले. बाहेरच्या पडवींत ते वाट पहात बसले होते. खिन्न मुद्रेनें मान खालीं घालून दास—नेहरू तेथून बाहेर पडले. ते कां आले होते आणि परत कसे गेले याची कांहींच कल्पना या संत—सेवकाला नव्हती. बोलावणें येतांच ते आंत गांधीजींच्या भेटीस गेले. तेथें पाहिलें तर गांधीजी नेहमींप्रमाणें शांत, प्रसन्न, हसतमुख. अर्धा-पाऊण तास मराठी संत—कवींविषयीं गांधीजींनीं आजगांवकरांबरोबर चर्चा केली. पुढें दुसरे दिवशीं जेव्हां आजगांवकर वर्तमानपत्र उघडून पहातात, तेव्हां राष्ट्रांतील केवढ्या महान् प्रश्नाचा कटु निर्णय काल लागला हें त्यांच्या मनावर बिंबलें—आणि त्याबरोबरच गांधीजींच्या अंगीं चित्त—साम्याची संत—वृत्ति किती भिनलेली आहे हेंहि त्यांच्या मनावर ठसलें.

देशांत अनेक ठिकाणीं हिंदु—मुसलमानाचे दंगे झाले. गांधीजींनीं दोघांनाहि बंधुभावाचा उपदेश केला. पण तो पालथ्या घड्यावर पाणी ओतण्यासारखा ठरला. म्हणून "परमेश्वराची करुणा भाकण्यासाठीं" गांधीजींनीं ता. १८ सप्टेंबर रोजीं दिल्ली येथें एकवीस दिवसांचें उपोषण सुरू केलें. त्याचा परिणाम म्हणजे दिल्ली येथें ऐक्य-परिषद भरली. तिला

निरानिराळ्या जमातींचे तीनशें प्रतिनिधी हजर राहिले. परिषदेनें एका ठरावानें गांधीजींना जातीय ऐक्य घडविण्याचें आश्वासन दिलें.

त्याच वर्षी डिसेंबरमध्यें बेळगांव येथें राष्ट्रसभा भरली. तिचे अध्यक्ष गांधीजी होते. सर्वांत लहान असें अध्यक्षीय भाषण त्यांनीं केलें. मुत्सद्दया-पेक्षां सेनापतीला शोभणारें तें भाषण होतें. त्यांनीं आपली बारा कलमी स्वराज्य–योजना आपल्या भाषणांत मांडली आणि लोकांना प्रत्यक्ष कार्याचा मार्ग आंखून दिला.

" जरूर तेव्हां इंग्लंडचे संबंध तोडण्याला मी अनमान करणार नाहीं. " अशी घोषणा करून गांधीजी आपल्या भाषणाच्या शेवटीं म्हणाले, "मीं असहकारिता स्थगित केली आहे. कारण आज राष्ट्र त्यासाठीं तयार नाहीं. पण मी स्वतःसाठीं ती थांबविली नाहीं. जोंपर्यंत सरकार आहे तसेंच राहील, तोंपर्यंत माझी असहकारिता राहील. असहकारिता व कायदेभंग हीं दोन सत्याग्रह या एकाच वृक्षांचीं फळें होत. सत्याग्रह हा माझा कल्पद्रुम आहे. सत्याग्रह म्हणजे सत्याचा शोध. आणि सत्य म्हणजे परमेश्वर. तो सत्यरूप परमेश्वर पाहण्यासाठीं अहिंसेच्या प्रकाशाची गरज असते. माझें स्वराज्य हें त्या सत्याचेंच एक अंग आहे. स्वराज्य हा जसा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे, तसाच तें स्वराज्य मिळविण्यासाठीं सत्याग्रही बनणें हाहि प्रत्येकाचा हक्क आहे."

तपश्चर्येसाठीं एकादा ऋषि गुहेंत जातो व तेथें पुण्य सांठवितो, त्या-प्रमाणें या काळांत गांधीजींनीं विधायक कार्यावर भर दिला आणि त्यायोगें कार्यकर्त्यांना संघटित केलें व जनतेशीं समरस बनविलें. ही जन-जागृति म्हणजे भावी संग्रामाची अजिंक्य शक्तिच !

## : ७ : ‘ कायदा तोड दिया ’

अयोध्या नगरींतून, प्रभु रामचंद्र वनवासास निघाले, तो प्रसंग !

पाटलीपुत्र नगरांतून राजपुत्र सिद्धार्थ राजगृहांतून बाहेर पडले, तो प्रसंग !

आणि अहमदाबाद येथील साबरमतीच्या सत्याग्रहाश्रमांतून गांधीजींनीं प्रयाण केलें तो प्रसंग !

सत्यनिष्ठा व मानवप्रेम या दोन दैवी गुणांसाठीं सर्व भौतिक सुखांचा त्याग करणारे हे प्रसंग भारतानें आनंदानें पाहिले व अभिमानानें आपल्या हृदयांत कोरून ठेवले.

१९३० सालच्या मार्चची १२ तारीख उजाडली. सकाळीं बरोबर ६॥ वाजतां गांधीजींनीं इतिहासप्रसिद्ध अशा ‘ दांडी–यात्रे ’चें प्रस्थान ठेवलें. गांधीजींच्या भालप्रदेशीं कुंकुमतिलक लावलेला होता, गळयांत हातसुताचे हार घातलेले होते. हातांत केवळ आधारासाठीं एक उंच काठी होती. अंगावर फक्त दोन वस्त्रें. कमरेला घड्याळ लावलेलें होतें. ७२ सत्याग्रही वीर ब्रिटिशांचें राज्य झुगारून देण्यासाठीं एका गांवाहून दुसऱ्या गांवाकडे निघाले.

या अहिंसक युद्धावर निघण्यापूर्वी गांधीजींनीं व्हाईसरॉयला एक खलिता पाठविला. त्यांत त्यांनीं आपल्या युद्धाचें वैशिष्ट्य पुढील शब्दांनीं कळविलें. “ हें धर्मयुद्ध आहे आणि तें ईश्वराचें नांव घेऊनच मी चालवणार आहें. त्यांत गुप्तता नाहीं, लबाडी नाहीं. असत्य नाहीं. याची योजना ईश्वरानें करून ठेवलेली आहे आणि तें सिद्धीस नेण्यास ईश्वर समर्थ आहे. आपल्या पायाखालील धुळीपेक्षांहि आपण जेव्हां नम्र होतों आणि स्वतःला शून्यापेक्षांहि कमी किंमतीचे मानतों तेव्हां परमेश्वर साहाय्यास धांवून येतो. ”

त्याबरोबरच गांधीजींनीं व्हाईसरॉयला बजावलें, “ हिंदी माणसाच्या दैनिक उत्पन्नापेक्षां आपलें उत्पन्न सातशें पट आहे. ही महाग राजवट देशाला शाप आहे असें मी समजतों. ” कायदेभंगाचा निर्धार गांधीजींनीं या पत्रानें जसा कळविला, तशीच विचारविनिमयासाठीं आपली तयारी असल्याचेंही कळविलें. पण व्हाईसरॉयचें दार बंद !

“ स्वराज्य मिळविल्याशिवाय मी साबरमती आश्रमांत परत येणार नाहीं ” अशी ध्रुव–प्रतिज्ञा करून गांधीजी निघाले. या गांवाहून त्या गांवाला ते चालले. सूर्याच्या प्रकाशाप्रमाणें तेजस्वी मंत्र देत ते चालले, विजेच्या प्रवाहाप्रमाणें चैतन्यदायक कार्यक्रम उपदेशीत ते चालले, वाऱ्याच्या लहरीप्रमाणें शांततेचा संदेश पुकारीत ते चालले ! “ इंग्रजी राज्याचा नाश करण्यासाठीं माझा जन्म झाला आहे, मला घाण्यांत पिळून काढलें तरी मी या राज्याचा नाश करावा असेंच सांगत राहीन, ” असें उघड उघड बोलत गांधीजी चालले.

हजारों मैलावर धरणीकंपाचा धक्का बसला तरी तो वेधशाळेंतील यंत्राला जाणवतोच. गांधीजींचीं पावलें गुजरातमधील खेड्यांत पडत होतीं पण त्यामुळें हादरत होती दिल्ली ! तेथील विधिमंडळाचे राजीनामे पं. मालवीय, लो. ना. अणे व श्री. न. चिं. केळकर यांनीं दिले. तिघांनीं तीन निराळीं कारणें दिलीं असलीं तरी गांधीजींच्या दांडीयात्रेच्या झंझावातानेंच हीं तीन फळें गळून पडलीं यांत संशय नाहीं. विधिमंडळाचे अध्यक्ष श्री. विठ्ठलभाई पटेल यांनीं मात्र उघड याच कारणासाठीं राजीनामा दिला. एकट्या सुरत जिल्ह्यांतून १६९ राजीनामे गेले. बार्डोली तालुक्यांतून सातशें स्वयंसेवक पुढें आले. या अपूर्व प्रयोगास संधि देण्याकरितां क्रांतिकारक पक्ष आपली चळवळ तीन वर्षें थांबवून धरील असें आश्वासन क्रांतिकारकांच्या एका संस्थेनें दिलें.

ता. ६ एप्रिलचा दिवस ! रविवारचा रविराज उत्कंठेनें उदयास आला.

ज्यावर सूर्य मावळत नाहीं असें ब्रिटिश साम्राज्यच मावळण्यास आज प्रारंभ होणार हें पाहून समुद्रहि हर्षाच्या लाटा उसळवीत होता–रुपेरी फेस पसरत होता. सागरराजानें यापूर्वी सत्यनिष्ठ रामचंद्र क्रुद्ध झालेला पाहिला होता. त्याचीच पुनरावृत्ति आज गांधीजी काढीत होते. शस्त्रसंपन्न साम्राज्यसरकारशीं सामना देण्यासाठीं हा निःशस्त्र सत्याग्रही प्रभातकालीं समुद्रकिनाऱ्यावर उभा राहिला. परमेश्वराला आळवणारी प्रार्थना झाली. " कायदेभंग म्हणजे एक पवित्र महायज्ञ आहे." असे धीरगंभीर उद्गार महात्मा गांधींनीं काढले. त्यांनीं समुद्रांत पदार्पण केलें. दाही दिशा निनादल्या. " महात्मा गांधी की जय ! "

किनाऱ्यावर पडलेलें मीठ ! हिऱ्याप्रमाणें चमकणारें शुभ्र मीठ ! समुद्राच्या काहिलींत, सूर्याच्या भट्टीवर, निसर्गानें विनाखर्च तयार केलेला पदार्थ. प्रत्येक माणसाच्या जीवनाला आवश्यक अशी वस्तु. तरी सरकारनें जबर कर बसवून दुर्मिळ केलेला तो जिन्नस. देवानें दिलेलें, माणसाला हवें असलेलें, पण सरकारनें नाकारलेलें तें मीठ सर्वांना स्वस्त व मुबलक मिळावें ही गांधीजींची पूर्वीपासूनची मागणी–राष्ट्रसभेनें तर पहिल्या वर्षापासून केलेली मागणी.

त्याशिवाय मिठाचा जुलमी कायदा तोडण्याचा हेतु पारतंत्र्याला तिलांजलि देणें. मीठ बेकायदा उचलणें. हाच देवाघरचा कायदा. स्वातंत्र्याच्या लढ्यासाठीं मिठाची शपथ घेणेंच तें होय.

गांधीजींनीं किनाऱ्यावरील मिठाचे कण उचलले. त्याबरोबर " कायदे मोडणाराचा जयजयकार असो !" अशी आनंदाची आरोळी सौ.सरोजिनीबाईंच्या कविकंठांतून बाहेर पडली. भराभर इतर स्वयंसेवकांनीं हातानें मीठ उचललें व पायानें कायदा तुडविला.

सर्व देशांत कायदेभंगाची लाट उसळली. शिरोडें, धारासणा वगैरे ठिकाणचीं मिठागरें लोकांनीं लाठ्यांच्या हल्ल्यांतहि लुटलीं. जेथें समुद्र

नव्हता तेथेंहि मीठ तयार करून सभेंत-विकण्यांत आलें. जंगलसत्याग्रहाचा प्रयोगहि वऱ्हाड, कारवार, बिळाशीं, चिरनेर वगैरे भागांत लाखों लोकांनीं मोठ्या प्रमाणांवर केला. सर्व हिंदुस्थानांत कायदेभंगाची वावटळ पसरली. ती थांबविण्याचा सरकारजवळ उपाय कोणता? एकच—आणि तो म्हणजे अटक.

ता. ४ मे १९३० रोजीं पहाटे पाऊण वाजतां कराडी या गांवीं गांधीजींना अटक झाली. ‘ वैष्णवजन ’ हें नरसी मेहत्याचें पद म्हटलें गेलें. आश्रमवासीयांनीं गांधीजींच्या पायावर डोके ठेवलें. पोलिसांच्याही डोळयांत अश्रु उभे राहिले. स्थितप्रज्ञाच्या मुद्रेनें गांधीजी निघाले. पोलीस कमिशनरनें त्यांना आधार देऊन चालविलें. मोटारलॉरींतून गांधींना सुरतेस नेण्यांत आलें. तेथून आगगाडीनें बोरीवलीस पोंचविण्यांत आलें. तेथून लष्करी मोटारींतून त्यांची रवानगी येरवड्याच्या तुरुंगांत करण्यांत आली.

साठी उलटलेल्या त्या कृश तपस्वी सत्याग्रह्यानें येरवड्याचें कारागृह दुसऱ्यांदा पावन केलें.

साऱ्या देशांत हरताळ पडला. सोलापूरला तीन दिवस हरताळ होता. कांहीं मुलांनीं शिंदीचीं झाडें तोडलीं व ताडीचें एक दुकान जाळलें. सरकार बेफाम झालें. लष्करी कायद्याचा नंगानाच सुरू झाला. एखाद्या उन्मत्त शिकाऱ्यानें हवेंतील स्वच्छंदी पांखरें पटापट मारावीं, त्याप्रमाणें मुलांचे, स्त्रियांचे प्राण नाहक घेण्यांत आले. जमावाला शांत करणाऱ्या चार पुढाऱ्यांना पुढें फांशीं देण्यांत आलें !

धारासणा येथें सौ. सरोजिनीबाई नायडू सूर्याखालीं तापत सत्तावीस तास बसून होत्या. त्यांना पोलिसांनीं नाहीं मिळूं दिलें अन्न कीं नाहीं मिळूं दिलें पाणी ! तरी साऱ्या हिंदुस्थानांतील तरुण व तरुणी या स्वातंत्र्यसंग्रामांत भाग घेण्यासाठीं अहमहमिकेनें पुढें येत होते. ता. १ जानेवारी १९३१ रोजीं बोरसद येथील स्त्रियांवर पोलिसांनीं अकारण लाठी-हल्ला केला.

गांधीजींचा उजवा हात म्हणजे-वल्लभभाई पटेल. त्यांना सरकारनें एका वर्षांत तीनदां अटक केली. त्यांची आई ८० वर्षांची—घरीं अन्न शिजवीत होती. तिचें चुलीवरचें भांडें पोलिसांनीं खालीं पाडलें. सरकारी दडपशाही उतू चालली !

या दडपशाहीचा निषेध अमेरिकेंतील एकशें दोन नागरिकांनीं जाहीर रीतीनें केला. चीनचे डॉ. सन्यत्सेन यांनीं हिंदुस्थानांतील या चळवळीचा गौरव केला.

साऱ्या देशांतील वातावरण भयंकर तापलें. सरकार व गांधीजी यांच्यांत समेट घडवून आणण्यासाठीं बॅ. जयकर व डॉ. सप्रू यांनीं प्रयत्न केले. ता. २५ जानेवारी १९३१ रोजीं व्हाईसरॉयांनीं गांधीजींची बिनशर्त सुटका केली. "शांततामय वातावरण प्रस्थापित करण्याची अंतःकरण-पूर्वक इच्छा धरूनच आम्ही हें पाऊल टाकीत आहोंत" असेंही व्हाईस-रॉयांनीं म्हटलें. उलट गांधीजींनीं त्याहून थोर मनानें जाहीर केलें कीं, "सन्मानानें तह होत असेल तर त्या तहासाठीं माझी तळमळ आहे."

गांधीजी व व्हाईसरॉय लॉर्ड आर्विन यांची मुलाखत ता. १७ फेब्रुआरी रोजीं झाली. पुढें लहानमोठया बाबींची वाटाघाट होऊन ता. ४ मार्च रोजीं रात्रीं दोन वाजतां इतिहासप्रसिद्ध "गांधी—आर्विन करार" सिद्ध झाला. पंधरा दिवसांत आठ वेळां चोवीस तास चर्चा झाली. स्वतःपुरतें मीठ मोफत गोळा करण्याची परवानगी व्हाईसरॉयांनीं हिंदी नागरिकांना दिली. मिठाच्या कायदेभंगाचें फळ गांधीजींच्या पदरांत पडलें. दीडशें वर्षांनंतर परतंत्र हिंदुस्थानचा नेता राज्यकर्त्या इंग्रज अधिकाऱ्याबरोबर समान भूमिकेवरून तह करूं शकला हीच मोठी आशादायक घटना होती.

इंग्लंडमध्यें गोलमेज परिषद चालू होती. ता. १२ नोव्हेंबर १९३० रोजीं तिचें पहिलें अधिवेशन भरलें. पण त्या परिषदेला सत्तावन नेमस्त व सोळा संस्थानिक एवढेच प्रतिनिधि हजर होते. आणि जे होते त्यांना तरी किंमत किती ? पाठीमागचा एकाचा आंकडा नसलेलीं शून्येंच तीं !

त्या शून्यामागें 'एक' गांधीजी उभे करावेत हा सरकारचा हेतु! गांधीजींची मुख्य अट एकच—ती म्हणजे परिषदेंत हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न मांडतां आला पाहिजे. ती अट पूर्ण करण्याचे वेळीं व्हाईसरॉयनें फार खळखळ केली. गांधींची आगगाडी चुकली. शेवटीं सरकारनें त्यांची अट मान्य केली आणि खास गाडी सोडून गांधीजींना विलायतेला रवाना केलें.

गांधीजींचे प्रतिस्पर्धी बनलेले व्हाईसरॉय लॉर्ड अर्विन यांनींहि या प्रसंगीं त्यांच्या विषयीं काय उद्‌गार काढले हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्यावरून गांधीजींचे कोणते गुण शत्रूवरसुद्धां कसा प्रभाव पाडीत होते हें दिसून येतें. लॉर्ड अर्विन म्हणाले, "मला प्रथम गांधी भेटले तेव्हां माझ्या चित्तावर त्यांच्या पावित्र्याचा मोठा परिणाम झाला. दुसऱ्या खेपेस मला त्यांची कळकळ व राजनैतिक कुशलता प्रतीत झाली आणि त्याचा माझ्या मनावर फारच परिणाम झाला. गांधींचा प्रामाणिकपणा, कळकळ आणि उच्च देशाभिमान हीं अतिशय प्रशंसनीय आहेत. त्यांच्याबरोबर काम करण्यास आनंद वाटतो व भाग्य लागतें."

कायदेभंगाच्या संग्रामांत आधीं विजयस्तंभ रोवून मगच गांधीजी इंग्लंडांतील गोलमेज परिषदेच्या रणांगणाकडे निघाले!

३५६७८ आंतर्राष्ट्रीय २३ २३/७/६२

## : ८ : इंग्लंडांतील शिष्टाई

मुंबई बंदराहून 'राजपुताना' आगबोट निघाली.

गंगोदकाच्या या घागरी बोटीवर कशाला? हिंदुसभेचे संस्थापक धर्मात्मा मालवीयजी गोलमेज परिषदेसाठीं निघाले होते ना.

आणि ही शाल कोणाची? सातशें रुपयांची शाल कोणा नरेशाची? कोणा धनवंताची?

छेः ! एका ' नंग्या फकिराजवळ ' ती शाल होती. ती त्याच्या भक्तांनीं त्याला न कळत त्याच्या ट्रंकेंत घातली होती. मुंबई बंदर सोडतांच ती उंची लोकरी शाल त्या फकिराच्या दृष्टीस पडली. दृष्टीस पडतांच—

" महादेव, ही शाल ताबडतोब मुंबईला परत पाठवून दे. " गांधीजींनीं हुकूम सोडला. परत पाठविण्यांत अडचणी निघाल्या. तेव्हां गांधीजींनीं ती शाल बोटीवरच विकली—सात हजार रुपये किंमत आली.

ता. २९ ऑगस्ट १९३१ रोजीं गांधीजी मुंबईहून निघाले. बंदराबंदरांवर त्यांचा सत्कार झाला, बोटीवर दररोज सकाळ-संध्याकाळीं गांधीजी सामुदायिक प्रार्थना करीत. ता. १२ सप्टेंबर रोजीं त्यांनीं इंग्लंडच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवलें. सुमारें चाळीस वर्षांपूर्वी बॅरिस्टर होण्यासाठीं तरुण गांधी इंग्लंडांत गेले होते, पण आतां अलौकिक स्वातंत्र्यसंग्रामाचा अद्वितीय सेनापति, येशू ख्रिस्ताचा नवा अवतार, हिंदी राष्ट्रसभेचा एकमेव प्रतिनिधि या नात्यानें गांधीजी लंडनमध्यें उतरले. त्यांचें भव्य स्वागत झालें.

बादशाही आदरातिथ्य टाकून देऊन ते कामगारांच्या वस्तींत राहिले. तेथील मजुरांचीं मुलें ' गांधीकाका ' भोंवतीं रोज सकाळीं जमत. थंडी कडाक्याची होती. तरी पायांत फक्त वहाणा घालून व अंगावर खादीचें उपरणें टाकून गांधीजी फिरावयास जात. रोज वीसवीस बावीसबावीस तास काम करीत.

राष्ट्रसभेचे सर्वाधिकारी या नात्यानें त्यांनीं ता. १५ रोजीं गोलमेज परिषदेंत इतिहासप्रसिद्ध भाषण केलें. हातांत टिप्पण नाहीं, टांचण नाहीं. हृदयांत खेळणारे विचारच त्यांनीं पाऊण तासांत मांडले. त्यांनीं खडखडीतपणें ब्रिटिश प्रतिनिधींच्या तोंडावर सांगितलें, " मला ' ब्रिटिश प्रजाजन ' असण्यांत व तसें म्हणविण्यांत एके काळीं अभिमान वाटत होता. परंतु आतां स्वतःला तसें म्हणविण्याचें मी पुष्कळ दिवसांपासून

सोडून दिलें आहे. मला 'ब्रिटिश प्रजाजन' म्हणण्यापेक्षां 'बंडखोर' म्हणवून घेणें जास्त आवडेल." त्यांनीं कराची येथील राष्ट्रसभेचा पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव ब्रिटिश प्रतिनिधींच्या कानावर घातला.

यानंतर राजकीय तपशिलाचा चक्रव्यूह तेथें उभारण्यांत आला. निरनिराळे अनेक मुद्दे मांडण्यांत आले. त्यापैकीं मुख्य प्रश्न म्हणजे जातीयतेचा. हिंदु व मुसलमान, स्पृश्य व अस्पृश्य यांना विधिमंडळांत किती जागा द्यावयाच्या यावर मारामाऱ्या सुरू झाल्या. तेव्हां गांधीजींनीं स्वच्छ सांगितलें कीं, "राज्यघटना तयार करण्यास आधीं जातिभेदाचा प्रश्न सोडविणें आवश्यक आहे हें मत मला बिलकुल मान्य नाहीं." प्रथम इंग्लंड व हिंदुस्थान यांचा अनैसर्गिक व घातुक संबंध तोडला पाहिजे हें गांधीजींचें मत. पण ब्रिटिश सरकारला त्या मुख्य मागणीला बगल द्यावयाची होती. म्हणून त्यांनीं जातीय प्रश्नावरच सारा घोळ घातला.

मुसलमानांप्रमाणें अस्पृश्यांनाहि वेगळा मतदारसंघ द्यावा व हिंदुसमाजापासून फोडून काढावें असा कुटिल डाव ब्रिटिशांनीं टाकला. तेव्हां गांधीजींचें अंतःकरण गदगदां हाललें आणि टाहो फोडून तें सांगूं लागलें, "मला अस्पृश्यता कायम राहण्यापेक्षां हिंदुधर्म बुडाला तरी चालेल. मला सर्व जगाचें राज्य मिळत असलें तरी त्यासाठीं मी अस्पृश्यांच्या हक्काचा मोबदला देणार नाहीं. अस्पृश्यांना जर कोणी विभक्त मतदारसंघ देऊं लागेल तर, मी माझें सारें बळ एकवटून सांगतों कीं, त्या घटनेला, मी एकाकी असलों तरी, मरेपर्यंत विरोध करीत राहीन."

गांधीजींना विरोध केला डॉ. आंबेडकरांनीं. ते सरकारनें नेमलेले प्रतिनिधि होते. सरकारच्या बाजूनें ते म्हणाले, "अस्पृश्यांना वेगळा मतदारसंघ पाहिजे." तेव्हां गांधीजी आत्मविश्वासानें उद्गारले, "सर्व हिंदुस्थानांतील अस्पृश्यांना आपला प्रतिनिधि निवडण्यास सांगितलें तर सर्वांत जास्त मतें मलाच मिळतील."

लष्कर, व्यापार, परराष्ट्रधोरण इत्यादि विषयांवरहि गांधीजींनीं आपली भूमिका अशीच ठामपणें मांडली. त्यांची न्यायाची मागणी ब्रिटिशांना बरोबर कळली. पण ब्रिटिशांच्या मनांतून हिंदुस्थानला सत्तादान करावयाचेंच नव्हतें, म्हणून या परिषदेंतून प्रत्यक्ष योजना कांहींच बाहेर पडली नाहीं.

"तुम्ही माझ्यावर विश्वास दाखवतां परंतु कॉंग्रेसवर विश्वास ठेवीत नाहीं. प्रांतिक व मध्यवर्ती–दोन्ही स्वायत्तता एकाच वेळीं म्हणजे ताबडतोब दिल्या पाहिजेत" असें गांधीजींनीं समारोपाच्या भाषणांत सांगितलें. शेवटीं "यापुढें आपले मार्ग भिन्न होणार" असेंहि भीषण भविष्य गांधीजींनीं सर्वांना ऐकविलें.

"आमच्या स्वातंत्र्यासाठीं स्वतःच्या रक्ताची गंगा सर्व हिंदुस्थानभर वाहविण्यास आम्ही सिद्ध आहोंत," अशी स्पष्ट ग्वाही गांधीजींनी एका व्याख्यानांत ब्रिटिश जनतेला दिली. हिंदुस्थानांत वृत्तीची निर्भयता व स्वातंत्र्याची आतुरता किती प्रचंड आहे हें ब्रिटिशांचे मनावर ठसविण्यासाठीं गांधीजी म्हणाले, "अनत्याचाराचा व सविनय कायदेभंगाचा संदेश मला लक्षावधि हिंदूंना पुन्हां एकदां सांगावा लागेल–मग कितीहि विमानें हिंदुस्थानच्या हवेंत घिरट्या घालूं लागलीं किंवा कितीहि सशस्त्र चिलखती मोटारी हिंदुस्थानच्या जमिनीवर भटकूं लागल्या तरी हरकत नाहीं. त्यांचा कांहींहि परिणाम होणार नाहीं. हिंदुस्थानांतल्या कोंवळ्या बालकांवरसुद्धां या गोष्टींचा आतां परिणाम होत नाहीं, हें तुम्हांला माहीत नाहीं. त्यांच्या चारी बाजूस गोळ्याच्या फैरी झडत असतां आम्ही त्यांना आनंदानें नाचायला शिकवितों, जणूं काय ते फटाकेच उडत आहेत. देशाच्या स्वातंत्र्याकरितां हालअपेष्टा सहन करण्याचे धडे आम्ही त्यांना देतों."

ता. ५ डिसेंबर १९३१ रोजीं गांधीजींनीं इंग्लंडचा किनारा सोडला.

कॉंग्रेसची स्वराज्याची मागणी त्यांनीं तपशिलानें व ठामपणानें इंग्लंडपुढें ठेवली आणि तींत कोणतीही तडजोड स्वीकारली नाहीं हेंच त्यांचें नैतिक यश. बागेंत जाऊन आंबे तोडून ते पिशवींत घालून घरीं आणावेत, तसें इंग्लंडला जाऊन, परिषदेंत बोलून, स्वराज्याचें गांठोडें हिंदुस्थानांत घेऊन जातां येईल अशी भोळसट आशा गांधींच्या चित्तांत केव्हांच नव्हती.

गांधीजी मुंबईत ता. २८ डिसेंबर रोजीं उतरले तेव्हां लाखों लोकांनीं त्यांचें स्वागत केलें. त्याहीपेक्षां स्वागत केलें सरकारनें! गांधी–आर्विन करार अधिकाऱ्यांनीं पायाखालीं तुडविला. वटहुकुमांच्या पुष्पमालांनीं सर्व देश सरकारनें शृंगारला. लाठीमाराची व गोळीबाराची ताशावाजंत्री देशाच्या कोनाकोपऱ्यांत वाजत होती. पंडित जवाहरलालांना अलाहाबाद शहरांत स्थानबद्ध करण्यांत आलें. तर पंडितजी मुंबईस निघाले. त्यांना ता. २६ रोजीं वाटेंतच अटक झाली. सरहद्द गांधी अब्दुल गफारखान यांना सरकारनें ब्रह्मदेशांत हद्दपार केलें.

गांधीजींनीं व्हाईसरॉय लॉर्ड विलिंग्डन यांचेकडे भेटीची विनंती केली. त्यांनीं ती ठोकरून दिली. गांधीजींनीं बहिष्काराचें शस्त्र उपसलें. ता. ३ जानेवारी रोजीं रविवारीं पहाटे तीन वाजतां मुंबई येथें गांधीजींना अटक झाली. ता. ४ रोजीं पंडित जवाहरलालांना अलाहाबाद येथें दोन वर्षें सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यांत आली. राष्ट्रसभाध्यक्ष सरदार वल्लभभाई यांनाहि अटक झाली. राजेंद्रबाबू, सुभाषचंद्र, डॉ. अन्सारी इत्यादि साऱ्या पुढाऱ्यांना सरकारनें गुंडाळून टाकलें. सौ. कस्तुरबा, सौ. कमला नेहरू, वगैरे स्त्रियांनाहि तुरुंगांत डांबलें. शेंकडों राष्ट्रीय संस्था बेकायदेशीर ठरविल्या. "अवघ्या सहा आठवड्यांत ही चळवळ मोडून काढतों," अशी प्रतिज्ञा विलिंग्डन यांनीं केली होती. पण अनुभव काय आला?

डोक्याशिवाय नुसतें धडच लढत राहिलें असा भारताचा जुना इतिहास आहे, आतांही पुढाऱ्याविना लाखों लोकांनीं कायदेभंग केला. दिल्ली येथें राष्ट्रसभेचें अधिवेशन सरकारी निर्बंधांना न जुमानतां भरलें.

गांधीजी येरवड्याच्या तुरुंगांत होते. ता. १८ ऑगस्ट रोजीं ब्रिटिश प्रधानांनीं जातिनिर्णय दिला. त्यामध्यें अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ दिला—आणि त्यानें गांधीजींच्या प्राणालाच जणूं धक्का बसला. तो निर्णय वाचल्यानंतर गांधीजींनीं रात्रभर विचार केला, आणि लगेच मुख्य प्रधानांना पत्र लिहून कळविलें कीं, " ता. २० सप्टेंबरपासून मी प्राणांतिक उपोषणास सुरवात करणार आहें. ब्रिटिश सरकारनें स्वतःच्या इच्छेनें किंवा लोकमताच्या वजनानें आपला निर्णय बदलून अस्पृश्यांना संयुक्त मतदारसंघ ठेवला तरच माझा उपवास थांबेल." हें पत्र तारेनें पाठविण्याची विनंति गांधीजींनीं केली होती, तरी त्याचें उत्तर मुख्य प्रधानांनीं पाठविलें तीन आठवड्यांनंतर !

ता. २० सप्टेंबर रोजीं गांधीजींचें अस्पृश्यांसाठीं प्राणांतिक उपोषण सुरू झालें. सारें राष्ट्र चिंतेंत बुडालें. मुंबई येथें पंचवीस पुढाऱ्यांची परिषद भरली. तींत डॉ. आंबेडकरांनीं आपलें धोरण खडकासारखें खंबीर ठेवलें.

पांचवा दिवस उजाडला. तुरुंगांतील आम्रवृक्षाखालीं एका खाटेवर गांधीजी पडलेले होते. ते अत्यंत अशक्त झालेले होते—' मृत्यूच्या कक्षेंत ' शिरत होते. दुपारीं आंबेडकर आले. गांधीजींनीं त्यांच्या हृदयाला पाझर फोडला. आंबेडकरांचा आत्मा द्रवला. ता. २६ रोजीं समेट झाला. 'येरवडा–करार' जन्मास आला. स्पृश्यास्पृश्य हिंदुसमाजाचा मतदारसंघ संयुक्तच राहिला.

गांधी–स्मट्स करार हा आफ्रिकेच्या राजकारणांत जितका लक्षणीय, गांधी अर्विन करार हा हिंदुस्थानच्या इतिहासांत जितका स्मरणीय, तितकाच हा येरवडा करार हिंदुसमाजाच्या दृष्टीनें महत्त्वपूर्ण. या तिन्ही करारांचे वेळीं गांधीजींच्या आत्मबलाचा, अहिंसेचा, म्हणजेच सत्याचा पूर्ण विजय झाला.

गांधीजींना अस्पृश्यता समूळ खणून काढावयाची होती. उपोषणा-

नंतर तुरुंगांतूनहि त्यांनीं तें कार्य सुरू केलें. ‘ हरिजन ’ नांवाचें इंग्रजी साप्ताहिक ता. ११ फेब्रुवारी १९३३ पासून त्यांनीं सुरू केलें. पण अस्पृश्यता-निवारणाला सनातनी हिंदु विरोध करूं लागले. हरिजनांवरील मारहाणीच्या बातम्या ऐकून गांधीजी त्रस्त झाले. ता. ८ मे १९३३ पासून त्यांनीं एकवीस दिवसांचा उपवास सुरू केला. सरकारनें त्यांची मुक्तता केली.

ता. १२ जुले १९३३ रोजीं पुणें येथें टिळकमंदिरांत तीनशें पुढाऱ्यांची एक परिषद भरली. तिनें १९३२ सालची चळवळ विनशर्त मागें घेतली. गांधीजींनीं व्हाइसरॉयकडे मुलाखतीची मागणी दोनदां केली. पण दोन्ही वेळां सरकारनें ती नाकारली. म्हणून गांधीजींनीं वैयक्तिक कायदेभंग सुरू केला. ता. १ ऑगस्ट रोजीं त्यांना अटक झाली व एक वर्षाची शिक्षा झाली. १९३४ च्या मार्चपर्यंत हजारों कार्यकर्त्यांनीं वैयक्तिक कायदेभंग केला.

ता. १९ ऑगस्ट रोजीं गांधीजींनीं पुनः उपोषण केलें. बारा महिन्यांतील हें तिसरें उपोषण. पांच दिवसांत त्यांची प्रकृति बिघडली. अत्यवस्थ अवस्थेंत सरकारनें त्यांना मुक्त केलें. तरी शिक्षेची मुदत संपेपर्यंत, म्हणजे ता. ३ ऑगस्ट १९३४ पर्यंत, गांधीजींनीं राजकीय चळवळ न करण्याचें बंधन स्वतःच आपल्यावर घातलें. पुढील दहा महिने त्यांनीं अखिल हिंदुस्थानांत हरिजनांच्या उद्धारासाठीं दौरा काढला. सर्व देशानें त्यांचा सत्कार केला—आणि पुण्यानेंहि !

पुण्यास गांधीजी ता. २५ जून १९३४ रोजीं आले. त्यांना मानपत्र देण्याचें नगरपालिकेनें ठरविलें. तें घेण्यासाठीं गांधीजी संध्याकाळीं पांच वाजतां मोटारींतून निघाले. तोंच त्यांचेवर बॉम्ब टाकण्यांत आला ! पण बॉम्ब पडलेल्या मोटारींत गांधीजी नव्हते.

अजमीर येथील अशाच एका सनातन्याच्या अत्याचाराचें प्रायश्चित्त म्हणून गांधीजींनीं सात दिवस उपवास केला.

मध्येंच बिहारची हांक गांधीजींच्या कानीं आली. १९३४ च्या जानेवारींत तेथें भयंकर धरणीकंप झाला. वीस हजार लोक मेले. दहा लाख घरें जमीनदोस्त झालीं. गांधीजींनीं एक महिना खर्च करून बिहारी जनतेची सेवा केली.

दहा महिन्यांच्या राष्ट्रव्यापी व वायुवेगाच्या दौऱ्यांत गांधीजींनीं आठ लक्ष रुपये हरिजनांसाठीं जमविले—लाखों लोकांत जागृति केली ती तर केवळ असामान्य. गांधीजींचें मन दिवसेंदिवस विधायक कार्यक्रमांतच अधिक रमूं लागलें. उलट मालवीय–अन्सारीप्रभृति अनुयायांचें चित्त कायदेमंडळाकडे धावूं लागलें. कॉंग्रेसनें विधिमंडळाचें कार्य अंगावर घेतलें.

याचा परिणाम म्हणजे १९३४ सालीं मुंबई येथें राष्ट्रसभा भरली असतां गांधीजी तींतून निवृत्त झाले. तथापि त्यांची तपश्चर्या इतकी मोठी कीं, महत्त्वाच्या प्रसगीं त्यांच्या सल्ल्याशिवाय राष्ट्रसभेचें पान हलत नसे.

१९३४ सालापासून गांधीजी मध्यप्रांतांतील सेगांव ( सेवाग्राम असें यालाच पुढें नांव मिळालें ) येथें राहूं लागले, साबरमतीचा आश्रम त्यांनीं दांडीयात्रेपूर्वी सोडला. म्हणून त्यांनीं या खेड्यांत नवा आश्रम उभारला. तेथें विधायक कार्याचे अठरा कारखाने चालू झाले. तीं विधायक कार्यें म्हणजे—

(१) जातीय ऐक्य. (२) अस्पृश्यता–निवारण. (३) मद्यपानबंदी. (४) खादी. (५) ग्रामोद्योग. (६) खेड्यांचें आरोग्य. (७) मूलोद्योगी शिक्षण. (८) प्रौढ शिक्षण. (९) स्त्रियांचा उद्धार. (१०) आरोग्य आणि शरीरस्वास्थ्य यांचें शिक्षण. (११) राष्ट्रभाषा–प्रचार. (१२) मातृभाषेची भक्ति. (१३) आर्थिक विषमतेचें निवारण.

हिंदुस्थान म्हणजे खेड्यांचा देश. त्यांच्या उद्धारासाठीं गांधीजींनीं हीं विधायक कार्यें सांगितलीं व आचरलीं. पुढें जरुरीप्रमाणें महारोग-निवारण, गोसेवा, वगैरे कार्यांचाहि त्यांत समावेश केला.

ग्रामोद्धारासाठीं ही विधायक कार्याची ग्रहमाला--आणि तिचा सूर्य म्हणजे खादीचा चरखा. व्यक्तीच्या उद्धारासाठींहि गांधीजींनीं अकरा व्रतें आपल्या आश्रमीय जीवनांत गोंवलीं आहेत. तीं व्रतें म्हणजे--

आहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, असंग्रह ।
शरीरश्रम, अस्वाद, सर्वत्र भयवर्जन ॥
सर्वधर्मी समानत्व, स्वदेशी, स्पर्शभावना ।
हीं एकादश सेवावीं नम्रत्वें व्रतनिश्चयें ॥

## : ९ : राज्यकारभाराचे सूत्रधार

ही जादू कोणीं केली ! काल तुरुंगांत जे कैदी होते ते आज सरकारी प्रासादांत मंत्री कसे झाले ! जे तिरंगी झेंडे पोलीस हिसकावून घेत होते, त्यांनाच तेच अधिकारी वंदन कां करूं लागले ! जी खादी टोपी पाहतांच अधिकाऱ्यांचें पित्त खवळे तीच टोपी प्रधानमंत्र्यांच्या डोक्यावर कशी आली ! फार काय ! गोरा गव्हर्नर खडबडीत खादी कां पेहरूं लागला ! प्रांतांतील मंत्री मार्गदर्शनासाठीं दिल्लीऐवजीं सेवाग्रामकडे धाव कां घेऊं लागले ! ब्रिटिश पार्लमेंटच्या आदेशाऐवजीं हिंदी कॉंग्रेसच्या ठरावाकडे प्रांतिक सरकारें जास्त लक्ष कां देऊं लागलीं !

ही सारी क्रांति गांधीजींनीं घडवून आणली. ते खेड्यांत राहिले एवढेंच नव्हे तर त्यांनीं कॉंग्रेसलाहि खेड्यांत नेलें आणि त्यामुळें सरकारचें तोंडहि खेड्याकडे वळलें. सरकारनें १९३५ सालीं स्वराज्यदानाचा कायदा केला. त्याचा विचार करण्यासाठीं १९३६ सालीं राष्ट्रसभा भरली. कोठें भरली ही राष्ट्रसभा ?

खानदेशांतील एका खेड्यांत–फैझपूर नांवाच्या गांवांत–ज्वारीचीं पिकें नुकतींच निघालेल्या शेतांत! तट्टयाच्या तंबूचें व कळकांच्या कळसांचें रान तेथें पसरलें. 'शांतिनिकेतन' मधील नंदलालांनीं ग्रामीण सौंदर्य निर्माण करून सर्वांना चकित करून सोडलें. राष्ट्रसभेला जोडून ग्रामोद्योग प्रदर्शन भरलें. त्यांत गांधीजींनीं महत्त्वाचें भाषण केलें–आपलें स्वराज्य ग्रामप्रधान असलें पाहिजे, असें सांगितलें. राष्ट्रसभेनें निवडणुकीचा जाहीरनामा काढला. त्यांत १९३५ च्या कायद्याचें उच्चाटन, जाति-निर्णयाचा निषेध व खऱ्या स्वातंत्र्याची स्थापना असे तीन महत्त्वाचे मुद्दे मांडले.

निवडणुकीचे नगारे वाजले. लोकांचें कॉंग्रेस–प्रेम सिद्ध झालें. बंगाल, पंजाब व सिंध हे तीन मुस्लीमप्रधान प्रांत वगळले तर इतर आठ प्रांतांत राष्ट्रीय सभेला कोठें शेंकडा ६० तर कोठें शेंकडा ७४ असें घसघशीत बहुमत लाभलें. अर्थातच या आठ प्रांतांत मंत्रिमंडळ बनविण्यासाठीं गव्हर्नरांनीं राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांना बोलाविलें. पण गांधीजींनीं सरकारकडून अशी अट कबूल करून घेतली कीं, मंत्रिमंडळाच्या सनदशीर कार्यक्रमांत गव्हर्नर हस्तक्षेप करणार नाहीं. ता. १७ जुलै १९३७ पासून राष्ट्रसभेनें प्रांतिक स्वराज्याचा कारभार सुरू केला. प्रांताचीं शिक्षण, शेती व आरोग्य हीं खातीं हिंदी मंत्र्यांचे हातीं मॉंटफर्ड सुधारणांनीं १९२२ सालींच दिलीं होतीं; पण आतां सारींच्या सारीं खातीं कॉंग्रेस मंत्र्यांच्या हातीं आलीं.

"आमच्या स्वातंत्र्यांत शेतसारा कमी होईल, मिठावरील कर कमी होईल, दारू अजीबात बंद होईल, राज्यकारभाराचा खर्च कमी होईल." अशी प्रतिज्ञा गांधीजींनीं १९३० सालीं व्हाईसरॉयला पाठविलेल्या पत्रांत जाहीर केली होती. आतां ती प्रतिज्ञा खरी करण्याचा काळ आला–कॉंग्रेसच्या कसोटीचा, काळ आला. त्या कसोटीला कॉंग्रेस पुरेपूर उतरली. गांधीजींनीं पंतप्रधानांना जीं 'आज्ञापत्रें' दिलीं त्यांत दारूबंदीला महत्त्व होतें.

शेतकऱ्यांचें कल्याण हा तर गांधींजीचा देवच ! त्यांनीं एकदां आपली ही भावना स्पष्ट शब्दांत मांडली आहे. ते लिहितात, "माझ्या लक्षावधि बांधवांना मी चांगलें ओळखतों. दिवसाच्या चोवीस तासांमध्यें मी सदैव त्यांच्यासान्निध असतों. माझ्या चिंतनाचा पहिला व शेवटचा विषय म्हणजे बहुजनसमाज. दीनांच्या हृदयांतच मला देव दिसतो. दुसरा देव मला ठाऊक नाहीं. त्यांची सेवा केल्यानेंच सत्यस्वरूपी परमेश्वराची पूजा केल्यासारखें मला वाटतें."

व्याजाचे दर ठरवून शेतकऱ्यांमागचा पठाणांचा ससेमिरा राष्ट्रीय सरकारनें नाहींसा केला. कर्जाचीं 'तडजोड मंडळें' स्थापन करण्यांत आलीं. गुजरातमधील शेतकऱ्यांच्या जमिनी चळवळींत जप्त झाल्या होत्या. त्या परत देण्यास गव्हर्नर कांकूं करूं लागला. तेव्हां सातहि प्रांतांत राजीनामे देण्याची तयारी कॉंग्रेसनें दाखविली. शेतकऱ्याचें हित होत नसेल तर राजसत्ता हातीं घेऊन काय करायचें ? असा कॉंग्रेसचा विचार.

हरिजनांच्या उद्धाराचे अनेक कायदे झाले. शाळा, देवळें, नोकऱ्या, पाणवठे–कोठेंहि त्यांना विषमता जाणवूं नये अशी व्यवस्था करण्यांत आली. जीवनाला धरून व व्यवसायाला प्राधान्य देणारी वर्धा–शिक्षण–योजना जोरानें पुढें आली. मंत्र्यांनीं पांच हजारांऐवजीं पांचशें रुपयेच पगार घेतला. पारतंत्र्याची अमावास्या संपून स्वराज्याचा शुक्ल पक्ष सुरू झाल्याची जाणीव जनतेला होऊं लागली. बंगाल हा कांहीं कॉंग्रेसचा प्रांत नव्हे. तरी तेथें गांधीजी १९३७ च्या नोव्हेंबरमध्यें व १९३८ च्या मार्चमध्यें गेले. क्रांतिकारकांना बंधमुक्त करण्यासाठीं त्यांनीं जीवापाड परिश्रम केले. १९३८ च्या ऑगस्टमध्यें एक हजार स्थानबद्ध बंधमुक्त झाले. हिंसाचारी क्रांतिकारकांना अहिंसाचार्य गांधीजींनीं सोडविलें, हा पुष्कळांना चमत्कारच वाटला !

लोकहिताच्या वाटेनें राष्ट्रीय सरकारचा गाडा चालला होता. पण तो

दोन वर्षांत उलथून पडला. याचें कारण दुसऱ्या महायुद्धाचा धक्का. ता. ३ सप्टेंबर १९३९ रोजीं ब्रिटिश सरकारनें जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारलें. त्या युद्धांत हिंदुस्थानला, त्याची काडीमात्र संमति न घेतां, इंग्लंडनें ढकललें. सरकार आपलें युद्धकार्य मनमानेल तसें चालवूं लागलें. त्यामुळें गांधीजींनीं सल्ला दिला कीं, कॉंग्रेस मंत्रिमंडळांनीं अधिकारपदें सोडावींत. त्याप्रमाणें ता. २७ ऑक्टोबर रोजीं, ऐन दिवाळीचे वेळीं, सात प्रांतांचे स्वराज्याचे दीप मालवले गेले.

दोन वर्षांच्या कॉंग्रेसच्या राज्यकारभाराबद्दल गव्हर्नरांनीं प्रशंसेचे उद्‌गार काढले, व्हाईसरॉयांनीं शिफारसपत्र दिलें, एवढेंच नव्हे तर, कॉंग्रेसला पाण्यांत पाहणारे सर सॅम्युअल होअर यांनींहि कॉमन्स सभेंत कॉंग्रेस-मंत्र्यांची पाठ थोपटली.

याच वेळीं राजकोट संस्थानांत गांधीजींनीं एक चमत्कार केला. त्या संस्थानाबद्दल गांधीजींना फार ममत्व. त्यांचे वडील तेथले दिवाण. खुद्द त्यांचें शिक्षण तेथें झालेलें. कस्तुरबांचें लहानपणहि तेथेंच गेलेलें. वल्लभ-भाईंच्या प्रयत्नानें राजकोटच्या ठाकुरांनीं ता. २३ डिसेंबर १९३८ रोजीं राजकीय सुधारणा आपल्या प्रजेला देण्याचें जाहीर केलें.

पण पुढें कोठून तरी कळ फिरली आणि ठाकुरांनीं वचनभंग केला. वल्लभभाई, कस्तुरबा वगैरे तेथील तुरुंगांत गेले. तुरुंगांत कार्यकर्त्यांचा छळ झाला. त्यांनीं अन्नसत्याग्रह पुकारला. संस्थानांतील पाऊण लाख प्रजा हवालदिल झाली. तिनें गांधीजींचा धांवा केला. ठाकूरसाहेब तर गांधी-जींना पित्यासारखे मानणारे. तेव्हां राजकोटमधील लढा सामोपचारानें मिट-वावा म्हणून गांधीजी तिकडे निघाले—त्रिपुरी येथील राष्ट्रसभा सोडून निघाले.

राजकोटमध्यें जाऊन गांधीजींनीं एकशें पंचाहत्तर लोकांच्या छळाच्या जबान्या घेतल्या. ता. २ मार्च रोजीं त्यांनीं ठाकुरांना पत्र लिहून कळविलें,

दिलेल्या वचनाला आपण जागा, नाहीं तर मी प्राणांतिक उपोषण करीन. उपोषण सुरू झालें. चवथे दिवशीं व्हाईसरॉयांनीं गांधीजींना कळविलें, फेडरल कोर्टाच्या न्यायमूर्तींकडून या वादाचा निकाल लावून घेऊं या. गांधीजी कबूल झाले. त्यांनीं उपोषण सोडलें. न्यायमूर्तींनीं निकाल दिला तो गांधीजींच्या बाजूचाच होता. पण गांधीजींना शंका आली, "आपण व्हाईसरॉयचें दडपण ठाकुरावर टाकलें ही एक सूक्ष्म हिंसाच नव्हे काय?" गांधीजींनीं तो निकाल ता. १७ मे १९३९ ला झुगारून दिला. भौतिक यशापेक्षां नैतिक मूल्यांनाच गांधीजींच्या हिशेबीं अधिक मोल.

हिंदुस्थानांतील सर्व संस्थानिकांना गांधीजींनीं वारंवार असा स्पष्ट उपदेश केला आहे कीं, "ब्रिटिश साम्राज्यशाही तुम्हांला ज्या सोनेरी सांखळ्यांनीं जखडून टाकीत आहे, त्यांना बिलगून बसूं नका. तुमच्यावर खरें अधिराज्य ब्रिटिशांचें नाहीं, तर प्रजेचें आहे. तुमची समशेर दुसऱ्याचा गळा कापण्यासाठीं नाहीं ती स्वतःचा गळा उतरण्यासाठीं आहे. तुम्ही आपल्या प्रजाजनांना जाहीर करा कीं, मी माझ्या अधिकारांचें उल्लंघन केलें कीं, त्याच क्षणीं माझी मान तुम्ही या समशेरीवर ठेवा."

युद्ध वाढूं लागलें. इंग्लंड हरूं लागलें. कॉंग्रेसचें सहकार्य त्याला मिळेना. "तुमचे युद्धहेतु काय आहेत?" असें कॉंग्रेस इंग्रज सरकारला विचारूं लागली. पूर्ण स्वातंत्र्याची घोषणा करून राष्ट्रीय सरकार स्थापन कराल तर आम्ही युद्धकार्यांत सर्वतोपरि सहाय्य करूं असा ठराव कॉंग्रेसनें केला. त्यापासून गांधीजी अलिप्त होते. सरकारनें कॉंग्रेसच्या सहकार्याचा हात झिडकारून टाकला.

गांधीजींनीं वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला. भाषणस्वातंत्र्याची मागणी हें त्यांचें ध्येय. पांचसहाशें सत्याग्रही तुरुंगांत गेले नाताळांत तो सत्याग्रहहि तहकूब झाला. १९४१ च्या एप्रिलमध्यें गांधींनीं 'प्रातिनिधिक सत्याग्रह' सुरू केला. वीस हजार कार्यकर्ते तुरुगांत गेले. ब्रिटिश सरकारला हिंदुस्थानांत विरोधाचे निखारे पेटलेले आहेत एवढी मंद जाणीव झाली.

पण तीव्र जाणीव देण्याचें काम रणदेवता करीत होती. जर्मनीप्रमाणेंच जपानहि एकएक देश बकासुराप्रमाणें भराभर घशांत घालीत होता. जावा गेलें, सुमात्रा गेलें, ब्रह्मदेशांतील रंगूनहि पडलें. त्यानंतर चारच दिवसांनीं ता. ११ मार्च रोजीं, आपला साम्राज्यवादी दुराग्रह बाजूस सारून मि. चर्चिल यांनी पार्लमेंटांत जाहीर केलें कीं, "आम्हीं हिंदुस्थानबद्दल एकमुखी योजना तयार केली आहे, व तिला हिंदुस्थानांतील सर्व पक्षांची सम्मति मिळविण्यासाठीं कॉमन्सचे नेते सर स्टॅफर्ड क्रिप्स तिकडे जात आहेत."

ता. २२ मार्च रोजीं क्रिप्स हिंदुस्थानांत आले. निरनिराळ्या पुढाऱ्यांशीं वाटाघाट करण्यांत त्यांनीं सतरा दिवस घालविले. तोंपर्यंत जपान हिंदुस्थानापासून मागें सरला. त्याबरोबर क्रिप्सनें आपले शब्द फिरविले. त्यानें जी योजना आणली होती ती वाचून गांधीजी उद्‌गारले, "मला कल्पना नव्हती कीं, तुमच्यासारखा माणूस असली योजना घेऊन येईल म्हणून. ही पुढील तारखेची हुंडी कोण पत्करील? तुमची सारी योजना एवढीच असेल तर पहिल्या विमानानें तुम्ही परत जावें हें उत्तम." असा खडखडीत निषेध करून गांधीजी लगेच सेवाग्रामला परत गेले.

या वेळीं हिंदी जनतेवर युद्धकार्याचा वरंवटा जोरानें फिरत होता. सक्तीनें पैसा वसूल केला जात होता. स्त्रियांची बेअब्रू होत होती. लोक बॉंबहल्ल्याची भीति बाळगून होते. प्रांताप्रांताच्या तक्रारी गांधीजींकडे येत होत्या. सारा हिंदुस्थान संतप्त झाल्याची जाणीव गांधींना होती. ते म्हणतात, "माझ्या मनोव्यथेची माझ्या टीकाकारांना कल्पना नाहीं. मी मेलों म्हणजेच ती त्यांना येईल. माझ्या हृदयांत अग्नि प्रदीप्त झाला आहे. ही भीषण परिस्थिति नष्ट करण्यासाठीं मी कमर कसलीच पाहिजे. आतां मी क्षणभरहि थांबूं शकत नाहीं.

"या जिवंत मरणापासून स्वतःची मुक्तता करण्यासाठीं स्वतःलाच अग्नि देण्याची माझी तयारी आहे. मी निर्माण केलेल्या लढ्याच्या ज्वाळा मला विझवितां आल्या नाहींत किंवा त्यावर मला नियंत्रण ठेवतां आलें

नाहीं, तर येथें सेवाग्राममध्यें स्वस्थ बसण्यापेक्षां त्या ज्वाळांत मी स्वतःला जाळून घेईन.

" जपानचा प्रतिकार समर्थपणें करतां यावा म्हणूनच ब्रिटिश सत्तेला आम्ही निघून जाण्याची सूचना करीत आहों. जपान येथे आला तर इंग्लंडच्या हातचा फक्त एक देश जाईल, पण आमचें सर्वस्वच बुडालें असें होईल. ब्रह्मदेश, मलाया, सिंगापूर, येथल्यासारखा अनुभव हिंदुस्थानांत येऊं नये, तर चीन-रशियासारखा झुंजार विरोध येथें व्हावा; यासाठीं प्रत्येक हिंदी नागरिकाला आपल्या स्वातंत्र्याची जाणीव होणें आवश्यक आहे."

आणि या ज्वालामुखीचा स्फोट लवकरच झाला.

क्र. ३५९८८ विभाग बालवाङ्मय क्रमांक २००३ नों. दि. २२।१।

## : १० : 'चलेजावचा' झंझावात

" आजपासून तुम्ही स्वतंत्र आहां." असा संदेश गांधीजींनीं मुंबई येथें ता. ८ ऑगस्ट १९४२ रोजीं भरलेल्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीला दिला. त्याचे नादनिनाद साऱ्या देशभर उठले.

आठ साल—लो. टिळकांनीं देशभर गाजविलें !

आठ ऑगस्ट—म. गांधींनीं जगभर गाजविलें ! !

" ब्रिटिशांनों चालते व्हा." (Quit India) या घोषणा प्रत्येकाच्या कानांवर पडूं लागल्या. गांवागांवांतील भिंतीभिंती तेंच ओरडून सांगूं लागल्या. तोंच क्रांतिरस रस्त्यारस्त्यांतून वाहूं लागला. 'करेंगे या मरेंगे (Do or Die.) हे शब्द हिंदी वातावरणांत जळत्या अक्षरांनीं लिहिल्यासारखे सर्वत्र दिसूं लागले.

युद्धानें गांजलेला आणि क्रिप्स योजनेनें निराश बनलेला सारा हिंदुस्थान ब्रिटिश राज्याविरुद्ध उठला होता. त्याचा संताप गांधीजींनीं बोलून दाखविला. १९२७ सालीं मद्रास येथें राष्ट्रसभेनें स्वातंत्र्याचा ठराव केला. १९२९ सालीं लाहोर येथें स्वातंत्र्याचें निशाण फडकलें आणि १९४२ सालीं मुंबई येथें स्वातंत्र्य जाहीर करण्यांत आलें. लोकांचा उत्साह अमाप होता, अनावर होता. तरी गांधीजींनीं आठ ऑगस्टच्या ठरावावर भाषण करतांना जनतेला दोन अटी सांगितल्या होत्या. एक अहिंसेचें पालन आणि दुसरी व्हाईसरॉयशीं मुलाखत झाल्यानंतर मगच चळवळीला सुरुवात.

मुलाखत मागणारें पत्र गांधीजी लिहून पुरे करतात न करतात तोंच सरकारनें ता. ९ रोजीं पहांटे बिर्ला भवनांतून त्यांना पकडून नेलें. कस्तुरबांना संध्याकाळीं पकडलें. इतर साऱ्या पुढाऱ्यांची धरपकड विजेच्या वेगानें व धक्क्यानें सरकारनें केली. (सरकारनें गांधीजींना त्यांच्यावरील आरोप ता. २१ जानेवारी १९४४ रोजीं कळविला ! )

या कठोर आघातानें सारे लोक सुन्न झाले—चिंताक्रांत झाले—बेफाम बनले. त्यांनीं तारा तोडल्या. गाड्या उलटल्या, टपालपेट्या जाळल्या, पोलीसचौक्या पेटविल्या, बॉंबचें स्फोटहि झाले.

सरकार बावरलें—गांगरलें—घाबरलें ! हवें तसें अत्याचार करूं लागलें. सरकारच्या माहितीप्रमाणें १९४२ अखेरच्या पांच महिन्यांत ६०,२२९ लोकांना अटक केली. १८००० माणसांना स्थानबद्ध करण्यांत आलें. ९४० इसम तर ठार झाले आणि १६३० जण जखमी झाले. ५०० माणसांना फटके लगावण्यांत आले.

नोकरशाहीच्या या धुमाकुळाबाबत मि. बर्नार्ड शॉ यांचा एक अभिप्राय पाहण्यासारखा आहे. ते म्हणतात, " राजेसाहेबांनीं गांधींच्या सुटकेचा हुकूम काढावा व त्यांना अटक करण्यांतील मंत्रिमंडळाच्या मानसिक विकृतीबद्दल गांधीजीपाशीं दिलगिरी व्यक्त करावी. "

गांधीप्रभृति 'राष्ट्रीय श्रेष्ठींचा' तर ठावाठिकाणाहि जनतेस कळूं देण्यांत आला नाहीं. खुद्द प्रे. रूझवेल्ट यांचे खास प्रतिनिधि मि. फिलिप्स यांनाहि गांधीजींना भेटूं दिलें नाहीं, मग इतरांची काय कथा? गांधीजी-कडे बंदिकालांत आलेलीं सुमारें १००० पत्रें नोकरशाहीनें तब्बल दोन वर्षें दाबून ठेवलीं व ते बंधमुक्त झाल्यावर १९४४ च्या ऑगस्टमध्यें ती 'शिळी पत्री' त्यांच्यापुढें ठेवली!

पुण्याजवळ येरवड्याच्या छायेखालीं, आगाखान बंगल्यांत, गांधीजींना ठेवण्यांत आलें होतें. त्यांचेजवळ कस्तुरबा, महादेवभाई, प्यारेलाल, डॉ. गिल्डर, डॉ. सुशीला नायर व सौ. सरोजिनीबाई नायडू यांना ठेवलें होतें.

गांधीजींना पहिल्या आठवड्यांत एक दारुण आघात सहन करावा लागला. त्यांचे उजवे हात असणारे महादेवभाई देसाई ता. १५ रोजीं सकाळीं एकाएकीं निधन पावले. अटकेनंतर आठ दिवसांचे आंत, फक्त वीस मिनिटें अस्वस्थ होऊन, हृदयाक्रिया बंद पडल्यानें महादेवभाईंची उंचीपुरी व धिप्पाड मूर्ति या लोकांतून नाहींशी झाली. हें वृत्त मुंबई सरकारनें जनतेच्या कानावर घातलें बारा तासांनीं!

महादेवभाईंच्या पत्नीच्या सांत्वनासाठीं गांधीजींनीं तार केली. ती अशी 'महादेवाला योग्याचें मरण आलें. देशभक्ताचें मरण लाभलें, शोकाला अवसर नाहीं. अशा धीरोदात्त मृत्यूबद्दल आनंदच मानला पाहिजे.' हृदय पिळवटून गांधीजींनीं तार केली. तीच महादेवभाईंच्या पत्नीला व मुलाला आधार देण्यास समर्थ होती. पण सरकारनें ती तार पाठविलीच नाहीं—तिच्यांतील मजकूर पत्रानें सावकाशीनें कळविला आणि तोहि 'देशभक्त' हा शब्द खोडून!

चंपारण्याच्या लढ्यांतून जसे राजेंद्रबाबू व आचार्य कृपलानी, तसे खेडा जिल्ह्यांतील सत्याग्रहामधून महादेवभाई व वल्लभभाई हीं नररत्नें

गांधीजींना लाभलीं. महादेवभाईंची गांधीजीवर जी निष्ठा होती, भक्ति होती, तिला अंत ना पार! अहमदाबादच्या मजुरांचा लढा गांधीजींनीं हातीं घेतला होता. तेव्हां गांधीजींनीं प्रतिज्ञा केली होती कीं, यश मिळे-पर्यंत मी उपोषण करीन. महादेवभाईंनींहि उपोषण करण्याचें ठरविलें. बापूंनीं त्यांना मनाई केली. ते ऐकेनात. तेव्हां बापू कडकावून म्हणाले, " हें पहा महादेव, तुमचा धर्म काय तें मला माहीत आहे. जा, जेवून घ्या, तुम्ही जेवला नाहींत तर मीं तुमचें तोंड पाहणार नाहीं.'

बिचारे महादेवभाई येवढेंसें तोंड करून आले, म्हणूं लागले ' बापू जर माझें तोंड पाहणार नाहींत तर मी जगूं कसा!'

१९२६ सालची गोष्ट. गांधीजींचा दाक्षिणेंत दौरा चालला होता. जवळच गिरसप्पाचा धबधबा होता. तो पाहण्याला दौऱ्यांतील कांहीं पुढारी निघाले. गांधीजींनाहि 'चला' म्हटलें, पण त्या संन्याशानें नकार दिला. "नायगाऱ्या-पेक्षां गिरसप्पा उंच असेल, पण आकाशांतून पाऊस पडतो तो किती उंचा-वरून!" असें गांधीजींनीं विचारलें. तेव्हां आचार्य कालेलकर म्हणाले; " ठीक! आपण येत नाहीं का? तर नका येऊं; पण महादेवभाईंना पाठवा. आपण सांगितल्याशिवाय ते यायचे नाहींत.' बापूंनीं एकदम सांगितलें, 'महादेव येणार नाहीं. मीच त्याचा गिरसप्पा आहें."

पुत्रवत् असणारा महादेव अकस्मात निघून गेला. त्याची समाधि तेथेंच बांधण्यांत आली. त्यावर रोज सकाळसंध्याकाळ गांधीजी थरथरत्या हातांनीं फुलें वहात.

आणखी दीड वर्षांनीं तेथें दुसरी समाधि बांधावी लागली. ती म्हणजे कस्तुरबांची. आगाखान वाड्यांत गेल्यापासूनच त्यांच्या शरिराचें आरोग्य व मनाचा धीर ढांसळला. हृदयविकारानें त्या आजारीच होत्या. त्यांना निसर्गोपचार करणाऱ्या डॉक्टरला आपली प्रकृति दाखवावयाची होती. पण सरकारनें डॉक्टरला मनाई केली. सरकारच्या कठोरपणाचा कळस

झाला ! पेनिसिलीन हें औषध विमानानें आणण्यांतहि सरकारनें दिरंगाईच केली.

कस्तुरबांची स्थिति इतकी गंभीर झाली कीं, त्यामुळें डॉ. नायरना फार काळजी वाटली. डॉ. गिल्डरना झोंपच आली नाहीं. गांधीजींना तर 'बा' आतां सोडून जातात असें वाटायला लागलें. तरी सरकारनें लाहोरच्या वैद्यराजांना रात्रंदिवस तुरुंगांत राहण्याची कांहीं परवानगी दिली नाहीं. डॉ. दिनशा मेहता यांना सरकारनें तेथें जाऊं दिलें. पण फक्त दिवसाच त्यांना त्या तुरुंगांत जातां येत होतें. तीन रात्रीं तुरुंगाचे बाहेर मोटारीमध्यें थंडींत कुडकुडत वैद्यांना पडावें लागलें ! आंत 'बा' औषधासाठीं व्याकुळ झालेल्या, बाहेर वैद्यराज तळमळत पडलेले !!

फेब्रुवारीची १६ तारीख होती. रात्रीं २ वाजले. 'बां' चा जीवन-मरणाचा झगडा गांधीजी उघड्या डोळ्यांनीं पहात होते. त्यांच्या बिछान्या-जवळ बसून त्यांनीं सरकारला पुनश्च जीव तोडून पत्र लिहिलें कीं, "वैद्य-राजांना रात्रीच्या वेळीं आमचेजवळ राहण्याची परवानगी द्यावी अशी माझी विनंति आहे. ही सूचना मान्य नसल्यास सरकारनें 'बा' ची पॅरोलवर तरी सुटका करावी. या दोन्हीपैकीं कांहींच करायची सरकारची इच्छा नसल्यास त्यांनीं रुग्णाचे बरेंवाईट झाल्यास त्या जबाबदारींतून मला तरी मुक्त करावे. मी तिचा पति असून तिला आवश्यक अशी मदत करण्याचे माझ्यांत सामर्थ्य नाहीं. 'बां' ची पॅरोलवर तरी सुटका करा; नाहींतर मला तिच्यापासून दूर अशा कोणत्याहि दुसऱ्या ठिकाणीं स्थानबद्ध करा. असहाय्यपणें तिचें मरण पाहण्याचा प्रसंग माझेवर आणूं नका."

ता. २२ उजाडली. महाशिवरात्रीचा तो पवित्र दिवस. कस्तुरबा अर्धवट शुद्धींत होत्या.

त्यानंतर त्या उठून बसल्या. दोन्ही हात जोडून स्वच्छ वाणीनें त्यांनीं प्रार्थना केली. "ईश्वर मैं तेरी शरण में हूँ और तेरी दया की भीक माँगती हूँ"

महाशिवरात्रीच्या दिवशीं ही महासाध्वी कैलासवासी झाली! त्यांच्या-संबंधीं गांधीजींनीं असे उद्‌गार काढले कीं, "कोणी मला माझ्या सह-चारिणीची निवड पुनः करावयास सांगितलें, तर मी कस्तुरबालाच पसंत करीन—आणि तेंहि अनेक जन्मांसाठीं." यापेक्षां अधिक प्रशंसा कोणती ?

१९३३ सालीं गांधीजींनीं उपोषण सुरू केलें. तेव्हां जणुं कस्तुरबांना धक्काच बसला. त्यांना उद्देशून गांधीजींनीं मीराबेन ह्यांना त्यांना एक तार पाठविली. ती तार लिहितांना गांधीजींचे डोळे ओले झाले होते. त्या तारेंत गांधीजी लिहितात,

'बांना सांगा, त्यांच्या वडिलांनीं त्यांची अशा एका माणसाबरोबर जन्माची गांठ घालून दिली आहे कीं, ज्याच्या ओझ्यानें दुसरी एखादी स्त्री ठार झाली असती!' गांधींचा हा उपास सुटला तेव्हां मुंबईच्या एका मुसलमान गृहस्थानें कस्तुरबासाठीं एक हस्तिदंती बांगड्या—जोड व कुंकू पाठवून दिलें. "तुम्हांला हीं सौभाग्य—चिन्हें अखंड लाभावींत अशी मी प्रार्थना करतों." हे त्यांचे शब्द वाचून कस्तुरबा व गांधीजी ह्या दोघांच्या भावना उचंबळून आल्या. अशाच हृदयस्पर्शी छोट्या छोट्या देणग्या अनेक आल्या होत्या. पंजाबमधील एक म्हातारा. लष्करी कायद्याखालीं ९ वर्षें त्याला शिक्षा झाली होती. सुटकेनंतर तो फकीर बनला होता. त्यानें पांच पैसे व सोबत पत्र पाठविलें मी दररोज सकाळीं स्नानानंतर तुमचेकरितां प्रार्थना करीत आलों आहें. माझें उरलेलें आयुष्य मी तुमच्या कार्याकरितां खर्च करणार आहें. 'प्रामाणिकपणें कष्ट करून मिळवलेले हे पांच पैसे मी पाठवीत आहे. २९ मे रोजीं एक ग्लास फळाच्या रसाकरितां हे पैसे पुरे होतील.' पत्र वाचून गांधीजी गहिंवरले.

एका हरिजन मुलानें ९ पैशांचीं पोस्टाचीं तिकिटें पाठविलीं. उपवास सोडण्याचे वेळीं त्या तिकिटांच्या पैशाचा उपयोग गांधीजींनीं करावा अशी त्याची इच्छा.

तीन मुलांनीं म. गांधींकडे एक डाळिंबाचा करडा पाठविला.

त्यांनीं लिहिलें होतें, " आम्ही जीं डाळिंबें पाठवीत आहों. तीं आम्हीं तुमच्या उपवासाच्या दिवसांत खाऊचे पैसे वांचवून त्यांतून पाठवीत आहों. " खेड्यापाड्यांतील लहानथोरांच्या व गोरगरिबांच्या प्रेमभावावर व भक्तिभावावरच गांधीजींचें मन पोसलें जात होतें. तोच त्यांचा खरा आधार व खरा आनंद.

सर्व राष्ट्रानें या राष्ट्रमातेविषयींचा आपला भक्तिभाव प्रगट करण्यासाठीं 'कस्तुरबा स्मारक निधि' जमविला. ता. २ ऑक्टोबर १९४४ रोजीं एक कोटी बारा लाखांचा तो निधि सेवाग्राम येथें गांधीजींच्या हातीं देण्यांत आला. त्यांतून खेड्यांतील स्त्रिया व मुलें यांना औषधोपचार करणाऱ्या शेंकडों संस्थांचें जाळें पुढें देशभर पसरलें. त्यांचें कार्य बिनबोभाट पण व्यवस्थितपणें अखंड चालू आहे.

या बंदिवासांत गांधीजींच्या मनाचा कोंडमारा कमालीचा झाला. १९४३ सालीं सरकारनें बंगालमध्यें दुष्काळ निर्माण केला. त्यांत तीस लाख हिंदी बांधव प्राणास मुकले. " व्हाईसरॉयच्या राजवाड्याचे दगडी भिंतीवर हे डोकीं आपटून कां येत नाहींत ! " असा वैतागाचा प्रश्न गांधीजींचें मन करीत होतें. त्यांच्यावर सरकारनें जपान–धार्जिणे-पणाचा आरोप केला. पण आफ्रिकेंतील स्मट्सपासून सर्व विचारवंतांनीं त्यांचा इन्कार केला. दिल्लीच्या व लंडनच्या सरकारलाहि तो आरोप नाकारावा लागला.

१९४२ सालांतील दंग्याची जबाबदारी कॉंग्रेसवर आहे, असें सरकारी अधिकारी जोरजोरानें सांगूं लागले. त्यालाहि गांधीजींनीं सविस्तर उत्तर दिलें व " सरकारच्या हिंस्र कृत्यांनींच लोक बेफाम झाले " असें म्हणून गांधीजींनीं सरकारवरच आरोप उलटविला. याच कारणासाठीं गांधीजींनीं लोकांच्या अत्याचारांचाहि निषेध करण्याचें निग्रहानें नाकारलें.

" आठ ऑगस्टचा ठराव चुकीचा आहे, तो परत घेईपर्यंत कॉंग्रेस-कार्यकर्त्यांना आम्ही मुळींच सोडणार नाहीं." अशा वल्गना सरकार एक-सारखें करीत होतें. पण गांधीजी अणुमात्र चळले नाहींत.

जवाहरलालप्रभृति आपल्या सहकार्यांची भेट करवा अशी मागणी गांधीजींनीं वारंवार केली, पण सरकारनें नकार दिला. 'सरकारकडून न्याय मिळत नाहीं म्हणून सर्वश्रेष्ठ न्यायदेवतेपुढें गाऱ्हाणें मांडण्यासाठीं' गांधीजींनीं एकवीस दिवसांचें उपोषण ता. १० फेब्रुवारी १९४३ रोजीं सुरू केलें. या वेळीं गांधीजींचें वय ७४ वर्षांचें होतें.

गांधीजींना मुक्त करावें अशी मागणी हजारों लोकांनीं केली. तीनशें पुढाऱ्यांची परिषद दिल्ली येथें भरली. ना. अणे, मोदी व सरकार या तीन सभासदांनीं व्हाईसरॉयच्या कारभारी मंडळांतील आपल्या जागांचें राजीनामे दिले, तरी सरकारचें धोरण पोलादीच होतें.

मृत्यूच्या सरहद्दीवर जाऊन गांधीजींनीं एकवीस दिवस काढले. ता. ३ मार्च रोजीं सकाळीं त्यांनीं उपोषण सोडलें. अखेर ता. ६ मे रोजीं सकाळीं आठ वाजतां सरकारनें आगाखान वाड्यांतून गांधीजींना बिनशर्त मुक्त केलें. तेथून जवळच असणाऱ्या पर्णकुटींत गांधीजी गेले. तेथून ता. ११ मे रोजीं ते मुंबईस गेले. जाण्यापूर्वीं त्यांनीं आगाखान वाड्यांत जाऊन महादेव-भाई व कस्तुरबा यांच्या समाधीवर फुलें वाहिलीं. तेथें असतांना हा नेम ते नित्य श्रद्धापूर्वक पाळीत. ता. १४ पासून गांधीजींनीं अशक्ततेमुळें पंधरवडाभर मौन धारण केलें. मुंबईस जुहू येथें 'सुंदरवन' नांवाच्या बंगल्यांत ते डॉक्टरांच्या देखरेखीखालीं राहूं लागले.

ता. २ जुलै रोजीं गांधीजी पांचगणी येथें रहावयास गेले. तेथून ते ता. ३ ऑगस्ट १९४४ रोजीं सेवाग्रामला जाऊन पोंचले. त्यांचे दोन जिवलग आतां त्यांना तेथील आश्रमांत कोठून दिसणार? कस्तुरबांच्या झोपडींत प्रवेश करून त्यांच्या छायाचित्रासमोर गांधीजी उभे राहिले. त्यांच्या डोळ्यांना पाणी आलें!

## : ११ : स्मशानाचें नंदनवन

आणि अखेर तो हर्षाचा, भाग्याचा, सोन्याचा दिवस उगवला ! ज्यासाठीं नेमस्तांनीं आणि जहालांनीं, प्रार्थनावाद्यांनीं आणि दहशत-वाद्यांनीं, नागरिकांनीं आणि ग्रामीणांनीं, जाणत्यांनीं व नेणत्यांनीं, आबाल-वृद्धांनीं व स्त्रीपुरुषांनीं शंभर वर्षें कष्ट केले, हाल सोसले, त्याग केले, तुरुंग भोगले, फटके खाल्ले आणि जरूर तेव्हां आत्मबलिदानहि केलें, तें स्वातंत्र्य भारताला ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं लाभलें !

**उंच उभारुन मान हिमालय, तिष्ठत केव्हांचा ।**
**पहिलावहिला किरण पहाया या शुभ दिवसाचा ॥**

तो दिवस उजाडला ! त्या शुभ दिवशीं सहस्रानुसहस्र वर्षांचे आपले नवस फळाला आले आणि मनोरथ पूर्ण झाले, म्हणून भारतमाता प्रसन्न मुद्रेनें आणि मानी नजरेनें अखिल जगताकडे पाहात होती ! आज दादाभाईंचें स्वराज्याचें स्वप्न साकार झालें, लोकमान्यांच्या स्वदेशी–बहिष्कारांच्या वृक्षाला अमृत–फळ आलें, गांधीजींचा सत्याग्रह सिद्धीस गेला ! जगाच्या इतिहासांत एक नवीनच पान उघडलें गेलें ! शत्रूच्या रक्ताचा बिंदु न सांडतां, रणावीण स्वातंत्र्य मिळविण्याचा, गांधीजींचा अभिनव प्रयोग यशस्वी झालेला पाहून सारें जग चकित झालें ! आणि स्वतंत्र हिंदुस्थाननें तर हर्षानें वेडें होऊन आरोळी ठोकली. “ गांधीजी की जय ! ”

पण त्या वेळीं गांधीजी कोठें होते ? आपली प्रतिज्ञा सफळ झाली म्हणून साबरमतीच्या सत्याग्रहाश्रमांत जाऊन ते दीपोत्सव करीत होते काय ? दिल्लीच्या राजधानींत लाखों लोकांचीं वंदनें स्वीकारीत होते काय ? पण त्यांच्या दृष्टीनें खरेंखुरें स्वराज्य मिळालें होतें कोठें ? बंगालमध्यें मुसलमानांनीं हिंदूंची ससेहोलपट चालवली होती. ज्या राष्ट्राला स्वातं-त्र्याचा लाभ झाला तें राष्ट्रहि छिन्नविच्छिन्न होऊन गेलेलें ! नवसासायासानें बालकाचा जन्म व्हावा पण त्याच वेळीं त्याची आई गतप्राण व्हावी, तसा हा खंडित हिंदुस्थानचा स्वातंत्र्य-लाभ दुःखमिश्रित आनंदाचा होता !

ब्रिटिश सरकारचे मनांतून हिंदुस्थान स्वतंत्र करण्याचें थोडेंच होतें! पण १९४२ च्या चळवळीनें सारा देशच इंग्रजी सत्तेविरुद्ध उलटला. सैन्याची निष्ठाहि खिळखिळी झाली. सुभाषबाबूंच्या आझाद सेनेनें लष्करी कोटकिल्ल्यांतहि देशभक्तीचें वारें संचरून दिलें. "केवळ दंडुक्याच्या जोरावर यापुढें एक क्षणहि आम्ही हिंदुस्थानवर राज्य करूं शकणार नाहीं" अशी स्वच्छ कबुली इंग्लंडांतील उमराव-सभेनें दिली. दुसऱ्या महायुद्धांत इंग्लंडला विजय मिळाला तरी तो पराजयापेक्षां महाग पडला. त्याची आर्थिक पत खलास झाली. कोटयवधि रुपयांचें कर्ज त्याच्या डोक्यावर चढलें. तें फेडण्यासाठीं मालाचें उत्पादन वाढलें पाहिजे. त्यासाठीं आपले तरुण जगाच्या पाठीवर जेथें जेथें असतील तेथून परत बोलावण्यास इंग्लंडनें सुरवात केली. हिंदुस्थानांतील ब्रिटिश सैन्य इंग्लंडला आपल्या घरीं हवें होतें. आपला व्यापार हिंदुस्थानांत पुढेंहि चालावा अशी इंग्लंडची इच्छा होती. त्याचबरोबर हिंदुस्थान दुबळा व परावलंबी रहावा अशीहि वासना बऱ्याच ब्रिटिश मुत्सद्द्यांची होती. म्हणून पुनः पुनः 'सिमला परिषदा' भरल्या. त्यांना गांधीजी हजर होते. कॉंग्रेस कार्यकारिणीचे नेहरू प्रभृति सभासद १९४५ च्या जूनमध्यें मुक्त झाले होते. त्यांनींहि सिमला–परिषदेंत भाग घेतला. पण " राष्ट्रसभा ही केवळ हिंदूंची संस्था आहे. तिनें हंगामी मंत्रिमंडळांत आपले केवळ हिंदू प्रतिनिधी निवडून द्यावेत, तिचा एकहि राष्ट्रीय मुसलमान प्रतिनिधि घेतला जाणार नाहीं" असा सरकारचा दुराग्रह! त्यामुळें सिमला परिषदांचा डोंगर पोखरून उंदीरहि बाहेर पडला नाहीं!

इंग्लंडमध्यें १९४६ सालीं मजूर मंत्रिमंडळ आलें. पंतप्रधान मि. ॲटली यांनीं मुसलमानांची आडकाठी दूर करण्याचें धोरण जाहीर केलें. त्यांनीं तीन ब्रिटिश मंत्र्यांचें एक शिष्टमंडळ हिंदुस्थानांत पाठविलें. त्या त्रिमंत्र्यांनीं १९४६ च्या मे महिन्यांत एक योजना तयार केली. त्या योजनेंत घटना–परिषद व हंगामी राष्ट्रीय मंत्रिमंडळ होतें. पण मुस्लीम-

लीगनें खळखळ केली. तेव्हां तिला वगळून पंडित नेहरूंनीं राष्ट्रीय सरकार स्थापन केलें. थोडया काळानें लीग मंत्रिमंडळांत आली, पण ती अस्तनींतील निखाराच ठरली. दोघांचीं तोंडें दोन दिशांना. त्यांच्यामधून विस्तवहि जाईना. अर्थमंत्री मि. लियाकत अलीखान यांनीं अंदाजपत्रक विधिमंडळांत मांडलें, पण ते पंतप्रधान पं. नेहरू यांना न दाखवतांच ! गृहमंत्री सरदार वल्लभभाई यांनीं डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटना कांहीं हुकूम धाडले, तर ते धाब्यावर बसविले गेले. काँग्रेस व मुस्लीम लीग एका म्यानांतील दोन सुऱ्या ठरल्या.

अशा दुफळीनें दुर्बळ झालेला राज्यकारभाराचा गाडा सुखानें व सुरळीतपणें कसा चालणार ?

आणि ता. २९ जुलै १९४६ रोजीं मुस्लीम लीगनें 'प्रत्यक्ष कृति' करण्याचा आदेश मुसलमानांना दिला. त्याबरोबर दारूच्या कोठारावर ठिणगी पडावी तसे देशांत जागोजाग भयंकर स्फोट होऊं लागले. बंगालमधील नोआखली जिल्ह्यांत सहापूर गांवीं १० ऑक्टोबर रोजीं सकाळीं १० वाजतां १५,००० मुसलमानांची सभा झाली. त्या सभेंतून बाहेर पडलेले मुसलमान 'प्रत्यक्ष कृति' करूं लागले. त्यांनीं घरें जाळलीं. दुकानें लुटलीं, स्त्रिया पळवल्या, सक्तीचें धर्मांतर करविलें, खून केले. ज्या वेळीं गांधीजी आपल्या महायात्रेला निघाले, त्या वेळचा प्रसंग अत्यंत हृदयस्पर्शी होता. गांधींशिवाय प्रत्येकाचे डोळे अश्रूंनीं डबडबले होते. ते जहाजांत बसले तेव्हांपासून त्यांचें जहाज दृष्टीआड होईपर्यंत सर्वांच्या डोळ्यांवाटे अश्रुधारा वहात होत्या. मृत्यूबरोबरच त्यांचें समर होतें. हातांत कळकाची काठी घेऊन रानावनांत हिंडणारा आणि शांततेला व ऐक्याला पाचारण करणारा हा म्हातारा परत येईल का ? कोणी सांगावें, एखाद्या पिसाटानें जंगलांत त्यांना नष्टहि केलें असतें. पण परमेश्वर त्यांचा संगाती होता. मुसलमानांनीं गांधींचा खून केला नाहीं. त्यांनीं गांधीजींचें ऐकलें व शांति स्थापन केली.

श्रीरामपुराला त्यांनीं धान्याच्या शेतांत एका पत्र्याच्या झोपडींत आपला मुक्काम ठेवला. तेथून बाजार, पोस्ट वगैरे दूर होतें. स्वयंपाक, धुणीं धुणें, भांडीं घासणें वगैरे ते स्वतः करूं लागले. त्यांच्याबरोबर दोघे बंगाली होते; पण त्यांच्यावर स्वतःचा बोजा त्यांनीं टाकला नाहीं.

कलकत्त्यासहि तेंच, मुंबईच्या रस्त्यारस्त्यावर भोसकाभोसकी सुरू झाली. कोणाचे प्राणच सुरक्षित राहीनात. तेव्हां कॉंग्रेस–पुढाऱ्यांनीं देशाची फाळणी करण्यास मोठ्या कष्टानें मान्यता दिली. पंजाब व बंगाल यांचे मुस्लीमप्रधान विभाग, सिंध, सरहद्द, बलुचिस्तान व आसामांतील सिल्हेट जिल्हा, हा सलग मुलूख पाकिस्तान म्हणून मुसलमानांना तोडून द्यावा, ही योजना ता. ३ जून १९४७ रोजीं कॉंग्रेसनें मान्य केली. तिची अट अशी होती कीं, त्यानंतर ब्रिटिश सत्तेचें येथून संपूर्ण उच्चाटन झालें पाहिजे. ती अट व्हाईसरॉय लॉर्ड माउंटबॅटन यांनीं मुदतीपेक्षांहि लवकर पुरी केली. पण कॉंग्रेसची अटकळ अशी होती कीं, जसे ब्रिटिश हिंदुस्थानांतून शांततेनें निघून जातील, तसेच मुसलमान पाकिस्तान मिळाल्यावर वागतील. पण ही अटकळ पार फसली. मनुष्यस्वभावाच्या अगदीं विरुद्ध वर्तन मुसलमानांनीं केलें—पाकिस्तानानंतरीह ते पशुतुल्यच वागले.

देशाच्या या फाळणीस गांधीजींचा अखेरपर्यंत कट्टा विरोध होता. "पाकिस्तान हें पाप आहे, विष आहे," असें ते वारंवार म्हणत. ता. २७ जुलै १९४७ च्या हरिजनांत ते लिहितात, "सर्व देश नष्ट होऊं देण्यापेक्षां फाळणीला मान्यता देऊन त्याला आज आवश्यक असणारी शांतता कांहीं काल लाभूं द्यावी म्हणून आम्हीं हें केलें असें राष्ट्रनेते समजतात. मी स्वतः या मताचा नाहीं. अहिंसा हा माझा धर्म असल्यामुळें अत्याचाराच्या भीतीनें देशाचा एक इंचहि विभाग तोडून देण्यापेक्षां सर्व देशाची राखरांगोळी झाली तरी मी तसें करण्यास मान्यता देणार नाहीं."

पाकिस्तानच्या घटना-परिषदेचे अध्यक्ष या नात्यानें कायदे आझम जिना यांनींहि अधिकृतपणें असें आश्वासन दिलें होतें कीं, "तुमचा धर्म, तुमची जात अथवा तुमची निष्ठा कोणतीहि असली तरी, सरकारला त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. कोणत्याहि प्रकारचा भेदभाव न करतां आम्ही या राज्याची स्थापना करीत आहों. या राज्यांत जमाती-जमातींत, जातीजातींत वा निष्ठेनिष्ठेंत भेद केला जाणार नाहीं."

पण हा केवळ देखावा होता, बुरखा होता. मुसलमानांची कृति मात्र अगदीं विरुद्ध होती. सारा बंगाल जातीय दंग्यानें पेटला होता. नौखालीचा नरक बनला होता. तेथील हिंदूंना धीर देण्यासाठीं आणि मुसलमानांना माणुसकी शिकवण्यासाठीं गांधीजी तिकडे निघाले. तिकडे दंग्याच्या ज्या उत्राला, त्याच कलकत्त्यातहि. त्या विझवण्यासाठीं गांधीजी तेथें राहिले. ता. १५ ऑगस्ट रोजीं, स्वातंत्र्यदिनाचे उत्सवप्रसंगीं, ते कलकत्त्याच्या आगींत उभे होते. तेथील रस्त्यावर मुडदे पडले होते. ते उचलायलाहि कोणी नव्हतें. गांवांत दुर्गंधी सुटली होती. गिधाडांच्या झुंडीच्या झुंडी सण साजरा करीत होत्या. बंगालचे पंतप्रधान सुऱ्हावर्दी यांना तेथले हिंदु लोक 'खाटीक' म्हणत, पण गांधीजींची गांठ पडल्यापासून त्यांच्यांत माणुसकी आली होती. ते आपल्याला गांधीजींच्या मुलासारखेच मानूं लागले. त्यांना घेऊन गांधीजी हिंदूंच्या वस्तींत राहिले. खवळलेल्या हिंदूंनीं त्यांच्या घरांवर दगडांचा वर्षाव केला. तो वर्षाव होत असतां गांधीजी बाहेर आले आणि दंगेखोरांना म्हणाले,' माझें प्रेत पडलें तरी हरकत नाहीं, मी या घरांतून दुसरीकडे जाणार नाहीं.' गांधीजींनीं अखेरचें शस्त्र उपसलें—तें म्हणजे उपवासाचें. ७२ तासांचा उपवास त्यांनीं केला. त्याचा परिणाम जादूसारखा झाला. हिंदुमुसलमान पुढारी गांधीजींकडे गेले आणि हिंदूंनीं मुसलमानांचे व मुसलमानांनीं हिंदूंचे जीव वांचवूं अशी हमी घेतली. सरकारहि त्या हमींत सहभागी झालें. दंगल माजविणारांनीं चाकूसुऱ्यापासून तों स्टेनगनपर्यंत दंग्याकारितां जमवलेलीं हत्यारें गांधींच्या

पायावर वाहिलीं. लॉर्ड मौंटबॅटन म्हणाले, " सुसज्ज अशा पन्नास हजार लष्करी शिपायांना जें करतां आलें नसतें तें या एका महात्म्यानें केलें. त्यानें शांतता प्रस्थापित केली.

योगायोग असा कीं ता. १८ रोजीं ईदचा सण आला. त्या दिवशीं गांधींच्या शांतिकार्याला दृश्य फळ आलें. हिंदु–मुसलमान एक झाले. मशिदींत हजारों हिंदु बंधुभावानें गेले व त्यांचें स्वागत मुसलमानांनीं प्रेमभरानें केलें–त्यांना आलिंगनें दिलीं–फुलेंअत्तरें दिलीं–मेवामिठाई दिली. "हिंदु–मुस्लीम एक हो " या जयघोषानें सारी कलकत्ता नगरी दणाणून गेली. गांधीजींच्या रस्त्यावर तर गुलाबपाण्याचा सडा घातला गेला.

कलकत्त्यांतील यशाचें गांठोडें पाटीशीं घेऊन गांधीजी ता.७ सप्टेंबर रोजीं दिल्लीस निघाले. ता. ९ रोजीं ते दिल्लीस उतरले. तेथेंच ते अखेरपर्यंत राहिले. दिल्ली म्हणजे स्वतंत्र भारताची राजधानी. पण त्या वेळीं तिच्या मुद्रेवर सुतकी अवकळा पसरली होती. "आनंदी दिल्ली मृत नगरी बनली होती." ती रक्तबंबाळ झाली होती–जातीय दंगलीनें काळवंडली होती. वल्लभभाई स्टेशनवर आले होते, तेही उदास व गंभीर चेहऱ्यानें. त्यांनीं गांधीजींना, दिल्लींतील दंग्याची हकीकत सांगितली. पाकिस्तानांतील राक्षसी अत्याचारामुळें दिल्लींत पळून आलेल्या शिखांनीं व हिंदूंनीं मुसलमानांचा सूड घेण्याचा चंग बांधला होता. त्या निर्वासितांना रहावयास घरें मिळेनात म्हणून त्यांनीं मशिदींत आपला तळ ठोकला. दिल्लींत दररोज हिंदु–मुसलमानांच्या चकमकी होऊं लागल्या. हें कळतांच गांधीजींनीं पाकिस्तानच्या दुसऱ्या भागाकडे–पंजाबकडे–जाण्याचें तहकूब केलें आणि दिल्लींतच शांति-कार्य करण्याचें ठरविलें.

तेथें पोलिसांची लाठी बोथट ठरली होती. लष्कर निरुपयोगी बनलें होतें. रस्त्यावरील अत्याचार थैमान घालीत होते. राजधानींतच अराजक माजलें होतें. तेव्हां गांधीजींनीं दररोज निर्वासितांच्या छावण्यांत जाऊन

त्यांच्या तप्त मनाला शांति दिली, भ्रांत मनाला दिशा दाखविली आणि त्यांच्या गैरसोयी सरकारकडून दूर करविल्या. तरीसुद्धां दिल्लींत संपूर्ण शांतता नांदूं लागली नाहीं. उलट खुद्द मंत्रिमंडळाचें अस्तित्वच धोक्यांत आलें–डळमळूं लागलें–त्याच्या आसनाखालीं सुरुंग लागले–उलटसुलट कट होऊं लागले–ते मोडून काढण्याचे हुकूमही कांहीं सैनिक जुमानीनासे झाले! तशांत काश्मीर प्रकरणामुळें भारत–पाकिस्तानचें युद्ध जुंपण्याचें भय उत्पन्न झालें. काश्मीरवरील पाकिस्तानी टोळधाड परतविण्यासाठीं भारत सरकारनें लष्कर पाठवावें असाच सल्ला गांधीजींनीं दिला होता. फाळणीच्या वेळीं राष्ट्रीय जिंदगीची वाटणी करतांना पाकिस्तानला ५५ कोटी रुपये देण्याचें ठरलें होतें. तें देणें न्यायाचें होतें, हक्काचें होतें. पण व्यवहाराच्या दृष्टीनें भारत–सरकारनें ते पैसे अडवून ठेवले होते. कारण ते पैसे पाकिस्तान सरकार काश्मीरच्या युद्धांत आपल्याविरुद्ध वापरील असें भय त्यांना पडलें होतें. पण गांधीजी निर्भय होते व न्यायप्रिय होते. त्यांनीं ती रक्कम परत करण्यास भारत सरकारला सांगितलें.

गांधीजींनीं दिल्लींतील वातावरण शांत होईपर्यंत उपोषण करण्याचें ता. १२ जानेवारी १९४८ रोजीं जाहीर केलें. त्या दिवशीं सायंकाळीं प्रार्थनेनंतरच्या भाषणांत ते म्हणाले, "हिंदु धर्म, शीख धर्म आणि इस्लाम धर्म यांचा डोळ्यादेखत होणारा विनाश पाहात निष्क्रियत्वानें स्वस्थ बसण्यापेक्षां मृत्यु आला तर तो मला वैभवशाली मोक्षच वाटेल. जर पाकिस्ताननें आपल्या राज्यांतील निरनिराळ्या धर्मांच्या लोकांना समान दर्जा आणि जीवित–वित्ताची शाश्वति दिली नाहीं आणि त्याचेंच अनुकरण हिंदुस्थाननें केलें तर हा सर्वांचा विनाश निश्चित आहे. फरक इतकाच कीं, हिंदुस्थानच्या दोन्ही विभागांतील इस्लाम धर्म नष्ट झाला, तरीहि तो बाहेरच्या जगांत मूळ धरून राहूं शकेल. पण हिंदुधर्म आणि शीखधर्म यांना हिंदुस्थानच्या बाहेर जगच नाहीं."

गांधीजींनीं मंगळवार ता. १३ जानेवारी १९४८ रोजीं बिनमुदत

उपोषण सुरू केलें !–वयाच्या ७९ व्या वर्षी सोळावें उपोषण सुरू केलें ! ! त्याबरोबर यक्षिणीची कांडी फिरली आणि दिल्लीच्या रस्त्यावरून हिंदु–मुसलमान–शीख यांच्या संयुक्त मिरवणुकी निघूं लागल्या. हिंदुस्थान सरकारनें ५५ कोट रुपये पाकिस्तानला देण्याचें जाहीर केलें. हिंदु–मुसलमान पुढाऱ्यांनीं समेटाच्या दिशेनें पावलें टाकलीं. एकशें सतरा मशिदी उध्वस्त झाल्या होत्या त्या बांधून देणें, मुसलमान समाजावरील बहिष्कार उठविणें, मुसलमानांना सर्वत्र निर्भयता मिळवून देणें इत्यादि सात अटींचा मसुदा जातीय पुढाऱ्यांनीं मान्य केला. बाबू राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखालीं एक शांतता–समिति स्थापन झाली. ता. १८ जानेवारी रोजीं गांधीजींनीं उपोषण सोडलें.

पण त्यानंतर दोनच दिवसांनीं त्यांच्या अंगावर प्रार्थनेच्या वेळीं बॉंब टाकण्यांत आला. मुसलमानांना फाजील सवलती दिल्या असें समजून मदनलाल नांवाच्या निर्वासितानें तो बॉंब टाकला. पण तो गांधीजींना स्पर्श करूं शकला नाहीं. दिल्लींतील मुसलमानांना जी निर्भयता व शांतता प्राप्त झाली होती, ती पाकिस्तानांतील हिंदूंना मिळवून देण्यासाठीं गांधीजी पंजाबकडे जाणार होते. त्यापूर्वी ता. ३१ जानेवारी रोजीं गांधीजी सेवाग्रामास जाणार होते. तेथें ता. १४ फेब्रुवारी रोजीं जम्नालाल बजाज यांची श्राद्धतिथि आटोपून व परत दिल्लीस ते येऊन पाकिस्तानकडे प्रयाण करणार होते.

पण दैव कांहीं भलतेंच चिंतीत होतें. महात्म्याची योजना एक होती, पण दुरात्म्यांची दुसरीच. शुक्रवार ता. ३० जानेवारी १९४८ चा दिवस उजाडला. पहाटेस साडेतीन वाजतां गांधीजी नेहमींप्रमाणें उठले. पहिलें काम म्हणजे परमेश्वराची प्रार्थना. सकाळीं आठ वाजतां त्यांनीं राष्ट्रसभेच्या भवितव्याविषयींचा आपला लेख तपासला. स्वातंत्र्यानंतर राष्ट्रसभेचें स्वरूप युद्धाचें राहिलें नाहीं, तर आपल्या राष्ट्रीय सरकारला पूरक अशीं विधायक

कार्यें करणारा ‘ लोकसेवक-संघ ’ असें कॉंग्रेसचें स्वरूप रहावें, हें त्या योजनेंत सविस्तर मांडलें होतें. सात लाख खेड्यांना आर्थिक व नैतिक स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं ग्रामपंचायतींना मूलभूत घटक बनवून स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार व्हावी अशी त्यांची मनीषा होती. चरखा-संघ, ग्रामोद्योगसंघ, हिंदुस्थानीसंघ, हरिजनसेवकसंघ, आणि गोसेवा-संघ या संस्था लोकसेवकसंघाला जोडण्यांत याव्यात असाहि तपशील त्यांनीं दिला होता.

राष्ट्रसभेची ही नवी घटना तयार केल्यानंतर गांधीजींनीं मद्रास इलाख्यांतील दुष्काळाबाबत कांहीं सूचना लिहिल्या. नंतर त्यांनीं बंगाली लेखनाचा अभ्यास केला. नौखालींत गेल्यापासून त्यांनीं तो सुरू केला होता. अभ्यासानंतर ९॥ वाजतां भोजन. भोजन म्हणजे शेळीचें दूध, उकडलेल्या व कच्च्या पालेभाज्या, संत्रीं, लिंबू व आल्याचें चाटण एवढेंच. भोजनानंतर नौखालींतील कार्यकर्त्यांना त्यांनीं सूचना दिल्या. वामकुक्षी झाली. नंतर कांहीं मुलाखती झाल्या. दुपारीं साडेचार वाजतां संध्याकाळचें जेवण गांधीजींनीं घेतलें. सरदार वल्लभभाई मुलाखतीस आले होते. ते व नेहरू यांच्यामध्यें मतभेद उत्पन्न झाले असून राष्ट्रीय मंत्रिमंडळांत फाटाफूट होणार आहे, अशी बातमी ‘ लंडन टाईम्स ’ मध्यें आली होती. तिच्यावर गांधीजींनीं चर्चा केली. “ कांहीं झालें तरी फूट पडतां कामा नये, ” असें आपलें ठाम मत गांधीजींनीं सरदारांना सांगितलें. तेंच मत ते पंडित नेहरूंना प्रार्थनेनंतर सांगणार होते.

होतें ! —पण तें कधींच होऊं शकलें नाहीं.

त्यांचें प्रार्थना-स्थान हेंच त्यांचें हत्या—स्थान ठरलें. बिर्लाभवनमध्यें वल्लभभाईशीं गांधीजी चर्चा करीत होते. तेव्हां पांच वाजले, त्याबरोबर आभानें त्यांना घड्याळ दाखविलें. त्याबरोबर “ आतां मला येथून उठलेंच पाहिजे ” असें गांधीजी म्हणाले आणि प्रार्थनेच्या पटांगणावर जाण्यापूर्वी ते शेजा-

रच्या स्नानगृहांत गेले. परत येतांना त्यांचा नेहमींप्रमाणें हास्यविनोद सुरू झाला. आभा आणि मनु यांच्याशीं विनोद करीत ते प्रार्थना–स्थानाकडे निघाले.

पायऱ्या चढतां चढतां गांधीजींनीं शेवटचे शब्द उच्चारले ते हे–"आज मला दहा मिनिटें उशीर झाला आहे. मला उशिराची चीड आहे. प्रार्थनेच्या जागीं पांचच्या ठोक्याला हजर रहावें असें मला नेहमीं वाटत असतें." येथें त्यांचें बोलणें संपलें. कारण ते प्रार्थनेच्या जागीं येऊन पोंचले होते. ज्या ठिकाणीं प्रार्थनेवांचून दुसरे कोणतेहि विचार मनांत येतां कामा नयेत अशा पवित्र ठिकाणीं येतांच त्यांचें संभाषण संपलें.

लोकांनीं केलेल्या सांखळींतून ते प्रार्थनास्थानाजवळ जेव्हां पोहोंचले तेव्हां मुलींच्या खांद्यावरचे हात त्यांनीं काढले व प्रार्थनेस जमलेल्या लोकांना नमस्कार करण्यासाठीं हात जोडले. इतक्यांत उजव्या बाजूनें कोणीतरी एकजण गर्दीतून मार्ग काढीत, रेटारेटी करीत पुढें आला. बिचाऱ्या मनूला वाटलें कीं, गांधीजींच्या पायाला स्पर्श करण्यासाठीं तो पुढें येत आहे. त्याबरोबर ती त्याला जोरानें म्हणाली, 'आधींच प्रार्थनेला उशीर झाला आहे तेव्हां आतां पुढें येऊं नका.' आणि तिनें त्याचा हात धरून त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला. त्यानें जोरानें तिला ढकललें. त्याबरोबर तिच्या हातांतील आश्रम–भजनावलि, तस्त व माळ खालीं पडली. या पडलेल्या वस्तु उचलून घेण्यासाठीं ती वांकली, तोंच तो काळपुरुष गांधीजींच्या अगदीं समोर येऊन उभा राहिला, इतका कीं, त्या दोघांमध्यें तीन फुटांचेंहि अंतर नव्हतें.

'आज तुम्हांला प्रार्थनेला थोडा उशीर झाला' असें तो म्हणाला.

'होय, झाला खरा' असें गांधीजी म्हणताहेत, तोंच त्यानें आपल्याजवळ असलेल्या छोट्या बेरेटा ॲटॉमिक पिस्तुलांतून तीन गोळ्या लागोपाठ भराभर झाडल्या. पहिली गोळी पोटाच्या उजव्या बाजूला लागली.

पहिल्या दोन गोळ्या इतक्या जोरानें आंत घुसल्या कीं, त्या पाठींतून बाहेर आल्या. तिसरी फुप्फुसांत तशीच कायम राहिली. पहिली गोळी लागतांक्षणींच गांधीजींचें जें पाऊल पुढें होतें तसेंच थबकून राहिलें. दुसरी गोळी लागली तरी ते दोन्ही पायांवर उभे होते. मग मात्र धाडकन् कोसळले आणि ‘ राम, राम ’ असे शेवटचे शब्द त्यांनीं उच्चारले. चेहरा एकदम फटफटीत पडला. त्यांच्या पांढऱ्या कपड्यावर लाललाल शेंदरी रक्त दिसूं लागलें. नमस्कारासाठीं जोडलेले हात खालीं आले. एक हात आभाच्या खांद्यावर पडला. शरीर जेव्हां एकदम खालीं कोसळलें तेव्हांच मनु आणि आभा यांना काय झालें तें कळलें, इतक्या निमिषार्धांत हा सारा अनर्थ घडून आला.

बिर्ला हाऊसच्या माळ्यानें मारेकऱ्यावर झडप घालून त्याला गच्च आवळून धरलें. रघु माळ्याच्या पाठोपाठ विमानदलांतील एक अधिकारी मारेकऱ्याच्या अंगावर धावला व त्यानें त्याच्या हातातलें पिस्तूल फेकून दिलें.

पुढें खटला चालून नथूराम गोडसे या त्या मारेकऱ्याला ता. १५ नोव्हेंबर १९४९ रोजीं फाशीं देण्यांत आलें. त्याचा साथीदार नारायण आपटे यालाही फाशीं देण्यांत आलें. दोघेहि पुण्याचे होते.

मरणापूर्वी दोन दिवस गांधीजींनीं सहज बोलतां बोलतां अशी इच्छा प्रदर्शित केली होती कीं, ‘ गोळ्यांच्या वर्षावांत हसतमुखानें मरण आलें तर मी मोठें भाग्य समजेन. ’ परमेश्वरानें त्यांची ही इच्छा जणूं काय पुरी केली.

गांधीजींचें फुलांनीं आच्छादलेलें शरीर सर्वांना दिसावें म्हणून तें एका मोठ्या लष्करी गाड्यावर ठेवण्यांत आलें. तो गाडा दोऱ्यांच्या सहाय्यानें लष्करानें ओढला. ही मिरवणूक सुमारें सहा मैल लांब होती. ११ वाजतां निघालेली ती प्रेतयात्रा यमुनेच्या राजघाटावर ५ तासांनीं दाखल झाली. सरदार पटेल त्या गाड्याच्या एका बाजूला बसले होते.

पं. जवाहरलाल नेहरू पाठीमागें अनवाणी चालत होते. सरदार बलदेवसिंग-प्रभृति इतर मंत्रीहि आजूबाजूला होतेच. ही यात्रा चालू असतां विमानांतून अनेकवार गांधीजींवर पुष्पवृष्टि करण्यांत आली.

ही प्रचंड मिरवणूक राजघाटावर आल्यावर दहनासाठीं मुद्दाम बांधलेल्या उंच ओट्यावर गांधीजींचें शरीर ठेवण्यांत आलें. तीन फूट उंच व बारा फूट लांब रुंद असा चुनेगची ओटा तयार करण्यांत आला होता. चारी बाजूला पिंपळाच्या फांद्या उभ्या केल्या होत्या. सबंध चिता उत्कृष्ट अशा चंद-नाची रचली होती. त्याशिवाय कापूर, तूप व नारळ यांचाहि भरपूर उपयोग करण्यांत आला. रामदास गांधींनीं चितेला अग्नि दिला. त्या वेळीं शेवटचें दर्शन घेण्यासाठीं लोकांनीं इतकी गर्दी केली कीं, पोलीस व लष्कर याना अखेरीस लाठ्यांचा उपयोग करावा लागला. दहा लाख लोकांचा तो अनावर समूह चितेंतून ज्वाला निघतांच ' महात्मा गांधी अमर हो गये ' असें प्रचंड आवाजांत एकमुखानें ओरडला.

रात्रीं ८॥ वाजतां पंडित जवाहरलाल नेहरू आणि सरदार पटेल यांनीं रेडिओवर भाषण करून गांधीजींच्या अकल्पित निधनासंबंधीं आपला अनावर शोक प्रकट केला. पंडितजी आपल्या भाषणांत म्हणाले, " मित्र-हो, आपल्या जीवनांतील प्रकाश आज नाहींसा झाला असून सभोंवार काळाकुट्ट अंधार पसरलेला आहे. " पण लगेच ते म्हणाले, " नाहीं. हा प्रकाश नष्ट होणें शक्य नाहीं. मानवाला ह्या ज्योतीचा प्रकाश यापुढें शेंकडों वर्षें मिळत राहील. "

सत्याची ही ज्योत अनंत काल अखिल मानवतेला मार्गदर्शन करीत राहो !

समाप्त

IRBK-0103430
IRBK-0103430
अनुक्रम ३५९४८
भाग बालवाङ्मय.
क्रमांक ७००३
नों. दि. २२/११/६८